स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक ७ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ डिसेंबर २०२२



## रोहित पवार यांची परंपरा कंची, यत्ता कंची

पाक्षिक

# द पीपल्स पोस्ट

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

www.peoplespost.in



## ज्याचे त्याचे बाबासाहेब

विशेष लेख : संजय पवार



# भारत जोडो... आत आणि बाहेर

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक ७ । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ डिसेंबर २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.
**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट 8888541822

● **जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

● **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा


**संपादकीय** : समाजसुधारक वगळल्यास काय हो शिल्लक राहणार... – ३ / **रेषा आणि फटकारे** – ज्याचे त्याचे बाबासाहेब! – **संजय पवार** – ५ / **दिल्ली दरबार** – हे संविधानाला झुगारणे नव्हे तर, मग काय? – **विचक्षण बोधे** – ८ / **कव्हर स्टोरी**– भारत जोडो... आत आणि बाहेर – **उत्तम कांबळे** – १२ / संविधानाची शान – **ज.वि. पवार** – १८ / भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्वत्तेची छाप – **भीमराव सरवदे** – २१ / भारत जोडो यात्रा आणि मी – **प्रा. नागार्जुन वाडेकर** – २४ / धर्मनिरपेक्ष समाज आणि धर्मनिरपेक्ष साहित्य – **यशवंत मनोहर** – ३० / जेहि घट प्रेम न संचरै – **शशिकला राय** – ३३ / **ग्रंथ परिचय**– 'देशोधडी'च्या अंतरंगात शिरताना... – **लहू गायकवाड** – ३६ / उत्तम कांबळे यांचे दुबईतील भाषणाचा भाग २ व अंतिम – ३८ / **आज–कालचे प्रश्न** – रोहित पवार यांची परंपरा कंची, यत्ता कंची... । राज्यपालांच्या विकृत विधानांना बळ येतंय कुठून...? । हिंदुत्वाच्या वाटेवर पुणे विद्यापीठाची उडी... – **पंक्चरवाला** – ४१

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

## संपादकीय

# समाजसुधारक वगळल्यास काय हो शिल्लक राहणार...

ज्या रंगाचे सरकार म्हणजे सत्ताधारी असतात, त्याच रंगाचे आवरण समाजमनावर अंथरले जाते. संस्कृती आणि इतिहासाला तोच रंग दिला जातो. ढोल वाजवणारे सत्ताधारी असतील, तर बासरी अडगळीत पडते किंवा पाडली जाते. भारतात हे सातत्याने घडत आले आहे. सध्याही तसेच घडते आहे. बाबरी मशीद पाडली गेल्यानंतर उत्तर प्रदेशात काही वेळाने उजव्यांचे सरकार आले आणि स्पर्धा परीक्षेतील, सामान्य ज्ञान चाचणीतील प्रश्न बदलले. बाबरी मशिदीवर पहिला हातोडा मारणाऱ्याचे नाव काय, असा प्रश्न झाला. प्रश्नकर्त्याने असा विचार नाही केला, की एक प्रचंड मोठ्या हिंसाचारानंतर, दोन-चार हजार लोकांच्या मरणानंतर ही घटना घडली होती. असा प्रश्न विचारणे म्हणजे कटू बनलेल्या इतिहासाचे स्मरण करणे किंवा गौरवीकरण करणे, असे वाटले नसावे. खूप बोंबाबोंब झाल्यानंतर पुढे कधी तरी हा प्रश्न गोठवण्यात आला. तत्पूर्वी, उजव्या विचारांचे काही राज्यपालपदावर आले होते. महाराष्ट्रात तेव्हा दुष्काळ होता. अशाच राज्यपालांनी यज्ञ केल्याने पाऊस पडतो, असा सिद्धांत मांडला. त्यांना प्रतिसाद देऊन काही ठिकाणी यज्ञ झालेही. बिहारमध्ये लालू प्रसाद यादवांची सभा झाली तेव्हा ते किती थोर आहेत, हे समजवून सांगण्यासाठी त्यांच्यावर शाळकरी मुलांसाठी पाठ देण्यात आला. असे आणि यासारखे काही सातत्याने घडत आले आहे. राजकारणाचा रंग आपली संस्कृती, इतिहास, शिक्षण, विचार यांना सातत्याने चिकटवला जात आहे आणि जोपर्यंत असे रंगकरी सत्तेवर आहेत, तोपर्यंत असेच घडत जाणार आहे. उद्या हनुमानाची जन्मतारीख कोणती, जन्मठिकाण कोणते, असे प्रश्न विचारल्यास आश्चर्य वाटायला नको.



महाराष्ट्रात लाखो युवकांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सेवा आयोगातर्फे दरवर्षी स्पर्धा परीक्षा घेतली जाते. वेगवेगळ्या गटांसाठी अभ्यास तयार केला जातो. अभ्यास तयार करणारे लोक, संस्कृतीविषयक समित्या यामध्ये उजव्यांचाच अधिक भरणा असतो, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही, तर यंदा गट-ब आणि गट-क यामधून महाराष्ट्राचा इतिहास वगळण्यात आला आहे. महाराष्ट्राचा आधुनिक इतिहास हा जसा परकीय सत्तेशी लढण्याचा आहे, तसाच तो धर्म आणि जातींची व्यवस्था चालवून विषमता पोसणाऱ्याविरुद्ध लढणाऱ्यांचाही आहे. या कालखंडातून प्रत्येक महापुरुषाने जात धर्म व्यवस्थेविरुद्ध टक्कर दिली आहे. सुरुवात होते ती छत्रपती शिवाजी राजे यांच्यापासून. त्यांना शूद्र ठरवून त्यांचा राज्याभिषेक करण्यास येथील धर्मांध शक्तींनी विरोध केला होता. चित्रविचित्र अटी घातल्या होत्या. साताऱ्च्या प्रताप सिंह महाराजांना, करवीरच्या छत्रपती शाहू राजांना, महात्मा जोतीराव फुल्यांना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना, विठ्ठल रामजी शिंदे यांना, आगरकर, गोखले यांनाही या व्यवस्थेविरुद्ध आयुष्यभर टक्कर द्यावी लागली. महात्मा फुल्यांनी सनातन धर्म नाकारला आणि सार्वजनिक सत्यधर्म काढला, बाबासाहेबांनी बौद्ध धम्म स्वीकारला. शाहू राजांनी सत्यशोधक समाजाला आश्रय दिला. कुणी आर्य समाजाचे झाले. सातत्याने समाज आणि धर्म सुधारणासाठीची लढाई जारी ठेवली. महाराष्ट्र आणि अन्य राज्ये यांच्यामध्ये एक फरक आहे. दक्षिणेबरोबरच महाराष्ट्रात जेवढ्या समाज सुधारणासाठी चळवळी



झाल्या तेवढ्या उत्तरेत झाल्या नाहीत. महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे पुरोगामी समाज निर्माण करण्यासाठी झालेल्या संघर्षाचा इतिहास आहे. फुले, शाहू, आंबेडकरी परंपरा या नावाने तो ओळखला जातो. एक व्यापक प्रबोधन महाराष्ट्राने पाहिले आहे. पुरोगामी महाराष्ट्र हा एकूणच देशासमोर आणि वर्तमानासमोर आदर्श ठरला आहे. 'अशीच आमची आई असती...' असे म्हणत परक्या स्त्रीचा सन्मान करणारे, जाती संपवण्यासाठी कायदे करणारे, स्त्री-शूद्रांसाठी शाळा काढणारे, मनुस्मृतीचे दहन करणारे एकापेक्षा एक बहाद्दर फक्त महाराष्ट्रातच होऊन गेले. किती तरी पिढ्या या विचारधारेवर पोसत आहेत. आता हा सारा क्रांतिकारी इतिहास आणि त्याचे नायक स्पर्धा परीक्षेतून हद्दपार करण्यात येणार आहेत. त्याचे कारण साधे-सरळ आहे आणि ते म्हणजे, या महापुरुषांनी ज्या वृत्तीविरुद्ध लढाया केल्या त्याच वृत्तीचे सत्ताधारी आले आहेत. विशेष म्हणजे, या महापुरुषांचा जयजयकार तेही करतात; पण महत्त्वाच्या ठिकाणी त्यांना आसन मिळणार नाही, याची काळजीही ते घेतात. महापुरुषांच्या प्रतीकांना ते महत्त्व देतात आणि चटका देणारे विचार सौम्य करण्याचा किंवा ते अदृश्य करण्याचाही ते प्रयत्न करत असतात.

महाराष्ट्रातील महापुरुषांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, स्त्री मुक्ती आदी गोष्टींचे स्वप्न पाहिले होते. ते स्वप्न कोणते होते आणि ते कुठपर्यंत पोहोचले आहे, याची नव्या पिढीला आणि उद्याचे नोकरशहा होऊ पाहणाऱ्यांना माहिती आवश्यक नसते. इतिहास सजवून ठेवण्याची गोष्ट नसते, तर वर्तमानातही त्याचे बोट धरून चालण्याची, त्याच्या पोटात लपलेल्या संघर्षाचे आवाज ऐकण्याचीही गोष्ट असते. तो समाज इतिहासाचे नीट आकलन करू शकत नाही, जो समाज इतिहासाने मारलेल्या हाका नीट ऐकू शकत नाही, जो समाज इतिहासाच्या मुठीतील आशयगर्भ खजिना पाहू शकत नाही, तो समाज वर्तमान घडवू शकत नाही आणि भविष्याकडे वाटचाल करतानाही अडखळत असतो. तो भरारी मारू शकत नाही. असे घडू नये म्हणून कर्तृत्वाचे चिन्ह बनलेल्या इतिहासाला विद्यार्थ्यांच्या अभ्यासात, परीक्षेत आणले जाते. विशिष्ट विचारधारेच्या लोकांना आजही मनू उपयुक्त वाटतो. आर्य चाणक्य उपयुक्त वाटतो. गुरुजी आणि डॉक्टर उपयुक्त वाटतात. भाकड कथांनी भरलेली पुराणे उपयुक्त वाटतात. सिनेमातला राम सेतू उपयुक्त वाटतो. मग महाराष्ट्र घडवणारे, तो सुंदर करणारे, महाराष्ट्राच्या कपाळावर समता आणि मानवतेचे बाशिंग बांधणारेच अडचणीचे का वाटतात. घोटीतल्या प्रतीकांमध्ये आणि नागपूरमध्ये झाडाखाली बसून कोण असे घडवत असते. इतिहास म्हणजे नुसतेच पोवाडे नसतात, तर तो जाणून घेण्याचा हक्कही विद्यार्थ्यांना असतो. राजकारणात टिमकी वाजवून महापुरुषांच्या नावाने मते मागायची आणि सुधारणांची वेळ आली, की त्यांना कोंडायचे हा मतलबीपणा योग्य नाही. शेती, शिक्षण, राजकारण, धर्म, मानवता, स्त्री मुक्ती, जातिअंत, पाणी आदी अनेक क्षेत्रांत पहिलेवहिले प्रयोग झाले ते महाराष्ट्राच्या तांबड्या मातीत आणि सह्याद्री सातपुड्याच्या कुशीत. जर हे प्रयोग दाबून टाकले, तर महात्मा फुल्यांची जलनीती कशी कळणार? स्त्री शिक्षणाचे महत्त्व कसे कळणार, राखीव जागांचे महत्त्व कसे कळणार, मूठभर धान्य गोळा करून शाळांचे जाळे तयार करणाऱ्यांचे प्रयत्न कसे कळणार, बिटिशांविरुद्ध पत्री सरकार स्थापन करणाऱ्यांचे महत्त्व कसे कळणार? पुरोहितांशिवाय लग्न लावता येते हे कसे कळणार? जर यातील काहीच कळणार नसेल, तर उद्याचे नोकरशहा केवळ टिकमार्क करणारे दिसतील. महापुरुषांनी त्यांच्यापर्यंत मोठ्या कष्टाने सोडलेले समाजस्वप्न, विकासाचा रथ ते पुढे नेऊ शकणार नाहीत, तर कदाचित मागे खेचतील. हे सारे टाळायचे असेल, तर समाजाभिमुख शिक्षण आणि तसा अभ्यासक्रम तयार करण्याची गरज असते. थोड्याफार प्रमाणात ती भागवली जातही होती. आता नवे रंगवाले आले आहेत. त्यांचे राजकारण फक्त हिंदुत्वाभोवती फिरतेय. हिंदुत्ववादी समाज तयार करण्याची त्यांची धडपड आहे. म्हणूनच मानवतावादी समाजाचे स्वप्न पाहणारे त्यांना अडचणीचे वाटतात. ●●●

# ज्याचे त्याचे बाबासाहेब!



संजय पवार

**बाबासाहेब सध्या कला क्षेत्राला फार महत्त्व आलेय. कलेला शूद्र मानणारे सवर्ण व त्यातूनही ब्राह्मण स्त्री-पुरुष तर असे वावरतात, की या कला त्यांच्या रक्तातच होत्या! सध्या कलेचा व्यापारच चालू आहे आणि ब्राह्मणांनी त्यात अलिखित मक्तेदारी निर्माण केलीय. प्रवर्गाच्या भाषेत बोलायचं, तर दलित, ओबीसी, भटके, या वर्गांतील कलाकारही सर्वमान्यता मिळवून लोकप्रिय झालेत. त्यांची आंतरजातीय/धर्मीय लग्नं झालीत. आता इथे जो बौद्ध कलाकार असतो, स्त्री किंवा पुरुष त्याला आपली जात वा धर्म खुलेपणाने सांगायची सोय नसते.**

**आदरणीय बाबासाहेब!**

आता तुम्हालाच जय भीम कसं म्हणणार? नमस्कार, हॅलो, केलं, तर कट्टर आंबेडकरवादी चिडतील. शिवाय नावापुढे विश्वरत्न, भारतरत्न, बोधिसत्त्व तर सोडाच; पण साधं डॉ. ही लावलं नाही म्हणून सोशल मीडियातून जी काही शिवीगाळ होईल ती वेगळीच! होतं काय १४ एप्रिल आणि ६ डिसेंबर जवळ आले, की आमच्यातला तुमचा वंश जागा होतो! तुमची जयंती ते पुण्यतिथी यामध्ये आम्ही कुठे असतो ते विचारू नका. तेव्हा आम्ही आमचे असतो.



ज्या दोन-तीन गोष्टी तुम्ही आम्हाला दिल्यात, उदा. आरक्षण, बौद्ध धर्माची दीक्षा, बावीस प्रतिज्ञा, त्या आणि त्याच्या जोडीने पीपल्स एज्युकेशन सोसायटी, रिपब्लिकन पक्ष, मिलिंद महाविद्यालय, सिद्धार्थविहार हॉस्टेल, असं जे काही तुमच्या हयातीत दिलंत ते. त्याच्याबद्दल जर तुम्ही आम्हाला काही विचारलंत तर सॉरी बाबासाहेब, आम्ही तुम्हाला जे सांगू ते ऐकून तुम्ही उद्विग्न व्हाल, खंतावाल; पण आम्ही तुम्हाला म्हणू फार मनावर नका घेऊ! कारण आम्हीही हल्ली फार मनावर घेत नाही!

झालंय काय बाबासाहेब, आरक्षणातून शिक्षण आणि नोकरीत आपल्या जवळपास चार पिढ्या स्थिरावल्यात. गावगाड्यातील जातीयता, अस्पृश्यता आता बऱ्यापैकी रिमोट एरियापुरती मर्यादित आहे. तुम्हाला जाऊन पन्नास वर्षे झाली. महाराष्ट्रात तरी धर्मांतराने जो बदल घडवला तो आणि राज्य म्हणून बदलत्या महाराष्ट्रात महारवाडे बौद्धवाड्यात बदलले, शिवाय वाढत्या शहरीकरणात संमिश्र वस्तीत धर्मांतरित बौद्ध सामावून घेतला गेला. त्यामुळे त्याच्या पुढच्या पिढ्या देशात इंग्रजी माध्यमात शिकून, उच्च शिक्षणासाठी व नोकरीसाठी परदेशात पोहोचल्यात. हुशार आहेत; पण पूर्वेतिहासापासून पूर्ण अनभिज्ञ! कारण संमिश्र वस्तीत पूर्वीसारखी थेट जातीयता नसते. सटल असते. म्हणजे आडनाव. घरातले देव, फोटो वगैरेवरून जात शोधतात. हल्ली बीसी, सरकारी जावई वगैरे पण नाही म्हणत. कोटावाले म्हणतात.

शहरात एक जबरन सरमिसळ असते. पाहिजे तिथे अंतर राखून बाकी काहीच पाळत नाही, हा शहराचा स्वभाव असतो. म्हणून तर तुम्ही गांधी खेड्यांकडे चला म्हणत होते, तेव्हा म्हणालात शहरात चला. तुम्ही दूरदर्शी होता. शहरांना सेक्युलर व्हावंच लागतं. आता जागतिकीकरण व इंटरनेटच्या जमान्यात तर सनातन्यांची फार तारांबळ होते. म्हणून ते हिंसकही होताहेत. असो. तर शहरात येऊन आम्ही काय केलं? तर तुम्ही म्हणायचात ना शासनकर्ती जमात व्हा! तर राजकीय नाही; पण प्रशासनात आपले आयएएस व आयपीएस, आयएफएस वगैरे शासनकर्ती जमात म्हणता येतील इतक्या संख्येने नक्कीच आहेत; पण ते आहेत. आपापल्या जागी स्थिरावलेत. प्रशासन व राज्यकर्ते या संबंधाना सरावलेत. आपल्या जातीच्या युनियन, संघटना असतात.जयंती, पुण्यतिथीला ते थोडा हात सैलही करतात. व्याख्यानमाला, एखादा पुरस्कार वगैरे चालू असतं.

तुम्ही बौद्ध धम्म दिलात, तर आम्ही सध्याच्या काळात विपश्यना, झेन बुद्धिझम वगैरेही करतो. पाली शिकतो. शिकवतो; पण हे सगळं आतल्या आत. बाकी वस्ती पातळीवर बुद्धविहारं असतात, त्यात चिवरधारी पण अवलंबून असलेल्या भिक्खूनांही वस्त्या सांभाळून असतात. काही ठिकाणी तिबेटी भिक्खूही आणतात. कधी जयंतीला, कधी लग्नात पण त्यांचं कर्मकांड इतकं लांबतं, की यजमानांना कळत नाही, हे आता कसं आवरावं. कारण हिंदुत जसे बामण नेमकं काय

म्हणतोय हे बामणांनाही कळत नाही, तसं तिबेटी भिक्खूचं बुद्धस्तवन भारतीय, विशेषत: महाराष्ट्रीय बौद्धालाही कळत नाही!

म्हातारेकोतारे निमूट ऐकत बसतात. लहान मुले बागडत बसतात. तरुण गायब असतात व मध्यमवयीन पुढचं आटोपून पटकन मोकळं व्हायच्या चिंतेत असतात. आधीच कमिटीतले मानापमान काय कमी नसतात. मग काही जण करणारांची फजिती बघायला वा उडवायला आलेले असतात. बायाबापड्या नटूनथटून मराठी, हिंदी मालिकांच्या प्रभावातून वटपौर्णिमा वा करवा चौथला पॅरलल; पण निळी/पांढरी वेशभूषा करून वावरत वा मिरवत असतात. त्यांच्यातही मिस्टरांच्या श्रेणीनिहाय मानपान असते. तुम्ही हिंदू धर्माला रिप्लेसमेंट दिलीत आम्ही हिंदूंना पॅरलल बौद्ध कर्मकांड व प्रतीकांची निर्मिती करून कडवेपणाची एकमेकातच स्पर्धा लावतो. कोण जय भीम जोरात म्हणतो, कोण आवाज चोरतो, कोणाच्या घरी केवढा फोटो, कोण बुद्धवंदना घेतो, कोण ती नुसतीच पुटपुटतो, अशी सर्व वर्गवारी करून कौन बनेगा कट्टर बौद्ध आंबेडकरवादी? असा एक खेळ चालू असतो.

घरात दर्शनी भागात पुस्तकांची शोकेस आणि पुरस्कार व स्मृतिचिन्हांची आरास राखणाऱ्यांचे वेगळेच बाबासाहेब असतात. यातले बरेचसे प्राध्यापक, साहित्यिक, वकील वा राजकीय-सामाजिक 'अ' वर्ग कार्यकर्ते असतात. हे स्वत:ला आंबेडकराईट म्हणवतात. तुमचा बायोडेटा सनावळ्यांसह पाठ असतो. १९५६ पर्यंतचा इतिहास हेच भांडवल. हिंदू धर्म चिकित्सा व कठोर टीका. बुद्धाची थोरवी. गांधींवर, मार्क्सवर, दणकून प्रहार. समाजवादी कम्युनिस्टांसह रिपब्लिकनमधला आपल्या जवळचा तुकडा सोडून इतरांना शिव्याशाप. शेवटी मानधनाचे पाकीट व खाणेपिणे या निरोपसमारंभातही शेरेबाजी. आत्मस्तुती व आयोजकाला शाबासकी देतानाच 'तूही कसा नालायक व नादावतोस' अशी शिकवणी घेणारा हा वर्ग म्हणजे बाबासाहेब तुमच्या भांडवलावर आपली पतपेढी चालवणारा मर्यादित क्रियाशील आंबेडकरवादी!

बाबासाहेब राजकीयदृष्ट्या तर आपण अगदीच बेदखल झालोय. माफ करा; पण तुमचे नातू-पणतू वगैरे आहेत राजकारणात. इतर पक्ष त्यांची राखीव दखल घेतात; पण त्यांच्यात सर्वांना पंखाखाली घ्यायची तुमच्याएवढी क्षमता नाही. पुन्हा माफ करा; पण तुमचे थेट वारस व तुमचा वारसा सांगणारे यातच इतका विसंवाद आहे, की एकी हा शब्द निव्वळ व्याकरणासारखा वा तितपतच उपयोगी येतो.

तुमच्या महापरिनिर्वाणानंतरच जी शकले पडत गेली, ती उत्तरोत्तर वाढतच गेली. नाही म्हणायला दलित पँथर नावाचे एक वादळ आले आणि गेले. नुकतीच आम्ही त्या वादळाची पन्नासावी जयंती व पुण्यतिथी एकत्रच साजरी केली. अर्थात, रिवाजाला धरून गटातटातच केली!

बाबासाहेब सध्या बौद्धांची गंमत अथवा गोची अशी झालीय, की आंबेडकरवाद्यात जसे गट-तट असतात, तसे या नवबौद्धातही गट-तट आहेत. पहिल्या गटात बावीस प्रतिज्ञावाले कट्टर, रविवारी शुभ्र वस्त्रांसह विहारात जाणारे. सर्व कार्यात बुद्धवंदना, त्रिशरण म्हणणारे. बौद्ध धर्मकार्य करणारे. जय भीम, जय बुद्ध, जय भारत म्हणणारे. आयुष्यमान, आयुष्यमती संबोधणारे, स्मृतिशेष असा उल्लेख करणारे आणि हे न करणारे वा करताना लाजणारे वा मनोभावे न पाळणारे कट्टर गटाच्या द्वेषपूर्ण रोषास पात्र असतात.

दुसरा एक वर्ग विपश्यना, पाली, झेन बुद्धिझम, ओशोचा बुद्ध यांसह थेरीगाथा वगैरेंवर विद्वत्तापूर्ण चर्चा करत तत्त्वज्ञानाच्या अंगाने सारा भारत बौद्धमय करायचं स्वप्न पाहतानाच इतिहासात कसं बौद्ध धर्माचं उच्चाटन केलंय आणि आतासुद्धा विचारांच्या पातळीवर बुद्धाला बेदखल वा हायजॅक करताहेत, यावर उच्च पातळीवर बौद्धिक परामर्श करत असतो. इथेही एकमत होते असे नाही. अशा विद्वानांच्या तावडीत जो सापडतो तो स्वत:ला अज्ञानी समजून शरमिंदाच होतो. बौद्ध असूनही आपण बौद्ध साहित्य, विचार याबाबत काहीच करत नाही, या भावनेने खजील होतो. फक्त एका गोष्टीचा आनंद होतो, की पूर्वाश्रमीचे महार आता बौद्ध तत्त्वज्ञानाचे अभ्यासक म्हणून देश-विदेशात नाव गाजवत असतात. हे केवळ तुमच्यामुळे झालेय बाबासाहेब!

असे विचारवंत, लेखक समाजापासून चार हात अंतर राखूनच असतात. यांचं व्याख्यान १४ एप्रिल वा ६ डिसेंबर योग्य नसतं. त्यांची विचारपीठे विद्यापीठीय अथवा साहित्यिक कार्यक्रमात असतात. डिस्कोर्स, परामर्श वगैरे परिभाषा शिकावी लागते. इथले वा यांचे बाबासाहेब वेगळेच असतात. यातही केवळ अकादमिक म्हणवून घेणारे, तर काही स्ट्रॉन्च आंबेडकराईट म्हणवून घेणारे असतात. यांची शाब्दिक युद्धेही ग्रंथबद्ध होतात. विविध सेमिनार्सची शोभा वाढवतात. आंबेडकरी स्कॉलर अशीही ओळख यांची असते. काही मिरवतात, काही लपवतात, काही संदिग्ध ठेवतात.

बाकी वस्ती पातळीवर बाबासाहेब तुम्ही तसेच आहात जसे पन्नास वर्षांपासून आहात. वस्ती, नगर, कॉलनी महाराष्ट्रात कुठल्याही जिल्ह्यात, शहरात, तालुक्यात असो. तिचा चेहरा सारखाच असतो. बैठ्या चाळी, मध्येच दुमजली वा तिमजली इमला. हा बहुधा तिथल्या राजकारणी वा समाजसेवकाचा असतो. वस्ती, कॉलनी, नगराच्या प्रवेशद्वारी धूळभरली सांचीची कमान, त्यावर रंग उडालेले निळे झेंडे, क्वचित बौद्ध धर्माचा झेंडा, पक्षांचे, गटांचे नोटीस बोर्ड, वाढदिवसाचे फ्लेक्स. ठरावीक ठेवणीतले चेहरे, क्वचित मिश्र वस्ती असेल, तर दर्गा व मशीदही असते. हातगाडीवाले, किराणावाले क्वचित वा कायम एक पोलिस व्हॅन. १४ एप्रिलचा पूर्वीचा कव्वाली सामन्यांचा जमाना जाऊन नवे डीजे आलेत. वामन कर्डक, श्रावण यशवंते, प्रल्हाद शिंदे जाऊन आनंद आदर्श शिंदे, वैशाली भसाने, असे नवे आवाज व हिंदी गाणी असतातच. काही जण व्याख्यान वगैरे ठेवतात; पण वक्ताही तुमच्या चरित्राचे रिपीट भाषण करतो. या भाषणात आरपीआय पुढाऱ्यांवर तोंडसुख घेणं हे टाळीसाठी आवश्यक ठरते. 'सुरामेय मज्ज पमाद ठाणा'चा सोइस्कर विसर पडून वा पाडून घमघमाट, बाचाबाची व कोपऱ्यावरच्या हॉटेलातली ऐपतीतली ऐश किंवा उधारीत भर वर्गणीतून जमा झालेली रक्कम खर्च कुठे व कशी हे जमा करणाऱ्यांच्या चाल-चलन, चरित्राच्या पूर्वेतिहासवर अवलंबून असते. बाबासाहेबांसाठी काय पण, एकच साहेब बाबासाहेब, ही नवी अभिमानचिन्हे आहेत. बाकी पुतळा, अर्धपुतळा, निळा कोट, गुलाबी ओठ, काळा गोल चष्मा, निळीची उधळण, निळ्या पताकाच्या जोडीने आता निळी उपरणे, गमछे आलेत. या सर्वांना वाटते. शिकलेले, पॉश एरियात राहणारे, बंगलेवाले बेइमान, दलित

ब्राह्मण किंवा बाबासाहेबांच्या नावे नोट छापणारे. तुमचेच अनुयायी वेगवेगळ्या प्रवर्गांत वेगवेगळ्या विभागांत आजही!

बाबासाहेब सध्या कला क्षेत्राला फार महत्त्व आलेय. कलेला शूद्र मानणारे सवर्ण व त्यातूनही ब्राह्मण स्त्री-पुरुष तर असे वावरतात, की या कला त्यांच्या रक्तातच होत्या! सध्या कलेचा व्यापारच चालू आहे आणि ब्राह्मणांनी त्यात अलिखित मक्तेदारी निर्माण केलीय. प्रवर्गाच्या भाषेत बोलायचं, तर दलित, ओबीसी, भटके, या वर्गांतील कलाकारही सर्वमान्यता मिळवून लोकप्रिय झालेत. त्यांची आंतरजातीय/धर्मीय लग्नं झालीत. आता इथे जो बौद्ध कलाकार असतो, स्त्री किंवा पुरुष त्याला आपली जात वा धर्म खुलेपणाने सांगायची सोय नसते. लगेच मक्तेदार गँग त्यांचं एलिनिमेशन करायला सरसावतात; पण काही कलाकार इतके गुणवान वा लोकप्रिय असतात, की त्यांना एलिनिमेट करणं अवघड असतं. या कलाकारांची गोची तेव्हा होते, जेव्हा त्यांचा जोडीदार सवर्ण वा बौद्धेतर असतो. त्याला व्यवसायाची गरज म्हणून हिंदू सणवार, चालीरीती याचा भाग व्हावा लागतो. बुद्धाची कलात्मक मूर्ती खपून जाते; पण तुमचा फोटो दर्शनी ठेवायचा म्हणजे ओळख उघड करणे. काही जण तेही करतात. अभिमानाने करतात; पण मक्तेदारीवाले ते बाजूला सारून बाकी गोष्टीच प्रोजेक्ट करतात. हे जे कलाक्षेत्रातले बाबासाहेब तुम्ही ना अनेकदा अंडरग्राउंडच राहता! किंवा व्यवस्था तुम्हाला अंडरग्राउंडच ठेवण्यात दक्ष असते.


आपल्यात आता उद्योजकही तयार झालेत. त्यांची संघटनाही आहे. ज्यात दलित हा शब्दही आहे. गंमत बघा बाबासाहेब, ज्या सवर्णांना साहित्य वा नाटकात दलित शब्द खटकत होता, त्यांना उद्योगात तो चालला! दलित उद्योजक म्हणून वेगळी ओळख ठेवू पाहणारे आदिवासींना वनवासी ठरवून, शबरी नि एकलव्याची प्रतीके सोयीने वापरणारेच आहेत, हे तुम्ही ओळखले असेलच बाबासाहेब!

हिंदुत्ववाद्यांच्या मांडीला मांडी लावून बसविण्याचे त्यांचे हे उद्योग पाहिले, की वाटते सांगून धर्मांतर केलेल्या महामानवाची घरवापसी कशी काय होईल? पण त्यांनाही तुमचीच गरज आहे. आश्चर्य त्यांचे वाटते जे तुमचा डीएनए सांगतात, ते हे कलम खपवून कसे घेतात?

बाबासाहेब तुम्ही खो खो हसाल; पण आता गरीब सवर्णांनाही १०% आरक्षण संसदेसह सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलंय! या आरक्षणातून मेरिट कसं मोजणार? यातून जे डॉक्टर, इंजिनिअर होतील त्यांनी रोगी दगावले वा पूल पडले तर? बाबासाहेब आता जरा आणखी जोरात हसा. गावगाड्यात कुळांची माजोरी दाखवत ज्यांनी सर्वांत जास्त शोषण केलं, घरदारं पेटवली, बाया नासवल्या, गायरानं बळकावली, नामांतराच्या लढ्यात जिवंत जाळले, डोळे काढले, त्या मराठ्यांना आता मागासवर्गीय म्हणून आरक्षण हवंय. ओबीसीतून, सवर्णातून नाही, तर सामाजिक मागासवर्गातून आरक्षण हवंय! काही राज्यांत तर आता ८२% आरक्षण लागू झालंय. त्यामुळे सर्वजातीसंमत एक नवेच बाबासाहेब देशात जन्माला आलेत!

बाबासाहेब महाराष्ट्रात तुमचा किंवा आपला म्हणूया समाज जो आहे ना तो फक्त आर्थिकच नाही, तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत क्रीमिलेअर गटात गेलाय. त्यामुळे तो जमेल तसे, सोसवतील इतपत बाबासाहेब आठवतो, जपतो, चालवतो. बाबासाहेब तुमची महत्ता आता उत्तर भारत, दक्षिण भारत व ईशान्य भारतातही सर्वांना तीव्रतेने जाणवतेय. महाराष्ट्रातले आंबेडकरवादी निवांत झालेत, तर उत्तरेत व दक्षिणेत अधिक क्रियाशील झालेत. त्यात नवहिंदुत्ववाद्यांनी सरदार पटेलांसोबत तुम्हालाही हायजॅक केल्याने त्यांच्यासाठी बाबासाहेब तुम्ही म्हणजे हातचा एक झालाय! राखून ठेवून सोयीने वापरायचा!

बाबासाहेब तुम्ही दलितांचे, पूर्वाश्रमीच्या व आजही कुठे कुठे ठेवलेल्या अस्पृश्यांचे नेते, बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन करून त्याची दीक्षा घेताना सांगून हिंदू धर्माचा त्याग करणारे बंडखोर, विद्रोही धर्मसुधारक, प्रसारक, नेते, अशी जी तुमची ओळख होती वा आहे ती पुसून केवळ न केवळ संविधानाचे निर्माते म्हणूनच तुम्हाला जास्त



मिरविले जाते, गौरविले जाते. कारण सर्वांना आरक्षण हवेय व हिंदुराष्ट्र स्थापायचं झालं, तरी संविधानाच्या चौकटीतच ते तुमच्याच नावे कसं स्थापता येईल, अशा प्रयत्नात एक यंत्रणा काम करतेय. भगतसिंह व विवेकानंदांप्रमाणे तुम्हाला भगव्या शालीत लपेटण्याचे षड्यंत्र रचले जातेय बाबासाहेब!

बाबासाहेब हल्ली पोरांना खेळायला पझल्स मिळतात. त्यात एका प्रतिमेचे तुकडे करून ठेवलेले असतात. ते जुळवत चित्रं पुरं करायचं. एकसंघ करायचं असतं. तुम्हालाही तशा तुकड्यात विभागलंय. जो तो आपला तुकडा घेऊन तुम्हाला एकसंघ करू पाहतोय!

यातली वाईट गोष्ट ही, की एकसंघतेच्या नावाखाली आधी तुमचं विभाजन केलं जातंय! ६ डिसेंबरला भेटूच. मग १४ एप्रिलपर्यंत तुम्ही तुमचे आम्ही आमचे! ●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# हे संविधानाला झुगारणे नव्हे तर, मग काय?

**राज्यघटना ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली देणगी आहे. संविधानाने नागरिकांना जगण्याचा मूलभूत अधिकार आणि विकासाची समान संधी मिळवून देण्याची तरतूद केलेली आहे. हे करताना संविधानाने धर्माधिष्ठित राजकारण नाकारले; पण केंद्रातील सत्ताधारी पक्ष, भाजपने संविधानाच्या तरतुदी बोथट केल्याची अनेक उदाहरणे देता येतील...**

**विचक्षण बोधे**

काँग्रेसची 'भारत जोडो' यात्रा महाराष्ट्रात येण्याआधी तेलंगणामध्ये होती, तिथे हैदराबादमध्ये रोहित विमुलाची आई राहुल गांधींना भेटली. ही भेट किती भावनिक होती, याची कल्पना काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या छायाचित्रावरून येऊ शकते. राहुल गांधींना भेटण्यात आपलेपणा होता, कदाचित पहिल्यांदाच एखादा राजकीय नेता इतक्या आपलेपणाने भेटला असावा. या भेटीनंतर राहुल गांधींनी, 'रोहित वेमुला हा सामाजिक भेदभाव आणि अन्यायाविरुद्धच्या माझ्या संघर्षाचे प्रतीक आहे, आणि राहील', असे ट्वीट केले! राहुल गांधी आणि रोहित विमुलाच्या आईची ही भेट भाजपला किती रुचली असेल, याची कल्पना करता येऊ शकेल. भाजपने 'भारत जोडो' यात्रेची खिल्ली उडवण्याचा प्रयत्न केला होता; पण लोकांनी फारसा प्रतिसाद न दिल्याने भाजपला माघार घ्यावी लागली. रोहित विमुलाच्या आई या यात्रेत सहभागी झाल्यानंतरही भाजपने टिप्पणी करण्याचे टाळले आहे.



**स्मृती इराणींच्या निवेदनामध्ये नव्हता भावनेचा लवलेश**

'भारत जोडो' यात्रेनिमित्ताने रोहित विमुलावर झालेल्या अन्यायाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. हैदराबाद विद्यापीठामध्ये पीएच.डी. करत असलेल्या रोहितने २०१६ मध्ये आत्महत्या केली. त्याच्या मृत्यूनंतर देशभर उच्चशिक्षण संस्थांमधील जातीवादाविरोधात उग्र निदर्शने झाली होती; पण या आंदोलनाला भाजपच्या केंद्रातील सरकारने दिलेला प्रतिसाद बहुजन समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन स्पष्ट करून गेला. रोहित विमुलाने 'आंबेडकर स्टुडंट असोसिएशन'चा आधार घेत आंदोलन केले होते. त्याला भाजपच्या 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे'ने आक्षेप घेतला. त्याची तक्रार थेट केंद्र सरकारकडे केली गेली. रोहितला पुरेसे अनुदान न मिळाल्याने त्याला

पैसे भरता आले नाहीत. रोहितसह काही विद्यार्थ्यांना हॉस्टेलबाहेर काढण्यात आले. त्याविरोधात रोहितने आंदोलन केले होते. या सर्व घटनांबद्दल तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी लोकसभेत दिलेल्या निवेदनामध्ये भावनेचा लवलेश नव्हता. स्मृती इराणी यांनी रोहितचा उल्लेख 'तो लहान मुलगा' (चाइल्ड), असा केला होता. वास्तविक, रोहित २६ वर्षांचा होता, पीएच. डी.चा विद्यार्थी होता. महाविद्यालयीन तरुणाला 'लहान मुलगा' असा उल्लेख करून, 'खेळता खेळता मुलगा पडला', असे सहजपणे सांगावे, तसा कुठल्याही गांभीर्याविना इराणी यांनी रोहितचा उल्लेख केला होता. या प्रकरणाच्या सरकारच्या हाताळणीवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले तरी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हस्तक्षेप करण्याचे टाळले. केंद्र सरकारने रोहित विमुलाच्या घटनेसंदर्भात मागितलेल्या अहवालात रोहित हा दलित नाही, असे अनुमान काढले गेले होते. केंद्र सरकारनेही रोहितचे दलित असणे नाकारले होते. रोहित हा ओबीसी समाजातील असून त्याने वैयक्तिक कारणांमुळे आत्महत्या केल्याचे सरकारनेही मानले होते; पण अखेर गुंटूर जिल्हाधिकाऱ्यांनी रोहित हा दलित असल्याचा पुरावा सादर केल्यानंतर केंद्र सरकार आणि भाजपची दलितांबद्दल असलेली भेदभावाची मानसिकता उघड झाली!

**दलित, आदिवासी आणि ओबीसींना वगळण्यात आले**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख म्हणजे सरसंघचालक (विद्यमान) मोहन भागवत यांनी २०१५ मध्ये, आरक्षणाच्या धोरणाचा फेरविचार केला पाहिजे, असे जाहीरपणे सांगितले होते. समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना दहा टक्के आरक्षण देणाऱ्या घटनादुरुस्तीला वैध ठरवणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामध्ये न्या. पारदीवाला यांनीही हीच भूमिका घेतली होती. आरक्षणाची तरतूद अनंतकाळासाठी असू शकत नाही, असा त्यांचा सूर होता. आर्थिक दुर्बल घटकांना आरक्षण देण्याच्या धोरणाचा कोणत्याही राजकीय पक्षाने विरोध न करणे भाजपच्या पथ्यावर पडले आहे. या धोरणाला हात घातला तो काँग्रेसने. त्यासाठी तत्कालीन मनमोहन सिंग सरकारने समिती नेमली होती, या समितीच्या अहवालाच्या आधारे काँग्रेस सरकारने आर्थिक दुर्बलांना आरक्षण देणाऱ्या तरतुदींच्या विधेयकाचा मसुदा तयार केला होता. त्याची अंमलबजावणी भाजप सरकारने घटनादुरुस्तीद्वारे केली. संविधानाने आरक्षणाची तरतूद करताना सामाजिक-राजकीय मागासपणाचा आधार घेतला होता, त्यातून दलित, आदिवास, मुस्लीम, तसेच अन्य मागास घटकांना विकासाच्या संधी मिळू शकतील व सामाजिक-राजकीय मागासलेपणावर कायमस्वरूपी मात करता येईल, हा विचार होता; पण आर्थिक आधारावर आरक्षणाची तरतूद करून आरक्षणामागील मूळ विचार बोथट झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये आर्थिक मागासांच्या दहा टक्के आरक्षणातून दलित, आदिवासी आणि ओबीसींना वगळण्यात आले आहे. त्यामुळे प्रामुख्याने दक्षिणेकडील राज्यांमध्ये तुलनेत कमी असलेल्या उच्चवर्णीयांना अधिक आरक्षण मिळणार असल्यामुळे तामिळनाडूमध्ये आर्थिक दुर्बलांच्या आरक्षणाला कडाडून विरोध होताना दिसतो.



## संविधानातील दोन शब्द हेगडे यांना खटकले होते!

भारतीय संविधानाने सर्व धर्मांतील आणि जातींतील व्यक्तीला जगण्याचा समान हक्क दिलेला आहे. इथे प्रत्येकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. ज्या वंचित-शोषित समाजाला विकासाच्या समान संधी मिळाल्या नाहीत, त्यांना आरक्षणाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याची तरतूद संविधानाने करून दिली आहे. रोहितच्या प्रकरणामध्ये केंद्र सरकार आणि भाजपने रोहितचे कुटुंब दलित असल्याचेही नाकारले होते. ही कृती जगण्याचा समान हक्क नाकारणारी होती; पण हा हक्क नाकारताना भाजपने संविधानातील तरतुदी छुप्या रीतीने वाकवल्या आहेत, मूल्यांना बगल दिली आहे. केंद्रात भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) सरकार आल्यानंतर, सातत्याने राज्यघटनेतील मूल्यांशी तडजोड केली जात असल्याचा आरोप केला जाऊ लागला. भाजपला संविधान 'दुरुस्त' करायचे असल्याचा आरोपही होत असतो. २०१७ मध्ये तत्कालीन केंद्रीय मंत्री अनंतकुमार हेगडे यांनी राज्यघटना बदलण्याची गरज बोलून दाखवली होती. त्यावरून संसदेतही गदारोळ झाला होता. संविधानामधील 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवाद', असे दोन शब्द हेगडे यांना खटकले होते. स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणण्याचे खूळ लोकांमध्ये पसरलेले आहे. स्वतःची ओळख नसलेले लोक स्वतःला धर्मनिरपेक्ष मानतात. तुम्ही कोणत्या जातीचे वा धर्माचे आहात, त्या जातीचा-धर्माचा अभिमान बाळगला तरी चालेल. कोणी मुस्लीम असेल, कोणी ख्रिश्चन, कोणी लिंगायत, कोणी ब्राह्मण वा हिंदू... तुम्ही कोणी असा; पण आपल्या धमन्यांमध्ये कोणाचे रक्त वाहत आहे, हे न समजून घेता लोक स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणत असतील तर ते मान्य केले जाणार नाही, असे हेगडे म्हणाले होते. हेगडेंच्या म्हणण्याचा अर्थ होता, व्यक्तीचे अस्तित्व जात आणि धर्मावर अवलंबून असते. तीच व्यक्तीची ओळख असते. संविधानाने जाती-धर्मावरील राजकारण-समाजकारण नाकारलेले आहे; पण भाजप धर्मनिरपेक्षतेवरील राजकारण अमान्य करतो.

**हिंदूव्यतिरिक्त अन्य धर्मांतील लोक दुय्यम नागरिक!**

संविधानाने प्रत्येकाला धर्माचे स्वातंत्र्य दिलेले आहे; पण धर्माच्या आधारे राजकारण करण्याची अनुमती दिलेली नाही. धर्मसंस्था आणि राज्यसंस्था वेगळे करण्याचे मूलभूत कार्य संविधानाने केलेले आहे; पण राजकारण धर्माच्या आधारेच करायचे असते, असे भाजप मानतो. संविधानाच्या गाभ्याला भाजपची विचारसरणी छेद देते. विशेषतः २०१४ नंतर, केंद्रात भाजपची सत्ता स्थापन झाल्यानंतर धर्माच्या आधारेच राजकारण केले जात आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे गोरखपूरमधील गोरखनाथाच्या मठाचे मठाधिपती आहेत, त्यांचे गुरू अवैद्यनाथ हे सावरकरवादी होते, त्यांनी सावरकरांचे हिंदुत्वाचे विचार अग्रणी मानले होते. धर्मविरहित राजकारण होऊ शकत नाही, असे ते मानत. अवैद्यनाथ हेदेखील गोरखपूरमधून लोकसभेचे खासदार झाले होते. त्यांचे शिष्य आदित्यनाथ यांनी हिंदू धर्माच्या 'रक्षणा'साठी 'हिंदू युवा वाहिनी' ही शस्त्रधारी तरुणांची संघटना उभी केली. या संघटनेच्या ताकदीवर योगी आदित्यनाथांनी उत्तर प्रदेशच्या राजकारणातही ताकद निर्माण केली आणि संघाच्या आशीर्वादाने योगी मुख्यमंत्री झाले! भाजपने जितक्या उघडपणे धर्माच्या आधारे राजकारण केले तितके कुठल्याही पक्षाने केलेले नाही. गुजरातमध्ये विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू आहे, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी जाहीरसभेमध्ये, '२००२ मध्ये आम्ही (मुस्लिमांना) धडा शिकवला, गुजरातमधील दंगली कायमच्या थांबवल्या', असे वादग्रस्त विधान केले; पण त्याबद्दल कोणीही आक्षेप घेण्याचे धाडस केले नाही! २००२ मध्ये गुजरातमध्ये झालेल्या धार्मिक दंगलींमध्ये नरसंहाराच्या 'सूत्रधारां'ना न्यायसंस्थेलाही शिक्षा ठोठावता आली नाही. बिल्किस बानोवर सामूहिक बलात्कार करणाऱ्या जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या गुन्हेगारांना 'चांगल्या वागणुकी'बद्दल सोडून दिले गेले. त्यांनी बिल्किसवर बलात्कार केला, तिच्या तीन वर्षांच्या चिमुकल्या मुलीसह ७ जणांची हत्या केली. इतके निर्घृण कृत्य करणारे सगळेच उच्चवर्णीय होते, त्यांना 'संस्कारी ब्राह्मण' म्हणणारे माजी मंत्री चंद्रसिंह राऊलजी यांना ग्रोध्रा विधानसभा मतदारसंघातून भाजपने उमेदवारी दिलेली आहे. गुजरातमध्ये मुस्लीम वस्त्यांची ''पाकिस्तान'' अशी अवहेलना केली जाते. धर्माच्या आधारे होत असलेल्या राजकारणाचे हे 'गुजरात प्रारूप' आहे. झुंडबळीमध्ये मुस्लिमांना झालेली मारहाण, हत्यांचा भाजपच्या नेतृत्वाने कठोर शब्दांत निषेध केलेला नाही. गोहत्या केल्याच्या आरोपाखाली मुस्लिमांना मारहाण करणाऱ्या आरोपींना जामिनावर सोडले गेले आणि भाजपचा मंत्री हारतुरे घालून त्यांचे स्वागत करतो. आपल्या मंत्र्याच्या या कृत्याला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कधीही आक्षेप घेतला नाही. भाजपकडून विधानसभा वा लोकसभा निवडणुकीत एकही मुस्लीम उमेदवार उभा केलेला नाही. हिंदू आणि मुस्लिमांचा 'डीएनए' एकच आहे, असे विधान सरसंघचालक मोहन भागवत यांनी करणे म्हणजे देशात फक्त हिंदू आहेत, अन्य धर्माला स्थान नसल्याचे द्योतक ठरते. हिंदूव्यतिरिक्त अन्य धर्मांतील लोक दुय्यम नागरिक असल्याचे अप्रत्यक्षरीत्या बिंबवले जात आहे.



गुजरात दंगलीतील प्रतिकात्म छायाचित्र

**...तर अनेक भारतीय मुस्लीमही 'घुसखोर' ठरवले जातील**

कुठल्याही चर्चेविना काश्मीरचा विशेषाधिकार काढून घेतला गेला, राज्यघटनेतील अनुच्छेद ३७० रद्द केले गेले. विशेषाधिकार रद्द करण्याचा निर्णय जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत चर्चेनंतर घ्यायला हवा होता. तिथल्या लोकांशी संवाद साधून घ्यायला हवा होता; पण लोकशाही पद्धतीने कोणतेही निर्णय घेता येत नाहीत, असा भाजपच्या नेत्यांचा दावा असतो. लोकांना विचारले तर कधीच अनुच्छेद ३७० रद्द करता येणार नाही. त्यापेक्षा निर्णय घेऊन टाका, तो अमलात आणा. नंतर, लोकांनी विरोध केला तरी चालेल, तो मोडून काढता येतो वा कालांतराने तो मावळतो, असा विचार त्यामागे असतो. अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतर काश्मीर खोऱ्यात संचारबंदी लागू केली होती. तिथल्या नेत्यांची धरपकड झाली, त्यांना नजरकैदेत ठेवले गेले. नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारुख अब्दुल्ला लोकसभेत का आले नाहीत, त्यांना अटक केली का, असा प्रश्न केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना सभागृहात विचारला गेला होता. त्यावर, त्यांना अटक










केलेली नाही, ते आजारी असल्याने लोकसभेत हजर राहिले नसावेत, असे उत्तर शहांनी दिले होते; पण वास्तवात, फारुख अब्दुल्ला नजरकैदेत होते, त्यांना घर सोडून जाण्याची परवानगी नव्हती. काश्मीर खोऱ्यातील अनेक नेत्यांना वर्षभर घरात कोंडून घातलेले होते. काश्मीरमधील संभाव्य विरोध संचारबंदी लागू करून मोडून काढला गेला. सध्या काश्मीरमध्ये अस्वस्थ शांतता आहे, त्याचा स्फोट होणारच नाही, असे कोणीही ठामपणे म्हणू शकत नाही. नागरिकत्व कायद्यात (सीएए) दुरुस्ती केली गेली. भारताशेजारील देशांमध्ये तिथल्या अल्पसंख्य समाजाला धार्मिक अत्याचारांना सामोरे जावे लागत असेल, तर भारतात आश्रय घेणाऱ्या परदेशी अल्पसंख्य नागरिकांना भारताचे नागरिकत्व बहाल करण्यासाठी कायद्यामध्ये दुरुस्ती केली गेली; पण या दुरुस्तीतून बांगलादेशाला वगळण्यात आले. बांगलादेशातून आलेले मुस्लीम 'घुसखोर' ठरत असल्यामुळे त्यांची रवानगी केली जाईल; पण इथल्या मुस्लिमांना भीती वाटते, की कागदपत्रे दाखवण्यास असमर्थ ठरणारे अनेक भारतीय मुस्लीमही 'घुसखोर' ठरवले जातील. 'सीएए'च्या सोबत राष्ट्रीय नागरिकत्व दस्तऐवजाअंतर्गत (एनसीआर) यादी तयार करण्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे. आसामनंतर अन्य राज्यांमध्येही 'एनसीआर'ची अंमलबजावणी होईल. या प्रक्रियेमध्ये भारतीय मुस्लीम भरडले जाऊ शकतात. त्यामुळे सीएए आणि एनसीआर या दोन्ही प्रक्रियांना देशभरातील मुस्लिमांनी विरोध केला, त्याला देशभरातून पाठिंबा मिळाला होता. दिल्लीत 'शाहीन बाग' हे या आंदोलनाचे प्रमुख केंद्र बनले होते. शाहीन बागेतील आंदोलनाला बदनाम कोणी केले हे सांगण्याची गरज नाही! शाहीन बागेतील आंदोलन उग्र बनले असताना दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीचा प्रचारही जोरात सुरू होता. भाजपच्या प्रचाराची धुरा प्रामुख्याने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे होती. त्यांनी शाहीन बागेतील आंदोलनाला 'तुकडे तुकडे टोळी'ची फूस असल्याचा, इथले आंदोलक देशविरोधी असल्याचाही आरोप केला होता. शहांनी म्हटल्याप्रमाणे अशी खरोखरच तुकडे तुकडे टोळी देशात आहे का, असा लेखी प्रश्न संसदेत विचारला गेला होता. त्यावर, केंद्रीय गृहमंत्रालयाने, अशी कुठलीही टोळी नसल्याचे उत्तर दिले होते. मग, ही टोळी आली कुठून? शहा देशाची दिशाभूल का करत होते? विधानसभा निवडणुकीसाठी शहांनी ध्रुवीकरणाचे राजकारण केले होते. याच निवडणुकीत शाहीन बागेच्या आंदोलकांना उद्देशून 'गोली मारो सालों को...', असे वादग्रस्त विधान तत्कालीन केंद्रीय राज्यमंत्री अनुराग ठाकूर यांनी केले होते. प्रक्षोभक भाषण केल्याबद्दल भाजपच्या एकाही नेत्यावर केंद्रीय निवडणूक आयोगाने कारवाई केली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अनुराग ठाकूर यांचा निषेध केलेला दिसला नाही. उलट, ठाकूर यांना बढती देऊन केंद्रीय मंत्रिपदी बसवले गेले. गेल्या लोकसभा निवडणुकीत मोदी आणि शहांच्या प्रक्षोभक विधानांवर आक्षेप घेत कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका घेणारे तत्कालीन केंद्रीय निवडणूक आयुक्त अशोक लवासा मुख्य केंद्रीय निवडणूक आयुक्त होऊ शकले असते; पण त्यांनी राजीनामा देऊन प्रशासनामधून बाहेर पडणे पसंत केले.




संविधानाचा फेरविचार करण्याची भूमिका भाजपने फक्त मोदी-शहांच्या काळात घेतलेली नाही. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात १९९८ मध्ये एनडीए सरकारने व्यंकटचलय्या आयोग नेमलेला होता; पण तीव्र विरोधानंतर तो बरखास्त करण्यात आला. २०१५ मध्ये केंद्र सरकारने प्रजासत्ताकदिनी दिलेल्या जाहिरातीत संविधानाच्या प्रस्तावनेतील 'धर्मनिरपेक्ष' आणि 'समाजवाद' हे दोन्ही शब्द वगळण्यात आले होते. ही सगळी उदाहरणे संविधानाला झुगारणे नव्हे तर, मग काय आहे? •••

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# भारत जोडो... आत आणि बाहेर



उत्तम कांबळे

**एक गोष्ट लक्षात आली, की विरोधकांनी पप्पू म्हणून हेटाळणी केलेले राहुल गांधी कधीच संपले होते आणि त्या जागी राष्ट्र, समाज आणि माणूस यांची भाषा करणारा, त्यासाठी काहीही करण्याची तयारी असलेला एक लढाऊ आणि परिपक्व नेता आम्हाला दिसला. भारत यात्रा काँग्रेसच्या प्रचारासाठी आहे याचा वासही येणार नाही, असं त्यांचं विचार व व्यवहार वर्तन होतं.**

भारतीय माणसाचं जत्रा-यात्रांशी एक जैविक नातं आहे. सांस्कृतिक, आध्यात्मिक, धार्मिक आणि समूह जीवनाच्या गरजा भागवण्यासाठी देवा-धर्माच्या दारात वर्षानुवर्षे जत्रा-यात्रा भरत असतात. छोट्या-मोठ्या जत्रा-यात्रा गर्दी खेचतात. यात्रांमध्ये जशी धार्मिक भावनांची गर्दी असते तसे तेथे एक अर्थकारण तयार होत असते आणि धार्मिक राजकारणही तयार होत असते. देवा-धर्माच्या बाहेर राहूनही यात्रा काढण्याचीही परंपरा आपल्याकडे आहे. स्वातंत्र्य चळवळीत ती ठळकपणे सुरू झाली. व्यापक जन प्रबोधन, राजकीय शिक्षण, जागृती वगैरे गोष्टी त्यामागे असतात. भारतात ब्रिटिश अमदानीत असा पहिला प्रयोग केला तो १९२० च्या दरम्यान भारतातील स्वातंत्र्य चळवळीत स्थिर झालेल्या आणि पुढे तिचे जनकत्व पत्करलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी. आजपासून ९२ वर्षे आठ-नऊ महिन्यांपूर्वी म्हणजेच १२ मार्च १९३० रोजी मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी यात्रा काढली. साबरमती आश्रमापासून दांडीपर्यंत २३९ मैल म्हणजेच ३८५ किलोमीटर ती चालली. सहा एप्रिलला दांडीच्या समुद्रकिनारी जाऊन तिने मूठभर मीठ उचलले. गांधींना या सत्याग्रहामुळे खूप मोठा लौकिक प्राप्त झाला. मीठ उचलणे आमचा हक्क आहे, असे सत्याग्रही सांगत होते. या आंदोलनात मीठ किती उचलले गेले यापेक्षा असहकार आंदोलन यशस्वी करता हे सिद्ध झाले. स्वातंत्र्य चळवळ बरीच वर्षे वरच्या वर्गाशी जोडली गेली होती. ती सामान्य माणसांपर्यंत पोहोचली.

स्वातंत्र्यसैनिक होण्यासाठी बाकी कसलीही पात्रता नसली तरी चालेल; पण मूठभर मीठ उचलण्याची आणि त्यासाठी संघर्ष करण्याची ताकद असली पाहिजे, एवढाच संदेश महात्मा गांधींनी दिला होता. अनेक लोक सत्याग्रहात सहभागी झाले आणि स्वातंत्र्य चळवळ सामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी, तिचे सामाजिकीकरण होण्यासाठी मदत झाली. सामान्य माणूस ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभा राहू शकतो आणि पोलादी चौकटीला धक्के मारत असहकार आंदोलन करू शकतो हे



पुढे इतिहास बनलेल्या दांडी यात्रेने किंवा मिठासाठीच्या सत्याग्रहाने सिद्ध करून दाखवले. दांडी यात्रा स्वातंत्र्याची भक्ती करण्यासाठी, कोणत्याही त्यागास तयार असलेल्या फाटक्या-तुटक्या माणसांची होती आणि तिचे नेता होते महात्मा गांधी. असहकार आंदोलनात



**महात्मा गांधी यांची दांडी यात्रा...**




**अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली काढण्याच आलेली रथ यात्रा**



**चंद्रशेख यांची भारत पदयात्रा**

साठ हजार लोकांनी तुरुंगवास भोगला होता. हा मोठा विक्रम होता.

स्वातंत्र्यानंतरही वेगवेगळ्या कारणांसाठी छोट्या-मोठ्या यात्रा निघाल्या. श्रमिक, महिला, शेतकरी वगैरे घटक आपले प्रश्न मांडण्यासाठी या मार्गाचा वापर करत होते. कोणी त्यांना 'लाँग मार्च' असेही नाव दिले होते. यात्रांचे महत्त्व काय असते, हे हिंदुत्ववादी विचारधारेच्या भाजपला कळले नसेल तर नवल म्हणावे लागेल. १९५१ ला हिंदुत्ववाद्यांचे जनसंघ या नावाने संघटन झाले होते. श्यामा प्रसाद मुखर्जी त्याचे संस्थापक व भारत भूषण पांडे अध्यक्ष होते. नेहरूंच्या म्हणजे काँग्रेसच्या मंत्रिमंडळात मुखर्जी मंत्री होते. नेहरू-लिकायत कराराला विरोध करण्यासाठी त्यांनी राजीनामा दिला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मदतीने जनसंघाची स्थापना झाली. हिंदू महासभेतही ते नेते होते. १९५२ च्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाने तीन जागा जिंकल्या होत्या. सहा एप्रिल १९८० ला जनसंघाचे रूपांतर भारतीय जनता पक्षात झाले. तोपर्यंत जनसंघाने पहिल्या निवडणुकीत साडेतीन टक्के मते मिळवली होती. दरम्यान बरेच पाणी वाहून गेले. आणीबाणी आली, जनता पक्षाची सत्ता आली, जयप्रकाश नारायण यांचे नेतृत्व आले. जनसंघावर या साऱ्या घटना घडामोडींचा परिणाम होत होता. १९८४ मध्ये श्रीमती इंदिरा गांधींची हत्या झाल्यानंतर जी निवडणूक झाली तीत भाजपला फक्त दोन जागा मिळाल्या होत्या. असा कोणता तरी विषय भाजपला हवा होता, की ज्यामुळे संसदेत आपले स्थान बळकट होईल. शेवटी लालकृष्ण अडवाणी यांच्या कारकिर्दीत राम जन्मभूमीला पुन्हा एकदा नेटाने हात घालण्यात आला आणि निवडणूक, राजकारण व समाजकारणात हाच विषय मुख्य बनवण्यात आला. रामजादे-हरामजादे वगैरे गोष्टी याच काळात जन्माला आल्या. दोन धर्मांमध्ये संघर्षाची एक ठळक रेष ओढण्यात आली. १९८९ च्या लोकसभा



निवडणुकीत ८५ जागा घेणाऱ्या भाजपला संपूर्ण सत्ता मिळवण्याचे वेध लागले होते. त्यातून अडवाणींच्या रथयात्रेला सुरुवात झाली. राम राजकारणाचा केंद्रबिंदू झाला. धार्मिक उन्मादाचेही वातावरण तयार झाले होते. मंडल आयोगाच्या अहवालाला अमान्य करण्याचा विषय होता. हिंदुत्ववादी संघटनांनी मंडल विरुद्ध कमंडल, असा पेच टाकला. सोबत रामजन्मभूमीचा विषय होता. 'मंदिर वही बनायेंगे' ही आक्रमक घोषणा होती. रथयात्रेने रोज तीनशे किलोमीटर अंतर एअर कंडिशण्ड मोटारीने कापून दहा हजार किलोमीटरचा पल्ला पूर्ण केला होता. गुजरातेत तेव्हा मुख्यमंत्री असलेल्या मोदी यांनी आपल्या राज्यातही स्वतंत्रपणे रथयात्रा फिरवली होती. त्रिशूल आणि भगवे घेऊन सहाशे गावांत ती फिरली. इकडे अतिशय सुंदर रीतीने सजवलेल्या टोयाटो गाडीत धनुष्यबाण घेऊन अडवाणी बसलेले होते. रथयात्रेने प्रचंड सामाजिक आणि धार्मिक तणाव तयार केला आणि सहा डिसेंबर १९९२ ला बाबरी मशीद पाडण्यात आली. अर्थात, हे सहजासहजी झाले नव्हते. एक सप्टेंबर ते २० नोव्हेंबरदरम्यान १६६ छोट्या-मोठ्या धार्मिक दंगली झाल्या होत्या. त्यात साडेपाचशेहून अधिक लोक ठार झाले होते. त्यात पन्नास कारसेवक होते. मशीद पाडण्याच्या काळात दोन हजार लोक ठार झाले होते. ते दोन्ही धर्मांतील होते. पुढे गोध्रा हत्याकांडात ५८ हिंदू ठार झाले. मुंबईत लोक मारले गेले होते. पुढे २००२ च्या दंगलीत एक हजार मुस्लीम ठार झाले. हे प्रकरण असे बरेच मोठे करता येईल; पण या लेखाचा संबंध फक्त संदर्भापुरताच आहे, तर १९८९ मध्ये ८५ जागा जिंकणाऱ्या भाजपचा संसदेतील आलेख वाढतच गेला. १९९१ मध्ये १२०, १९९५ मध्ये १६१, १९९८ मध्ये १८२, १९९९ मध्ये १८२, २००४ मध्ये १३८, २००९ मध्ये ११६ (म्हणजे आलेख खाली आला), २०१४ मध्ये २८२ आणि २०१९ मध्ये भाजप स्वबळाच्या पुढे म्हणजे ३०३ वर गेला. हिंदुत्ववादी विचारांचे टॉनिक आणि रथयात्रेची पाऊलचिन्हे या गोष्टी यशाला जबाबदार होत्या. विशेष म्हणजे भाजपला स्वबळावर जेव्हा सत्ता स्थापन करण्यात आली तेव्हा २०१४ च्या सरकारमध्ये रथयात्रेचे शिल्पकार आणि कडवे हिंदुत्ववादी अडवाणी यांना स्थान नव्हते. २०२४ ला भारताचे हिंदू राष्ट्रात रूपांतर होईल, अशी तारीख भागवत यांच्या पंचांगातून बाहेर पडली आहे. भारतात चंद्रशेखर यांनी १९८३ मध्ये भारत पदयात्रा काढत चार हजार किलोमीटरचे अंतर कापले होते. या यात्रेत मीही होतो. अडवाणी यांची रथयात्राही पाहिली होती. त्यावेळी इंदिरा गांधी पंतप्रधान आणि प्रसिद्धीच्या शिखरावर होत्या. आज नरेंद्र मोदी आहेत.

यात्रा-जत्रांच्या पार्श्वभूमीवर आणि वेगळ्या राजकीय परिस्थितीत काँग्रेसचे नेते, गांधी घराण्याचे वारसदार आणि खासदार राहुल गांधी यांची 'भारत जोडो' यात्रा निघाली आहे. या लेखाला प्रारंभ करताना 'भारत जोडो' यात्रेचे वय ७५ दिवस होते. ती सहा राज्यांतील २६ जिल्ह्यांत फिरली. तीन दिवसांपूर्वी मध्य प्रदेशात ती प्रवेशकर्ती झाली. पुढे ती काश्मीरमध्ये पोहोचणार आहे. या यात्रेने 'न भूतो न भविष्यति', असे यश मिळवले आहे. इतकी गर्दी, इतका प्रतिसाद यापूर्वी कोणत्याही यात्रांना मिळाला नव्हता. लोकांच्या गर्दीला मर्यादा राहिलेली नाही. जगभरातून लोक येत आहेत. कारण या यात्रेचा उद्देश भारत जोडण्याचा म्हणजे माणसाशी माणूस जोडण्याचा आहे. याचा अर्थ भारताची बांधणी कोणी तरी विस्कळीत केली आहे. विस्कळीत भारत टिकू शकत नाही, वेगवेगळ्या घटकांचे मनोमिलन होऊ शकत नाही, द्वेषाच्या लाटा मनामनाला धडकायला लागतात... माणूस आपापल्या जाती-धर्माचे झेंडे घेऊन एकमेकांवर चाल करायला लागतो, जाती न्यायालयाची जागा घेऊ लागतात... माणसाची ओळख त्याच्या धर्माशी जोडली जाते, लोकशाही पद्धतीनेच संविधानाचा संकोच होतो... घटनात्मक संस्था आकसायला लागतात... लोकांप्रती असलेली आपली बांधीलकी आणि निष्ठा गमवायला लागतात... बुजगावण्यासारखी त्यांची अवस्था होते... जगण्याचे प्राधान्यक्रम बदलले जातात... घर देवासाठी बांधायचं, की माणसांसाठी, देवाच्या जन्म तारखा कशा शोधायच्या, महापुरुषाविषयीच्या श्रद्धा एकदम पातळ व्हायला लागतात, प्रार्थना

विरुद्ध प्रार्थना, अशा काही झुंजी तयार होतात... समाजमनाला असुरक्षित वाटायला लागतं... अजून बरंच काही होतं... २०२४ ला हिंदू राष्ट्र येणार असेल, तर अन्य धर्मीयांचं त्यात स्थान कसं असेल, सगळ्यांचाच डीएनए एकच असेल, तर मग अन्य धर्मीयांचं काय असेल. किती तरी प्रश्नांची गर्दी गेल्या काही वर्षांत आपल्याभोवती जमली आहे. हे असं का आणि ते तसं का, असा प्रश्न विचारणारा आवाजही क्षीण होत आहे. हे सारं काही आपोआप घडलेलं नाही. त्यामागेही कुणाची तरी शंभर वर्षांची धडपड आहे. डावपेच आहेत. आता कुठं त्यांना आपल्या स्वप्नांना पंख देण्याची संधी मिळाली आहे. एकीकडे सैतानी बहुमत मिळवत विरोधी पक्षमुक्त भारत करण्याचे प्रयत्न, दुसरीकडे हिंदुत्वाला राजकारणात आलेलं प्रचंड महत्त्व, यामुळे 'जो हिंदुत्व की बात करेगा, वही राज करेगा' असं सांगितलं जातंय... त्यातून जहाल हिंदुत्व विरुद्ध मवाळ हिंदुत्व आणि हिंदुत्व विरुद्ध अहिंदुत्व, असे पेच तयार झाले आहेत. शिवसेनेचं हिंदुत्व मवाळ झालं म्हणून ती फोडण्यात आली, असं समर्थन होऊ लागलं... कोण कुठं जाईल आणि काय करेल, कोण कुणाच्या छातीचं माप घेईल आणि आपलीच छाती कशी मोठी करेल, कोण महात्मा गांधींना पुन्हा पुन्हा मारेल आणि कोण नथूरामच्या स्मारकाची घोषणा करेल, याचा काही मेळ राहिलेला नाही. अस्वस्थ करणारी आणि गोंधळात भर टाकणारी परिस्थिती घेऊन आपण जगत आहोत. माणसाला असुरक्षित वाटायला लागलंय. कारण त्याला सुरक्षितता देणाऱ्या संविधान आणि संविधानाने जन्मास घातलेल्या व्यवस्थांचा संकोच होतोय... संविधानाचा रंग बदलण्याची आणि मुळातच ती बदलण्याची भाषा बोलली जातेय. अराजक वगैरे जे काही म्हणतात त्याचा पाळणा अनेक ठिकाणी हलताना दिसतोय. या साऱ्यांचे परिणाम राष्ट्र, समाज आणि माणसामाणसांतील ऐक्यावर होतच असतात. तडा जाणारी काच आणि तडा जाणारा माणूस जुळवणे तसे कठीण असते. माणसाला गेलेले तडे समाजावरही दिसायला लागतात. जगभर मूलतत्त्ववादाची लाट सुरू आहे. भारतही त्याला अपवाद राहिलेला नाही. या सर्वांवर अनेक उपाय करता येतात. त्यातला एक उपाय म्हणजे व्यापक जन प्रबोधन करण्याचा.

द्वेष, असूया, नफरत सोडून राष्ट्रांशी जोडून घेण्याची, धर्मांधतेला सोडून निधर्मीवादाला जोडून घेण्यासाठी प्रबोधन करण्याची मोठी गरज निर्माण झाली. जगभर छोटे-मोठे गट, नेते त्यासाठी प्रयत्न करत आहेत. भारतात त्याला हात घातला राहुल गांधींनी. एका अर्थाने प्रवाहाच्या विरोधात जाण्याची ही जोखीम आहे. असाच प्रयत्न केल्याने महात्मा गांधी, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांची हत्या झाली होती, याला जग साक्षी आहे. जेव्हा गांधींनी धर्म सुधारणांची भाषा सुरू केली तेव्हाच त्यांच्या मागे कोणी तरी धावत होता. खलिस्तानचा धोका संपवून राष्ट्राच्या ऐक्यासाठी इंदिरा गांधींनी जोरदार प्रयत्न केला तेव्हाही त्यांच्या आसपास मृत्यू फिरू लागला. राजीव गांधींचेही तसेच झाले. राष्ट्र, समाज आणि धार्मिक ऐक्यासाठी झालेले हे बलिदान आपण पाहिले आहे. मूलतत्त्ववाद नेहमी कासवाप्रमाणे पाय पोटात घेऊन बसलेला असतो. ढग बाहेर गेले, की तो पाय बाहेर काढतो. आताही तसंच कुठंतरी घडतंय, कुणीतरी घडवतंय. या सर्व गोष्टींवर एकच उत्तर होतं आणि ते म्हणजे देश जोडणाऱ्या घटकांपर्यंत, विचारांपर्यंत पोहोचायचं आणि मूलतत्त्ववादाच्या गुंगीत डुलत असणाऱ्या सामान्य माणसाला जागं करायचं. राहुल गांधींनी तो मार्ग स्वीकारला. कारण बलिदानाची, त्यागाची, समर्पणाची आणि सर्वांपेक्षा देश मोठा आहे, असं सांगण्याची परंपरा त्यांना तीन गांधींनी दिली आहे.

मोदी सत्तेवर आले तेव्हा त्यांच्या अजेंड्यावर सर्वांत मोठा विषय होता तो काँग्रेसचे नामोनिशाण संपवण्याचा आणि भाजपच्या हातात




आणखी पन्नास वर्षे भारत देण्याचा. लोकशाहीत जिंकणे आणि हरणे घडतच असतं; पण खंडोबासमोर सुपारी उचलून एखाद्याला कायमचं संपवणे, याला काही लोकशाही म्हणत नाहीत. हा तर सुडाचा प्रवास झाला. राहुल गांधींचा राजकारणातील प्रवास त्यांच्या पक्षाच्या पराभवानेच सुरू झाला. मोदी लाटेसमोर ते टिकू शकले नाहीत. पक्ष दुर्बल झाला. संसदेतलं बळ कमी झालं. भाजप आणि त्यांच्या वळचणीला असलेल्या व मलिदा खाऊन बोक्याप्रमाणे झालेल्या माध्यमांनी राहुल गांधींना पप्पू म्हणायला सुरुवात केली. हीच प्रतिमा रुजवण्यात आली. ते काही करोत, कितीही पोटतिडकीनं बोलोत; पण या सर्वांचं एकच पालुपद पप्पू कान्ट डान्स साला! याही परिस्थितीत राहुल गांधी खचले नाहीत. राजकारण, धर्म आणि राष्ट्र याची गल्लत न करता त्यांनी वागायचे ठरवले. एकीकडे अंतर्गत कलह आणि बाह्य आघातांनी काँग्रेस क्षीण होत चालली, घराणेशाहीच्या आरोपाखाली घायाळ होत चालली, अनेक वर्षे सत्तेत लोळून बोके बनलेल्या

काही दोन डझन नेत्यांचा स्वतंत्र गट तयार झाला. पंखाखाली जपून ठेवलेली अनेक राज्ये कमळाच्या पाकळीत अडकली. एका विलक्षण स्थितीत अडकलेल्या पक्षाची सर्व पदे राहुल गांधींनी सोडून दिली. पक्षांतर्गत निवडणुका जाहीर झाल्या. एका निराकारी माणसाप्रमाणे राहुल रस्त्यावर आले आणि 'नफरत सोडून देश जोडा' असा नारा देत इतिहासातील सर्वांत मोठी यात्रा सुरू केली. यात्रेत जाण्याचा आम्ही काही जण विचार करीतही होतो. बराच दिवस विचार सुरू होताही. एक दिवस काँग्रेस अध्यक्ष खरगे यांच्या वतीने निरोप आला, की २० नोव्हेंबरला शेगावजवळ राहुल गांधी यांच्याशी मुलाखत करायचीय. त्यांनी अर्धा तास देऊ केला आहे. या धडपडीमागे चेतन शिंदे होता. ऐनवेळी तारीख आणि वेळ बदलण्यात आली. २० ऐवजी १९ तारीख करण्यात आली. रेल्वेची तिकिटे आदल्या दिवशी काढण्यात आली; पण ती कन्फर्म झाली नाहीत. शेवटी नाशिकमधून रात्री ८.००-८.३० वाजता मोटारीने निघालो. 'चलो भारत जोडो यात्रा, चलो जलंब..'.

रात्रभर प्रवास करत सकाळी सहाच्या सुमारास आम्ही खामगावला तुळजाई हॉटेलमध्ये पोहोचलो. देशमुख नावाच्या एका नेत्यानं कार्यकर्ते आणि नेत्यांसाठी संपूर्ण हॉटेलच आरक्षित केलं होतं. शेगावमध्ये तर एक खोलीही मिळणं अवघड होतं. शेगावच्याच दीपक नावाच्या आमच्या एका चाहत्यानं तुळजाईमध्ये दोन खोल्या मिळवून दिल्या. ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे यांच्या नेतृत्वाखाली आमची छोटी तुकडी होती. त्यात प्रा. नागार्जुन वाडेकर होते. तो यापूर्वी दोन वेळा यात्रेत चालून आला होता. युवा उद्योजक आबासाहेब थोरात, चेतन शिंदेही होता. सुखदेव थोरात, यशवंत मनोहर येणार होते; पण ते आले नव्हते. सकाळी तयार होऊन आम्ही निघालो. आमची मुलाखत साडेदहाऐवजी दीड वाजता ठेवण्यात आली होती. खामगाव ते जलंब हा छोटेखानी रस्ता यात्रेत चालणाऱ्या माणसांनी फुलून गेला होता. गर्दी इतकी होती, की नऊ मिनिटांच्या प्रवासाला तासभर लागणार होता. माणसांची आणि वाहनांची गर्दी किलोमीटरभर लांब होती. रस्ता, झाडे आदी मिळेल त्याठिकाणी लोक उभे होते, बसले होते, झोपलेही होते. गर्दीत एक लक्षणीय गोष्ट म्हणजे युवक-युवती, महिला आणि ग्रामीण नागरिकांची गर्दी खूप होती. हे सर्व स्वखर्चाने आणि कोणत्याही निमंत्रणाशिवाय आले होते. कन्याकुमारीपासून चालणारे आणि यात्रेच्या शेवटपर्यंत जाण्याचा निर्धार करून आलेले तीनशेक होते. राहुल गांधींच्या बरोबर, त्यांच्या मागे, अगदी शेवटी चालणाऱ्यांची संख्या रोज अंदाजे दहा हजार असते. इतकी भव्य यात्रा भारतातील अलीकडच्या इतिहासाने पहिल्यांदाच पाहिली असावी. यात्रेत कोण नव्हतं? म्हातारेकोतारे, तरणेताठे, कार्यकर्ते, नेते, आंधळेपांगळे, असे साऱ्या प्रकारचे लोक होते. या सर्वांना काही देणेघेणे मिळणार नव्हते. यात्रेत चालायचं एवढ्या एकाच विचारानं त्यांना घेरलेलं होतं. राहुल गांधी काही पदे, प्रतिष्ठा, आश्वासने, आशीर्वाद यापैकी काहीच देत नाहीत. ते फक्त ''देशाला तडा जाऊ देऊ नका, तशा प्रयत्नांना प्रतिसाद देऊ नका'' एवढेच सांगतात. आपण ज्या भोवतालात जगत आहोत त्याचं वर्णन करतात. काही तरी चांगलं करू, असा धीर देतात. लोकांना तोच ऐकायचा होता. त्यांच्या पुढे बसून, त्यांच्या मागे चालून आणि त्यांच्या हातात हात घालून रोजी वीस-पंचवीस किलोमीटर ठरल्या वेळी चालणं आणि सतत बोलत-ऐकत चालणं हे काही छोटे काम नाही. राहुल गांधींना ते अवघड वाटत नाही. कारण देशभरातील लोक हजारोंच्या संख्येने त्यांच्यासाठी जणू काही ऊर्जेचं भांडारच घेऊ येत असतात. थोडंथोडकं नव्हे, तर चार हजारांहून अधिक किलोमीटर अंतर याच गर्दीची मदत घेऊन कापायचं आहे. जवळपास रोज जाहीर सभा घ्यायची आहे. सकाळ आणि संध्याकाळच्या पदयात्रेमध्ये रोज



असंख्य शिष्टमंडळांना, कार्यकर्त्यांना, लेखक, विचारवंत, शेतकरी, कामगार, युवकांना भेटायचं आहे. त्यांचं शांतपणे आणि नम्रपणे ऐकायचं आहे, असा हा उपक्रम. जाणीवपूर्वक आणि गांभीर्याने आखणी केलेली दिसते. आम्ही जलंबमध्ये पोहोचण्याच्या आदल्या रात्री शेगावमध्ये राहुल गांधींच्या सभेला विक्रमी गर्दी झाली होती. साडेचार लाखांची ही गर्दी यापूर्वी एखाद्याला अपवादानेच लाभली असावी. कसे आले हे लोक, कोठून आले, उन्हाचा चटका आणि थंडीचा कडाका सोसत ते कसे आले असावेत, अशा अनेक प्रश्नांची गर्दी घेऊनच दुपारी सव्वा वाजता आम्ही मुलाखतीच्या ठिकाणी पोहोचलो. आमच्या अगोदरच तेथे ओबीसी कार्यकर्त्यांचे आणि विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या युवकांचेही शिष्टमंडळ होते.

छोट्याशा सभागृहात आम्ही राहुल गांधींची प्रतीक्षा करू लागलो. पहिल्या रांगेत आमच्यासाठी जागा होती. माजी केंद्रीय मंत्री

जयराम कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करत होते. स्टेजवर महाराष्ट्रातील आणि बाहेरील काही नेते होते. काही दलित नेत्यांनाही स्टेजवर बसवलं होतं. राहुल गांधींनी गेल्या काही वर्षांत समाज, देश, इतिहास, जग या साऱ्यांचा अभ्यास किती खोलवर केला आहे, याची प्रचिती थोड्याच वेळात राहुल गांधींच्या बोलण्यातून येईल, असे जयराम सांगत होते. बरोबर दीड वाजता राहुल गांधींचे आगमन झाले. उपस्थितांना नमस्कार करत मधल्या खुर्चीत ते बसले आणि मुलाखतीला सुरुवात झाली.

यात्रेच्या काळात राहुल गांधींची दाढी आणि केस वाढलेले आहेत. अंगात पांढऱ्या रंगाचा सुंदर टी-शर्ट त्यांचे तारुण्य वाढवत होता. शर्टाच्या खिशाला माइक, हसतमुख आणि ताजातवाना चेहरा पाहून यांनी दोन हजार किलोमीटर प्रवास केला असेल, असं कुणालाही वाटणार नाही.



सर्वप्रथम बोलायला उठले ते डॉ. रावसाहेब कसबे. त्यांनी आरएसएसवर खूप वर्षांपूर्वी लिहिलेला आणि गाजलेला 'झोत' हा ग्रंथ आणला होता. त्याची इंग्रजी आवृत्ती त्यांनी राहुल गांधींना दिली. गांधींनी ती मोठ्या आनंदानं स्वीकारली. मी हा ग्रंथ जरूर वाचेन, असं सांगितलं. रावसाहेबांनी आपल्या निवेदनात एकच महत्त्वाचा मुद्दा मांडला आणि तो म्हणजे वाढत्या मूलतत्त्ववादाचे स्वरूप समजावून घेणे, त्याबाबत प्रबोधन करणे यासाठी राष्ट्रीय पातळीवर एखादा फोरम असावा आणि देशभर त्याच्या शाखा असाव्यात. हा मुद्दा आपल्याला पटल्याचे गांधींनी आपला चेहरा खुलवून सांगितलं. त्यानंतर माझा नंबर आला. मी चार मुद्दे सांगितले. १) जातिअंताकडे जाणारा समाज निर्माण करण्यात आपल्याला यश का येत नाही. सर्वत्र जातीच पुन्हा प्रभावी का ठरत आहेत? २) खासगीकरणाच्या रेट्यात सर्वच सरकारी राखीव जागा संपत आहेत. अशा स्थितीत सर्वच खासगी क्षेत्रात राखीव जागा ठेवण्याचा कायदा व्हावा. ३) नव्या भांडवलशाहीने कल्याणकारी राष्ट्राच्या कल्पनेला धक्का दिला आहे आणि ४) सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या लागेपर्यंत चांगला बेकार भत्ता द्यावा आणि सर्व राजकीय पक्षांनी आपापल्या महत्त्वाच्या पदावर आरक्षण जाहीर करावे.

चारही मुद्दे गांधींनी गांभीर्यानं ऐकले; पण त्याबाबत भाष्य काही केले नाही. स्टेजवरील अन्य नेते प्रतिसाद देत होते. शिष्टमंडळातील अन्य सदस्य टाळ्या वाजवून प्रतिसाद देत होते. पीपल्स पोस्टचे संपादक चेतन शिंदे यांनीही अतिशय कमी वेळात काही महत्त्वाचे मुद्दे मांडले. त्यानंतर ओबीसी व युवकांची शिष्टमंडळे बोलती झाली.

काही मुद्द्यांवर गांधी लगेचच प्रतिसाद द्यायचे. उदाहरणार्थ, इतर मागासवर्ग हा शब्द वाईट आहे. तो मोठ्या समूहाची अप्रतिष्ठा करणारा आहे, असं आपलं मत त्यांनी नोंदवलं. जातवार गणना करण्याचा प्रश्न मी पंतप्रधान होण्याशी जोडू नका. आजच त्यासाठी संघटन करा. संघर्ष करा आणि तो तातडीनं सोडवून घ्या, असं आवाहन केलं. ओबीसींवर बोलताना त्यांनी परदेशातील उद्योगपतींचं एक उदाहरण दिलं. जगभरातील मोटार कंपन्यांचे सर्व मालक ओबीसी वर्गातून आले आहेत. भारतात तसं का घडलं नाही. टाटा, बिर्ला, बजाज आदी उच्च जातींतूनच उद्योजक आले. भारतात ओबीसींना निर्माते, व्यावसायिक मानले जात नाही. त्यांना आणि त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा दिली जात नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. काँग्रेस आम्हाला सामावून घेत नाही, आमचे प्रश्न नीट मांडत नाही, अशी तक्रार एकानं केली. त्यावर गांधी अतिशय मार्मिकपणे म्हणाले, तुम्हाला काँग्रेसविषयी काही ठाऊक आहे का? या पक्षात आत एक गाभा असतो. या गाभ्यात ज्या प्रकारचे लोक असतात त्यानुसार काँग्रेस चालते. तुम्ही बाहेर राहून काही मागू नका. आत घुसा आणि तुम्हाला हवं ते करा. बोलता बोलता त्यांनी पुरुषसूक्तही अप्रत्यक्षपणे सांगितलं. जे मुखातून जन्माला येतात ते असं म्हणत, त्यांनी जयराम यांच्याकडे बोट केलं. हशा पिकला. जवळपास चाळीस मिनिटे ते बोलत होते. सभागृहातील वातावरण कधी गंभीर व्हायचं तर कधी हलकंफुलकं...

एक गोष्ट लक्षात आली, की विरोधकांनी पप्पू म्हणून हेटाळणी केलेले राहुल गांधी कधीच संपले होते आणि त्या जागी राष्ट्र, समाज आणि माणूस यांची भाषा करणारा, त्यासाठी काहीही करण्याची तयारी असलेला एक लढाऊ आणि परिपक्व नेता आम्हाला दिसला. भारत यात्रा काँग्रेसच्या प्रचारासाठी आहे, याचा वासही येणार नाही, असं त्यांचं विचार व व्यवहार वर्तन होतं.

मुलाखतीनंतर बाहेर आल्यावर सर्वांच्याच समोर एक प्रश्न होता आणि तो म्हणजे भारत यात्रेतून काय निष्पन्न होणार? कुणाला कसला लाभ होणार? आणि २०२४ च्या निवडणुकांमध्ये काय होणार? अर्थात, हे सामान्य माणसांचे प्रश्न आहेत. राहुलजी या पलीकडे कोठेतरी पोहोचू पाहत आहेत, हे सातत्यानं आम्हाला जाणवत होतं. आता पलीकडे म्हणजे काय यासाठी थोडी वाट पाहावी लागणार आहे. तशी तयारी ठेवून आम्ही माघारी वळलो, तर पुन्हा तेच दृश्य... महापुरासारखी गर्दी पदयात्रेत चालण्यासाठी येत आहे, काही जण मिरवणुकीने, काही जण गटागटाने, तर काही अपंग तीनचाकी सायकलीत बसून... 'चलो भारत जोडो' अशी हाकीही ते देत आहेत...

●●●

**(लेखक अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष आणि सकाळ माध्यम समूहाचे माजी संचालक संपादक आहेत.)**


# संविधानाची शान



ज.वि. पवार

**ज्या देशाचे संविधान कार्यक्षम असते, तोच देश प्रगतिपथावर वाटचाल करू शकतो. जगातले सगळे देश आपल्या संविधानाचा सन्मान करतात. त्याची अंमलबजावणी करतात. भारतात हे होत नाही. कारण इथले लोक फारफार जातीयवादी आहेत. ते संविधान नाकारतात. हे संविधान नाकरले गेले, तर लोकशाही संपुष्टात येईल आणि लोकशाही संपली, तर भारताची शान नष्ट होईल. पुन्हा एकदा भारत हा मागासलेला देश म्हणून ओळखला जाऊ नये असे वाटत असेल, तर भारतीय संविधानाची शान वाढविली पाहिजे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार आहेत. हे भारतीय संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान स्वीकृतीसमयी केले असले, तरी १९४९ पासून हे श्रेय बाबासाहेबांना देण्यात भारतीयांची हिंदू मानसिकता तयार नव्हती आणि म्हणून अनेक नेते आणि अभिनेते डॉ. आंबेडकर हे संविधान निर्माते नाहीत, अशी कोल्हेकुई करीत राहिले. याचे कारण बाबासाहेब हे अस्पृश्य समाजातील होते अन् दुसरे म्हणजे त्यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी हिंदू संहिता असलेली मनुस्मृती दहन केली होती. आपल्या धर्मग्रंथाला आव्हान देणाऱ्या, त्याचे दहन करणाऱ्या डॉ. आंबेडकरांना श्रेय देण्यास हिंदू मानसिकता कचरत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिले नाही, तर मग कोणी लिहिले? हा प्रश्न गेली सात दशके विचारला जात होता; परंतु त्याचे समर्पक उत्तर कोणत्याही संविधानतज्ज्ञाला देता आले नाही. आता सिनेसृष्टी ते कोर्ट कचेऱ्यातून बाबासाहेबांचाच उल्लेख होत असल्यामुळे आता हे श्रेय बाबासाहेबांना देण्याशिवाय पर्याय नाही, हे राज्यकर्त्यांसह सर्वच हिंदू तत्त्ववेत्त्यांना कळून चुकल्यावर संविधान लिखाणाचे श्रेय बाबासाहेबांना द्यायचेच; परंतु हे देता-देता या संविधानाला विद्रूप करण्याचे मनसुबे रचले जात आहेत. बाबासाहेबांनी भारतीय संविधान धर्मनिरपेक्ष असल्याचे मान्य करून घेतले असताना ज्यांनी २७ सप्टेंबर १९२५ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन करताना 'हिंदुराज' ही संकल्पना मुक्रर केली व २०१४ साली राज्य कारभार हाती घेतला त्या भाजप या राजकीय पक्षाला आपला पराभव झालेला दिसत आहे. संघाला शंभर वर्षे पूर्ण होत असताना हिंदुराष्ट्र ऐवजी धर्मनिरपेक्ष राज्य अस्तित्वात आहे, ही सल त्यांना सलत असल्यामुळे संविधानाचे धिंडवडे काढणे महत्त्वाचे समजून संविधानाच्या मुखपृष्ठाची वाहवा करायची; पण




आतील संविधान शक्तिहीन करायचे, हा एककलमी कार्यक्रम राबविला जात आहे आणि तेही कलम नंबर एकपासून. बाबासाहेबांनी देशाचे नाव 'भारत देश' म्हटले; परंतु आजही अनेक पक्ष भारत देशऐवजी हिंदुस्थान म्हणत आहेत. त्यांचे हे म्हणणे संविधानाची अवहेलना करणारे आहे, हे समजण्यास सर्वोच्च न्यायालयही कचरते, हे कशाचे द्योतक आहे? लोकशाहीचा मुलामा घेऊन संविधानद्वेष

पसरविणे हे निषेधार्ह आहे. त्याचा निषेध सर्व स्तरांवर आणि थरांवर व्हायला पाहिजे.

**भारतीय कोषागारातील सर्वांत किमती दागिना**

संविधानाला नाकारणे वा ते कमकुवत करण्याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संविधान हे तथागत गौतम बुद्धांच्या विचारांचा परिपाक आहे. भारतीय संविधान समितीवर निवडून येण्यासाठी काही निकष ठरविण्यात आले होते. प्रांतिक विधिमंडळात निवडून येणे, हा एक निकष होता; परंतु बाबासाहेबांच्या 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' या पक्षाचा पराभव झाला होता. बाबासाहेबांना तर संविधान सभेत 'आपल्या' लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जायचे होते; परंतु ते अशक्य झाल्यावर मा. जोगेंद्र मंडल यांनी त्यांना पूर्व बंगालमधून भारतीय संविधान सभेवर निवडून आणले. हा काँग्रेस पक्षाचा अवमान होता. कारण काँग्रेस पक्षाने डॉ. आंबेडकर यांना संविधान सभेवर निवडून न येण्यासाठी जंगजंग पछाडले अन् तरीही ते निवडून आल्यावर डॉ. आंबेडकरांचे सदस्यत्व संपुष्टात यावे म्हणून पूर्व बंगालचा तो भाग पूर्व पाकिस्तानात समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे बाबासाहेबांचे प्रतिनिधित्व नष्ट झाले. बाबासाहेबांशिवाय संविधान सभेत ३०० सदस्य होते; परंतु त्यापैकी एकही सदस्य भारतीय संविधान लिहिण्यात समर्थ नव्हता म्हणून प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेचे सल्लागार मा. बी.एन. राव यांना संविधानतज्ज्ञ सर आयव्हर जेनिंग (आस्ट्रेया) यांच्याकडे पाठविले. सर जेनिंग यांनी बॅ. बी.आर. आंबेडकर असताना मी भारतीय संविधान लिहू शकत नाही, असे सांगितले. तो काळ गांधी-आंबेडकर वादविवादाचा म्हणून राव यांना डॉ. आंबेडकरांचे नाव सांगण्याचे धैर्य झाले नाही. पुढे आणखी काही दिवसांनी नेहरू यांनी आपल्या भगिनी विजयलक्ष्मी पंडित यांना सर जेनिंगकडे पाठविले. यावेळी जेनिंग यांनी तीन बॅरिस्टरांची नावे सुचविली. बॅ. तेजबहादूर सप्रू, बॅ. एम.आर. जयकर व बॅ. बी.आर. आंबेडकर ही ती तीन नावे होती. यापैकी बॅ. सप्रू आणि बॅ. जयकर यांनी असमर्थता दाखविल्यानंतर बॅ. आंबेडकर यांना विचारण्याशिवाय पर्याय नव्हता. नेहरू यांनी गांधींजींची परवानगी घेतली. बाबासाहेब या संधीची वाटच पाहत होते आणि म्हणून मुंबई राज्याचे प्रधानमंत्री बाळ गंगाधर खेर यांना सांगून डॉ. बी.आर. आंबेडकर यांना संविधान समितीवर निवडून आणले. पुढे बाबासाहेब ड्राफ्टिंग समिती अन् तिचे अध्यक्ष झाले. बॅ. सप्रू व बॅ. जयकर यांनी दिलेला नकार बाबासाहेबांच्या पथ्यावर पडला. डॉ. ड्राफ्टिंग समितीचे सात सदस्य होते; परंतु या ना त्या कारणामुळे संविधान समितीपासून ते दूर राहिले. परिणामी, संविधान लिहिण्याची जबाबदारी एकट्या बाबासाहेबांवर येऊन पडली आणि एक राष्ट्रकार्य म्हणून अनेक आजार असतानाही हे संविधान त्यांनी लिहिले. डॉ. बाबासाहेबांनीसुद्धा प्रकृतीचे खरे कारण सांगितले असते, तर नेहरूंना काँट्रॅक्टबेसिसवर सर जेनिंगकडून संविधान लिहून घ्यावे लागले असते अन् आज १३० कोटींच्या भारतवासीयांना खाली मान घालून मान्य करावे लागले असते, की १९४७ च्यादरम्यान एकही भारतीय माणूस संविधान लिहिण्यास समर्थ नव्हता. म्हणून आम्ही परदेशीय माणसाकडून संविधान लिहून घेतले. भारतीयांची मान उंचावी, शान वाढावी म्हणून बाबासाहेबांनी



## वाजपेयींच्या काळात पर्यायी संविधान लिहिण्यात आले होते

२०२५ ला हिंदुराज्याचा पुरस्कार करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर धर्मनिरपेक्ष संविधान लिहिणाऱ्या बाबासाहेबांना आणि त्यांच्या संविधानाला नाकारले जात आहे. यासाठी २०२४ ला सत्तेवर येण्याशिवाय त्यांना पर्याय नाही. २०२४ साली सत्तेवर आले तरच त्यांचे ईप्सित साध्य होईल आणि म्हणून देशातील सर्व संविधानप्रेमींनी हिंदुराज्य न आणण्यासाठी कामाला लागले पाहिजे. संविधान धोक्यात आणणाऱ्यांच्या बाजूने काही मंडळी कार्यरत आहेत. स्वतःला आंबेडकरवादी म्हणविणारे संघाचे गुलाम ठरत आहेत. धर्मवाद्यांना बलवान करीत आहेत. हा बाबासाहेबांचा अवमान आहे; परंतु हे त्यांना कोणी आणि कसे सांगावे? पोटार्थी लोकांना कोणी शिकवावे? ते विसरतात, की अटल बिहारी वाजपेयी प्रधानमंत्री असताना पर्यायी संविधान लिहिण्यात आले होते; परंतु सुज्ञ मतदारांनी या पक्षाचे तेरावे घातल्यामुळे वाजपेयी हतबल झाले होते. ही भळभळणारी जखम पुन्हा एकदा डोके वर काढीत आहे. संविधान विद्रूप केले जात आहे.

लोकशाही मार्गाने हे विद्रुपीकरण कसे केले जात आहे, याचा एक नमुना देण्याचा मला मोह आवरत नाही. अगदी अलीकडे राष्ट्रपतीपदी मा. द्रौपदी मुर्मू यांची निवड करण्यात आली. या निवडीच्या वेळी आदिवासी आणि महिलांचे उदात्तीकरण केले गेल्याचे ढोल बडविण्यात आले. महिलांना प्राधान्य, आदिवासींचे उदात्तीकरण हे संवैधानिक आहे. संविधानाची बूज राखली गेली, हे खरे आहे का? नाही. कारण राष्ट्रपतीपदाची शपथ ग्रहण करण्याआधी त्यांचे शुद्धीकरण करण्यात आले. मनुस्मृतीनुसार महिला अपवित्रच. शिवाय आदिवासी हेही दलितच. खरे तर मुर्मू यांनी शुद्धीकरणाला विरोध करायला पाहिजे होता; परंतु त्यांनी समस्त महिला वर्गाचा अवमान सहन केला. आश्चर्याची बाब म्हणजे स्त्रीवादी संघटना यावेळी गप्प बसल्या.

हे अत्युत्तम काम केले. त्यांचा अमेरिकेप्रमाणे मान–सन्मान करण्याऐवजी ते संविधान विद्रूप केले जात आहे. जर जेनिंग यांनी हे संविधान लिहिले असते, तर इथले सगळे अभावग्रस्त दलित, महिला यांच्या हक्कांचे संरक्षण झाले असते का? मुळीच नाही. भारतीय संविधान हे भारतीय कोषागारातील सर्वांत किमती दागिना आहे. सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे; परंतु तो बुद्धानुयायी असल्यामुळे बुद्धासारखाच तडीपार केला जात आहे. बाबासाहेबांनाच नगण्य ठरविण्यात येत आहे.

**दमशक्तीपुढे आपला स्वाभिमान का गहाण ठेवावा?**

संविधान आज धोक्यात आले आहे. देश संविधानप्रेमी आणि संविधानविरोधी यात दुभंगला आहे. ही दरी दिवसेंदिवस रुंद होत आहे आणि आश्चर्य म्हणजे, ही रुंदी वाढविण्यात आंबेडकरी अग्रेसर आहेत. बंगल्याला 'संविधान' हे नाव देऊन ही दरी नष्ट करता येणार नाही, तर संविधानाची कास धरूनच ती नष्ट होईल. शिवाय संविधानाचे संरक्षण करणे हे केवळ आंबेडकरवाद्यांचेच कर्तव्य आहे असे नाही, तर प्रत्येक भारतीय स्त्री–पुरुषाचे आहे. ही दरी रुंदावत राहिली, तर देशाचे आणखी तुकडे होऊ शकतात. १९४७ च्या दरम्यान ज्या प्रवृत्तीने देशाचे तुकडे केले तीच प्रवृत्ती आता बलवान होत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा सर्वशक्तिमान आहे हे मान्य. कारण तो वर्णवर्चस्ववादी आहे. आज देशात काही यंत्रणांचा दुरुपयोग करून काहींचा आवाज बंद केला जात आहे, त्याचे कारणही हेच आहे. १९७५ च्यादरम्यान देशाला कारागृह करण्याचे काम याच दमनशक्तीने केले होते. संविधानाचे धिंडवडे काढण्यात आले होते. त्या इतिहासापासून आजची शासनयंत्रणा काही बोध घेणार आहे की नाही? दमशक्तीपुढे आपला स्वाभिमान का गहाण ठेवावा, याचा विचार राजकीय आणि सनदी अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे; पण जेथे न्यायव्यवस्था हीच कोलमडली आहे, तेथे न्याय कोणी आणि कोणाकडे मागावा?

**राजकीय पक्ष हेच मुळी जातीयतेचे उकिरडे ठरत आहेत**

बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व प्रकारच्या अभावग्रस्तांना आरक्षणाची सोय केली, त्यामुळे काही अशक्त लोक सशक्त झाले. त्यांच्या या सबलीकरणामुळे काही प्रमाणात जाती प्रथेला अडसर निर्माण झाला. जातीयवाद्यांना हे कसे काय मान्य होणार आणि म्हणून शिक्षण क्षेत्रावर काही मर्यादा टाकल्या जात आहेत. शिक्षणाची कवाडे त्यांना पद्धतशीरपणे बंद करण्यात येत आहेत. त्याचबरोबर जे आरक्षणविरोधी होते तेच आता आरक्षणवादी झाले आहेत अन् सरकार त्यांचे समर्थन करीत आहे. जातीयवाद्यांना हा देश जाती–पोटजाती यात दुभंगलेला पाहिजे. त्याशिवाय त्यांचे श्रेष्ठत्व अबाधित राहणार नाही. लोकशाहीचे सर्व खांब डळमळीत करण्यात ते अग्रेसर आहेत. सर्वच क्षेत्रांत संघीय हस्तक्षेप होत आहे. या संघीकरणाला ठोकरण्याचे सामर्थ्य हे केवळ भारतीय संविधानात आहे. तेच संविधान नष्ट केले जात आहे. अगदी त्याची होळी केली जात आहे. न्यायालयाच्या आवारात मनूचा पुतळा बसविण्याची मानसिकता जागी होते तेथे न्याय या शब्दाला अर्थच नसतो. बरे याविरुद्ध राजकीय पक्ष आवाज उठवतील असे वाटणे स्वाभाविक आहे; परंतु राजकीय पक्ष हेच मुळी जातीयतेचे उकिरडे ठरत आहेत.

आज धर्मनिरपेक्ष भारत देववादी आणि दैववादी ठरत आहे. संवैधानिक पदावर असलेले प्रधानमंत्री असोत, वा राष्ट्रपती असोत. ते मंदिरांचे उंबरठे झिजवत आहेत. सत्ताग्रहण करताना हे लोक संविधानाशी प्रामाणिक राहण्याची शपथ घेतात; पण पाठ फिरताच ते धर्मवादी होतात. याला पायबंद फक्त संविधानच घालू शकते.




संविधानाने धर्म स्वातंत्र्य दिले आहे, त्याचा अतिरेक शासकीय निधी वापरावर होत आहे; ही वस्तुस्थिती आहे.

भारताला आज महत्त्व आहे ते भारतीय लोकशाहीमुळे. ही लोकशाही आधारित आहे ती भारतीय संविधानावरच. ज्या देशाचे संविधान कार्यक्षम असते, तोच देश प्रगतिपथावर वाटचाल करू शकतो. जगातले सगळे देश आपल्या संविधानाचा सन्मान करतात. त्याची अंमलबजावणी करतात. भारतात हे होत नाही. कारण इथले लोक फारफार जातीयवादी आहेत. ते संविधान नाकारतात. हे संविधान नाकरले गेले, तर लोकशाही संपुष्टात येईल आणि लोकशाही संपली, तर भारताची शान नष्ट होईल. पुन्हा एकदा भारत हा मागासलेला देश म्हणून ओळखला जाऊ नये असे वाटत असेल, तर भारतीय संविधानाची शान वाढविली पाहिजे. ●●●

**(लेखक दलित पँथरचे सहसंस्थापक, साहित्यिक व विचारवंत आहेत.)**

# भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्वत्तेची छाप




भीमराव सरवदे

**सर्व धर्मांना समान आदर देणाऱ्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर डॉ. आंबेडकरांची अढळ श्रद्धा होती. यासंदर्भात त्यांनी असा युक्तिवाद केला होता, की राज्य कोणत्याही धर्माला राज्यधर्म म्हणून मान्यता देणार नाही. डॉ. आंबेडकरांनी मांडलेली धर्मनिरपेक्षतेची ही संकल्पना अनुच्छेद २५-२८ नुसार भारतीय राज्यघटनेने आपल्या नागरिकांना कोणत्याही धर्मावर विश्वास ठेवण्याचे आणि त्यांच्या धार्मिक व्यवहाराचे व्यवस्थापन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे.**

स्वतंत्र भारताची राज्यघटना ही आपल्यासाठी केवळ कायदा लिहिलेला दस्तऐवज नसून तिचे मानवी मूल्य खूप अधिक आहे. ज्यामध्ये संपूर्ण समाजासाठी आणि विशेषतः वंचित घटकांसाठी शासनाचे नियम, तसेच विविध प्रमुख संस्था आणि राजकारण्यांची कार्ये परिभाषित करण्यात आलेली आहेत. शतावधी वर्षांपासून हिंदू धर्मातील विषमतावादी सामाजिक व्यवस्थेमुळे वंचित समाजसमूहाचे अनेक प्रकारे शोषण झाले असल्यामुळे कदाचित त्यांना नव्याने स्वीकारलेल्या भारतीय संविधानाकडून खूप अपेक्षा होत्या.

संविधानाच्या इतिहासात डोकावल्यास असे आढळून येते की, फेब्रुवारी १९२८ मध्ये काँग्रेसने मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक घटना समिती नियुक्त केली होती, तिला नेहरू घटना समिती म्हटले जाते. या समितीने ऑगस्ट १९२८ मध्ये भारताच्या भावी संविधानाचे प्रारूप तयार केले. हे प्रारूप तयार करताना सर्व धर्म आणि पक्षांना उदा. मुस्लीम, शीख, पारशी, ख्रिश्चन, अँग्लो इंडियन यांच्या प्रमुखांना चर्चेसाठी बोलाविले होते. अस्पृश्यांच्या प्रतिनिधींना मात्र हेतुपुरस्सरपणे टाळले गेले. याचदरम्यान अस्पृश्यांच्या वेगळ्या राजकीय हक्काच्या मागणीने जोर धरला होता; परंतु त्याकडेही दुर्लक्ष केले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याचा निषेध म्हणून दिनांक १८ जानेवारी १९२९ च्या 'बहिष्कृत भारत' या आपल्या वृत्तपत्रात 'नेहरू कमिशनची योजना व हिंदुस्थानचे भवितव्य' या शीर्षकाखाली लेख लिहिला होता. त्यात बाबासाहेब म्हणाले होते की, हिंदू समाजाच्या उतरंडीला धक्का न लावता वरच्यांना वरती व खालच्यांना खाली ठेवून स्वराज्य सत्ता संपादन करण्याचा हा ब्राह्मणी कावा आहे, असे आमचे स्पष्ट मत आहे. नाहीतर ज्या सवलती मुसलमानांना देण्यात आल्या त्या सवलती मागासलेल्या हिंदू किंवा अस्पृश्यांना देण्यात आल्या नसत्या काय?



पुढे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राचा दर्जा मिळाला. तत्पूर्वी, संविधान सभेचे गठन करण्यात आले होते. या संविधान सभेने डॉ. आंबेडकरांची २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड केली. डॉ. आंबेडकरांनी जगभरातल्या संविधानाचा अभ्यास करून स्वतः संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून २१ फेब्रुवारी १९४८ रोजी संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना पुढील चर्चेसाठी सुपुर्द केला. याचा अर्थ असा, की डॉ. आंबेडकरांनी संविधान केवळ ५ महिने २२ दिवसांत लिहून तयार केले होते. म्हणूनच डॉ. आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार मानले जाते.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटना स्वीकारली, जी २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली. ही राज्यघटना लोकशाही राज्याची स्थापना करणाऱ्या जगातील महाकाय संविधानांपैकी एक मानली जाते. १९५० मध्ये भारतीय राज्यघटनेची स्थापना ही केवळ भारताच्या राजकीय इतिहासातच नव्हे, तर सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना होती. या संविधानाने भारतीय उपखंडात नागरिकांना समान अधिकार आणि

विशेषाधिकार प्रदान करून मानवकल्याण आणि विकासाचे नवीन मार्ग खुले केले आहेत. खरेतर, असे गृहीत धरले गेले होते, की नवीन राज्यघटना लिंग, जात आणि धर्मावर आधारित शोषण संपुष्टात आणण्यासाठी पुरेशी प्रभावी ठरेल, तसेच श्रेणीबद्ध आणि विषम सामाजिक संरचनेत वाढत्या प्रमाणात बदल घडवून आणेल. जेणेकरून व्यक्ती सन्मानाने जगू शकेल आणि समान नागरी हक्क प्राप्त करू शकेल. कोट्यवधी लोकांच्या जीवनातील, विशेषत: वंचित समुदायांच्या जीवनातील हा पहिला क्षण होता, ज्यामुळे यांना नवीन संविधान स्वीकारल्यानंतर समान वागणूक आणि हक्क मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती.

**डॉ. आंबेडकरांची दूरदृष्टी करते विषमतेचे असंख्य प्रकार प्रतिबंधित**

भारतीय राज्यघटनेवर डॉ. आंबेडकरांचा प्रभाव समजून घेण्यासाठी १४, १५ आणि १७ या कलमांवर अधिक दृष्टिक्षेप टाकणे महत्त्वाचे आहे. अनुच्छेद १४ च्या तरतुदीनुसार राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यांसमोर समानता नाकारणार नाही किंवा भारताच्या हद्दीतील कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही. अनुच्छेद १५ धर्म, जात, वंश लिंग किंवा जन्माच्या ठिकाणच्या आधारे भेदभाव करण्यास प्रतिबंधित करते. अनुच्छेद १७ ही राज्यघटनेत केलेली सर्वांत आधारभूत तरतूद आहे, जी अस्पृश्यता नष्ट करते आणि कोणत्याही स्वरूपात त्यांच्या प्रथांवर बंदी घालते. अस्पृश्यतेच्या प्रथांचे गुन्हेगारीकरण करून आणि त्यांचे पालन करणाऱ्यांना कायद्यानुसार शिक्षेची व्यवस्था करून श्रेणीबद्ध आणि विविधता व विषमता असलेल्या भारतात सामाजिक क्रांती घडवून आणणारी ही तरतूद म्हणून मानली जाते. शिवाय, अनुच्छेद २३ द्वारे माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी पद्धतीवर बंदी घालण्यात आली आहे. या सर्व तरतुदी खरोखरच अस्पृश्यतेच्या दुष्ट रूढींचे, ज्या रूढी समाजातील एकतेच्या भावना नष्ट करीत आहेत आणि देशाला विघटनाच्या धोक्याला कारणीभूत ठरत आहेत त्याचे उच्चाटन करण्याच्या त्यांच्या महान दूरदृष्टीचे प्रतिबिंब आहेत. डॉ. आंबेडकरांची हीच दूरदृष्टी अस्पृश्यांचे जीवन सन्मानित करण्याबरोबरच,

## बाबासाहेबांनी दिला होता राष्ट्रीय ऐक्य वृद्धिंगत करण्याचा संदेश

डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या या संविधानात सर्व नागरिकांना संवैधानिक व्यापक संरक्षण आणि हमी दिली आहे. उदाहरणार्थ, सामाजिक-आर्थिक हक्क, नागरी स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, अस्पृश्यता निर्मूलन आणि सर्व प्रकारच्या भेदभावांना प्रतिबंध इत्यादी. घटनात्मक अधिकारांव्यतिरिक्त, त्यांनी नागरी सेवा, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विशेषत: अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या सदस्यांसाठी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची योजना सुरू करण्यासाठी संविधानसभेचे समर्थन प्राप्त केले होते. डॉ. आंबेडकर सामाजिक न्याय आणि सामाजिक समतेसाठी एक शूर सेनानी होते आणि अशा प्रकारे ते नेते, मुक्तिदाता, नायक, उद्धारकर्ता, सामाजिक दुर्लक्षित वर्गाच्या आवाजाचे प्रतिनिधी म्हणून ओळखले जातात. १७ डिसेंबर १९४६ च्या संविधान सभेतील भाषणात बाबासाहेब म्हणतात, आज आपण राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विभागलेले आहोत, याची मला जाणीव आहे. आपण एक दुसऱ्यांविरुद्ध लढणाऱ्या छावण्यांचा समूह आहोत आणि मी तर यापुढेही जाऊन हेही मान्य करेन की, बहुशः अशाच एका छावणीचा मीही एक नेता आहे; परंतु महोदय हे सर्व खरे असले तरी मला पूर्ण खात्री आहे की, अनुकूल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करू शकणार नाही. विभिन्न जाती व संप्रदाय असले तरी आपण एकसंध झाल्याशिवाय राहणार नाही, याबद्दल माझ्या मनात कसलीही शंका नाही. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग ३, पृष्ठ क्र. ५२) अशा प्रकारे त्यांनी समाजातील वंचित घटकांसाठी आपली बांधीलकी स्पष्टपणे नमूद करून राष्ट्रीय ऐक्य वृद्धिंगत करण्याचा संदेश देशवासीयांना दिला होता.

डॉ. आंबेडकरांचा असा विश्वास होता, की राज्यघटना हे समाजातील सर्व घटकांना विशेषतः समाजातील दबलेल्या घटकांना न्याय आणि समता सुनिश्चित करण्यासाठी एक प्रभावी साधन असू शकते. त्यांना घटनात्मक तरतुदींच्या साहाय्याने अनेक उद्दिष्टे साध्य करण्याची इच्छा होती आणि खरेतर, काही तरतुदी अशा आहेत, ज्यातून भारतीय राज्यघटनेवरील त्यांच्या दूरदृष्टीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. भारतीय संविधान अनुच्छेद १९-२२ च्या द्वारे स्वातंत्र्याच्या अधिकाराला खूप महत्त्व देते. डॉ. आंबेडकरांनी परखडपणे सांगितले होते, की बदलत्या समाजात, जुन्या मूल्यांत सतत क्रांती घडवली पाहिजे आणि हिंदूंनी हेसुद्धा समजून घेतले पाहिजे, की जसे माणसांच्या कृतींचे मूल्यमापन करण्यासाठी मानक असले पाहिजेत, तसेच त्या मानकामध्ये बदल करण्याची तयारीसुद्धा असली पाहिजे. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे, जातिव्यवस्थेचे निर्मूलन, पृ. ६७). राज्यघटनेच्या तरल संकल्पनेवर त्यांचा ठाम विश्वास होता.

भारतीय राज्यघटनेत अस्पृश्यता आणि जातीवर आधारित भेदभावाशी संबंधित डॉ. आंबेडकरांची दूरदृष्टी प्राप्त करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक तरतुदी आहेत. मागासवर्गीय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दलित वर्गाकडे संविधान निर्मात्यांनी विशेष लक्ष वेधले. किंबहुना, या घटकांचे उत्थान ही राज्याची आणि संस्थेची महत्त्वाची जबाबदारी म्हणून ओळखली गेली आहे. उपेक्षित घटकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी त्यांनी संविधान सभेत विविध तरतुदी मांडल्या. अनुच्छेद १५ (४), १६ (४), १९(१) (ड) व (ई), २९ (२), २७५, ३३०, ३३५ आणि ३४० ही त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या संकल्पनांचे स्पष्ट प्रतिबिंब आहेत. ही कलमे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या हितासाठी विशेष तरतूद करण्याचे अधिकार राज्याला देतात.

विषमतेचे असंख्य प्रकार प्रतिबंधित करते.

डॉ. आंबेडकरांनी जरी खालच्या जातींच्या सक्षमीकरणासाठी भारतीय राज्यघटनेत महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश करण्यात यश मिळवले असले, तरी शोषित वर्गांसाठी मानवी आणि नागरी हक्कांची तरतूद करणे त्यांना न्याय आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी पुरेसे नाही, जोपर्यंत त्या हक्कांचे पालन करण्यासाठी कायदेशीर तरतुदी आणि संरक्षणाची जोड दिली जाणार नाही, या वस्तुस्थितीची त्यांना चांगलीच जाण होती. याच अनुषंगाने डॉ. आंबेडकर संविधान सभेत म्हणाले होते, की आपल्या सर्वांना याची जाणीव आहे, की जोपर्यंत उपाय उपलब्ध करून दिले जात नाहीत तोपर्यंत अधिकारांना काहीही अर्थ नाही, ज्यायोगे लोक हक्कांपासून वंचित ठेवल्यास न्याय मिळवण्याचा प्रयत्न करू शकतात. या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेत घटनात्मक उपायांची मांडणी करण्यात आली आहे. अनुच्छेद ३२ द्वारा देशाच्या सर्व नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांचे आणि घटनात्मक विशेषाधिकारांचे कोणत्याही राज्यसंस्था किंवा व्यक्तीकडून उल्लंघन झाल्यास सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार प्रदान करते. त्यामुळेच कदाचित डॉ. आंबेडकरांनी या तरतुदीला राज्यघटनेचा आत्मा आणि त्याचे हृदय मानले आहे.



डॉ. आंबेडकरांनी संविधान सभेत जीवनाच्या 'परस्परविरोधी' स्वरूपाकडे ठामपणे लक्ष वेधले होते, विशेष म्हणजे त्यांनी असा दावा केला होता की, राजकीय जीवनात आपण एक माणूस एक मत आणि एक मत एक मूल्य, हे तत्त्व मान्य करणार आहोत; परंतु आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात, आपण सामाजिक संरचनेच्या कारणास्तव, एक माणूस एक मूल्य या तत्त्वाला नाकारत राहू. कदाचित त्यामुळेच त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या भाग ४ मधील अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये नमूद केलेल्या 'राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे' समाविष्ट केली आहेत. समाजातील वंचित घटकांचे हित जोपासण्यासाठी, प्रयत्न करण्यासाठी राज्याला मार्गदर्शन करून सामाजिक व आर्थिक लोकशाहीच्या आदर्शांना चालना देण्यासाठी हा भाग असल्याचे सांगितले जाते. उदाहरणार्थ; अनुच्छेद ४६ प्रमाणे दुर्बल घटकांच्या आणि विशेषतः अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना राज्य विशेष काळजीने प्रोत्साहन देईल आणि सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करेल. तथापि, हे लक्षात घेतले पाहिजे, की मूलभूत अधिकारांच्या विपरीत, निर्देशक तत्त्वे ही राज्यांसाठी केवळ दुर्बल घटकांच्या हितासाठी विशिष्ट कृती करण्याच्या विविध निर्देशांचा एक संच आहे. या वस्तुस्थितीवर डॉ. आंबेडकरांनीही भर दिला होता, निर्देशक तत्त्वे ही राज्यघटनेने देशातील विविध सरकारांवर लादलेल्या केवळ जबाबदाऱ्या आहेत, जरी सरकार ते पार पाडण्यात अपयशी ठरले, तरी त्याविरुद्ध फार काही करता येत नाही. या तरतुदींच्या अनुषंगाने सत्ताधाऱ्यांच्या सदसद्विवेकबुद्धीचा कस लागतो, हे निश्चित!

सर्व धर्मांना समान आदर देणाऱ्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर डॉ. आंबेडकरांची अढळ श्रद्धा होती. यासंदर्भात त्यांनी असा युक्तिवाद केला होता, की राज्य कोणत्याही धर्माला राज्यधर्म म्हणून मान्यता देणार नाही. डॉ. आंबेडकरांनी मांडलेली धर्मनिरपेक्षतेची ही संकल्पना अनुच्छेद २५-२८ नुसार भारतीय राज्यघटनेने आपल्या नागरिकांना कोणत्याही धर्मावर विश्वास ठेवण्याचे आणि त्यांच्या धार्मिक व्यवहाराचे व्यवस्थापन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. शिवाय, 'सेक्युलर' हा शब्द १९७६ मध्ये राज्यघटनेच्या प्रास्ताविकात ४२ व्या दुरुस्तीद्वारे समाविष्ट करण्यात आला आहे. धर्मनिरपेक्षतेची डॉ. आंबेडकरांची दृष्टी ही मूलगामी प्रकारची असून कोणत्याही धार्मिक वाईट वागणुकीविरुद्ध, द्वेषाविरुद्ध आणि भेदभावाविरुद्ध बंड करणारी आहे.

भारतीय संविधान वाचत असताना डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञानाचा उमटलेला अमीट असा ठसा विविध तरतुदींमधून ठळकपणे दिसून येतो. प्रामुख्याने प्रस्तावना, भाग ३, भाग ४ आणि भाग १६ मध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता या संकल्पनांचे समर्थन करून आणि देशाच्या एकतेचे रक्षण करून न्याय्य समाज स्थापन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यांना असे वाटत होते, की हिंदू समाजाचा प्रश्न सोडवण्यासाठी लवकरात लवकर आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात समता आणि बंधुत्व सुनिश्चित करणे आवश्यक आहे. हजारो जातींमध्ये विभागलेले लोक हे एक राष्ट्र असू शकत नाही, या वस्तुस्थितीची डॉ. आंबेडकरांना जाणीव होती. त्यामुळे सामाजिक ऐक्याशिवाय पर्याय नाही, असे त्यांना वाटत होते. या तिन्ही तत्त्वांना संविधानाच्या प्रस्तावनेत महत्त्वाचे स्थान दिलेले दिसून येते. म्हणूनच भारतीय संविधानाची महानता अखिल विश्वाने मान्य केलेली आहे! ●●●

**(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**



# भारत जोडो यात्रा आणि मी



प्रा. नागार्जुन वाडेकर

**संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी 'नफरत छोडो, भारत जोडो जात-पात के बंधन तोडो, भारत जोडो, भारत जोडो'चा नारा घेऊन निघालेल्या यात्रेत अशाच भावनेने यात्रा महाराष्ट्रात येताच मी त्यात सहभागी झालो. आणखीन काही मित्र औरंगाबाद, नाशिकहून तात्काळ सहभागी झाले. नांदेड, अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यांत तीन वेळा काही दिवस चालून आलो. आपण विनोबा भावेंची भूदान चळवळ यात्रा इत्यादींबाबत वाचलेले असेल. पुढे माजी प्रधानमंत्री चंद्रशेखर यांच्या 'भारत यात्रे'बाबत वाचले असेल. त्यानंतरची लालकृष्ण अडवाणी यांची राममंदिर रथयात्रा याबद्दल प्रत्यक्षच कळले असेल. त्यात आणि त्यामुळे भारतभर बरीच हिंसा झाल्याचेही पाहिले, वाचले असेल. मात्र, इथे राहुल गांधीच्या यात्रेत सर्वत्र प्रेम आणि मैत्रीच दिसते.**

काँग्रेसचे खासदार आणि माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी 'भारत जोडो' यात्रा सुरू केली आहे, हे आज जगभरात माहिती झाले आहे. 'भारत जोडो' यात्रा ७ सप्टेंबर २०२२ रोजी कन्याकुमारी येथून सुरू झाली. १५० दिवसांत १२ राज्यांमधून जात ३,५७० किमी अंतर पायी चालून फेब्रुवारी २०२३ मध्ये ती श्रीनगर येथे पोहोचणार आहे. यात्रेतील प्रमुख नारा आहे 'नफरत छोडो, भारत जोडो आणि मिले कदम, जुडे वतन!'

वाढती बेरोजगारी, महागाई आणि जातीय-धार्मिक द्वेष, तसेच क्रोनी भांडवलशाही, फॅसिझम आणि धर्मांधता यामुळे लोकशाहीला निर्माण झालेला धोका याबाबत थेट जनतेत जाऊन देशाच्या परिस्थितीबाबत जनतेला जागरूक करावे आणि देशात सामाजिक सलोखा निर्माण करावा यासाठी 'भारत जोडो' यात्रा काढली आहे. राहुल गांधी स्वतः सांगत आहेत, की ही काँग्रेसची यात्रा नाही किंवा काँग्रेसची निवडणुकीची तयारी म्हणून काढलेली यात्रा नाही, तर लोकांशी थेट संवाद साधण्यासाठी, त्यांचे प्रश्न ऐकण्यासाठी, देशात सलोखा निर्माण करून जनतेत ऐक्य साधण्यासाठी आणि संविधान व लोकशाही वाचवण्यासाठी आहे. या यात्रेमुळे काँग्रेस पक्षाला बळकटी आली तर तो अधिकच फायदा असेल; पण ते काही त्याचे लक्ष्य नाही.

'भारत जोडो' यात्रेची काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाला का गरज भासली याबाबत राहुल गांधीने यात्रेदरम्यानच्या सभा आणि पत्रकार परिषदांमधून स्पष्ट केले आहे. केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यापासून मागील आठ वर्षांच्या कालावधीत संसदेमध्ये विरोधी पक्षांना कोणत्याही कायद्यासंबंधी आणि ढासळत्या आर्थिक सामाजिक परिस्थितीबाबत बोलू दिले जात नाही. त्यांचे खासदार बोलत असताना त्यांचा माईक बंद करून टाकला जातो. विरोधी पक्षांची विविध राज्यांतील सरकारे पाडून भाजपाची सरकारे बनवली जात आहेत, संवैधानिक संस्थांची स्वायत्तता संपुष्टात आणली गेली आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ विरोधी पक्षांची बाजू लोकांसमोर मांडत नाही. संसदेमध्ये आणि माध्यमांमधून शेतकरी, कष्टकरी,





कामगार, युवक, महिला यांची बाजू मांडता येत नाही. देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, परिस्थितीबाबत लोकांचे प्रबोधन करण्यासाठी आता थेट जनतेत जाऊन त्यांच्या प्रश्नांबाबत त्यांनाच बोलते करावे, या भूमिकेतून काँग्रेस पक्षाने पुढाकार घेऊन 'भारत जोडो' यात्रा काढली आहे.

सकारात्मक उद्देशाने निघालेली ऐतिहासिक 'भारत जोडो' यात्रा महाराष्ट्रात आल्यावर त्यात सहभागी होऊन आपले योगदान म्हणून पायी चालले पाहिजे, असे मी मनोमन ठरवले. मला एका दिवसात जास्तीत जास्त दहा किलोमीटर चालण्याचा अनुभव होता; पण त्यात सातत्य नव्हते, म्हणून सप्टेंबरपासून सलग दहा-बारा किमी चालण्याचा सराव करावा, म्हणून मी चालायला सुरुवात केली. 'भारत जोडो' यात्रेसंदर्भात माहिती घेण्यासाठी टीव्ही आणि वर्तमानपत्रे चाळू लागलो. कुठेच काहीही बातम्या दिसत नव्हत्या म्हणून यूट्यूब आणि इतर समाजमाध्यमांतून यात्रेबद्दल माहिती घेऊ लागलो.

७ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी राहुल गांधीने भारताचे माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांची तामिळनाडूमधील श्रीपेराम्बदुर येथे हत्या झाली होती त्याठिकाणच्या स्मृतिस्थळावर जाऊन प्रार्थना केली. या कार्यक्रमाचे लाइव्ह प्रक्षेपण काँग्रेसच्या यूट्यूब चॅनलवर दाखवले जात होते. एका बाजूला भजन सुरू होते आणि राहुल गांधी स्मृतिस्थळासमोर बराच वेळ ध्यानस्थ बसलेला दिसला. त्याला ध्यानस्थ बसलेला पाहून कोणाच्याही मनात अतीव करुणा उत्पन्न होईल, असाच तो प्रसंग होता. त्यानंतर राहुल गांधीने कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंद यांच्या स्मृतिस्थळाला भेट दिली आणि 'भारत जोडो' यात्रेला सुरुवात झाली.

दिवसभर किरकोळ बातम्यांचा रतीब घालणाऱ्या माध्यमांनी 'भारत जोडो' यात्रेवर जसा काही बहिष्कार टाकल्याप्रमाणे पुढे अनेक दिवस यात्रा कव्हर करणे टाळलेच, याचे सखेद आश्चर्य वाटत होते. भाजपाच्या बाजूने ट्रोल आर्मीने मोहीम उघडलेली दिसली. त्यात राहुल गांधीने पायी चालताना किती महागडा टी-शर्ट घातला आहे यावर टीका होताना पाहिली. त्यावर प्रधानमंत्री मोदी किती लाखांचा सूट घालतात, याचे काँग्रेसच्या बाजूने प्रत्युत्तर आले. राहुलच्या टी-शर्टवरची टीका बंद झाली. काही टीव्ही चॅनलवर यात्रेचे विडंबन करणाऱ्या जाहिराती यायला लागल्या - त्यावर बेरोजगारी आणि महागाईवरच्या प्रश्नांपासून मोदी कसे दूर पळत आहेत, असे विडंबन आले.

भाजपा सरकारमधील मंत्री - स्मृती इराणी यांनी राहुल गांधी कन्याकुमारीतून भारत जोडो यात्रा करत असताना स्वामी विवेकानंद यांच्या स्मृतिस्थळी गेले नाहीत, अशी टीका केली; पण काँग्रेसकडून राहुल गांधी विवेकानंदांना अभिवादन करतानाचे व्हिडीओ दाखवले गेले आणि इराणी गप्प झाल्या, तसा ट्रोल आर्मीचा उपद्व्याप बऱ्याच अंशी बंद झालेला दिसला. यावरून काँग्रेससुद्धा इतके दिवस हलक्याने घेत असलेल्या भाजपा समर्थक ट्रोल आर्मीला तोडीस तोड उत्तर देत असल्याचे दिसले. पुढे यात्रा केरळ राज्यात येण्यापूर्वीच केरळ उच्च न्यायालयात यात्रेमुळे रहदारीला त्रास होईल म्हणून यात्रेवर बंदी आणावी, अशी याचिका दाखल झाली. मात्र, उच्च न्यायालयाने 'भारत जोडो' यात्रेला घटनात्मक अधिकार आहे, असे म्हणत ती याचिका फेटाळली. अशा प्रकारे का होईना; पण 'भारत जोडो' यात्रा चर्चेत यायला लागली होती. डाव्या पक्षाचे सरकार असलेल्या केरळमध्ये 'भारत जोडो' यात्रेला मोठा प्रतिसाद मिळायला लागला आणि त्यानंतर साधारणतः पंधरा दिवसांनी काही वर्तमानपत्रांत एखादी चौकट यायला लागली. मीडियाचे स्वातंत्र्य खरेच किती दडपले गेले आहे, तो किती पक्षपाती झाला आहे, याची प्रचीतीच आली. यात्रेला आणल्या जात असलेल्या अडथळ्यामुळे यात्रेबद्दल जनतेत अधिकच सहानुभूती निर्माण होत आहे आणि लोकांची गर्दी वाढतच आहे, असे दिसत होते.

'भारत जोडो' यात्रेने नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथून ७ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात प्रवेश केला. महात्मा गांधी यांची दांडी यात्रा आणि भारतीय लोक ब्रिटिशांच्या विरोधात कसे लढले हे आपण शालेय इतिहासात वाचलेले होते, त्यात सहभागी होता येणे शक्य नव्हते. 'भारत जोडो' यात्रेला दुसरा स्वातंत्र्यलढा म्हणूनही म्हटले जात आहे.

संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी ‘नफरत छोडो, भारत जोडो जात-पात के बंधन तोडो, भारत जोडो, भारत जोडो’चा नारा घेऊन निघालेल्या यात्रेत अशाच भावनेने यात्रा महाराष्ट्रात येताच मी त्यात सहभागी झालो. आणखीन काही मित्र औरंगाबाद, नाशिकहून तात्काळ सहभागी झाले. नांदेड, अकोला आणि बुलडाणा जिल्ह्यांत तीन वेळा काही दिवस चालून आलो. आपण विनोबा भावेंची भूदान चळवळ यात्रा इत्यादींबाबत वाचलेले असेल. पुढे माजी प्रधानमंत्री चंद्रशेखर यांच्या ‘भारत यात्रे’बाबत वाचले असेल. त्यानंतरची लालकृष्ण अडवाणी यांची राममंदिर रथयात्रा याबद्दल प्रत्यक्षच कळले असेल. त्यात आणि त्यामुळे भारतभर बरीच हिंसा झाल्याचेही पाहिले, वाचले असेल. मात्र, इथे राहुल गांधीच्या यात्रेत सर्वत्र प्रेम आणि मैत्रीच दिसते.

‘भारत जोडो’ यात्रा कन्याकुमारीहून निघाल्यापासून यूट्यूबवरून फॉलो करत होतो. यात्रेत सहभागी होण्यासाठी काय करावे लागेल, अशी स्थानिक काँग्रेस नेत्यांकडे विचारणा केली. यात्रा महाराष्ट्रात कधी येईल, सहभाग नोंदवायचा असेल तर काय करावे लागेल, कुठे काय व्यवस्था आहे इत्यादी. त्यांना हेसुद्धा सांगितले, की काँग्रेस उशिरा का होईना; पण ट्रोल आर्मीला चांगले उत्तर देत आहे; पण यूट्यूबच्या चॅनलवरील यात्रेच्या लाइव्ह प्रक्षेपणाला केवळ काही हजारांत सबस्क्रायबर्स, व्ह्युव्हर्स किंवा लाइक्स दिसत आहेत, तसेच लोकल लेव्हलला काँग्रेस पुढाऱ्यांकडून पुरेसे मोबिलायझेशन होत असलेले दिसत नाही आणि राहुल एकटा दहा हजार किलोमीटर चालला आणि लोकल नेते झोपलेले राहिले, तर ‘भारत जोडो’ यात्रा कशी काय यशस्वी होईल. त्यावर स्थानिक नेत्यांचे म्हणणे होते, की ही यात्रा काँग्रेसची नाहीच तर ती संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी लोकांची, जनतेची, नागरिकांची यात्रा आहे. लोकांना लोकशाही टिकवायची असेल, तर तेच यात्रा यशस्वी करतील. लोकांचा यात्रेला मिळत असलेला प्रतिसाद पाहून ते पटले. यात्रेत गेल्यानंतर एनएसयूआय आणि युवक काँग्रेसचे झेंडे मोठ्या प्रमाणात दिसत होते, तसेच स्थानिक आणि विविध जिल्ह्यांतील प्रमुख नेते आपल्या निवडक कार्यकर्त्यांबरोबर राहुलसोबत चालताना दिसले. सोबत हजारोंच्या संख्येने कार्यकर्तेही चालत होते. यात्रा कर्नाटकात असताना सोनिया गांधी यात्रेत सहभागी झालेल्या दिसल्या. राहुल आपल्या आईच्या बुटाची लेस सुटलेली बांधताना पाहिले. ठरावीक अंतर चालून झाल्यानंतर आईला आता चालू नको म्हणून आग्रहाने गाडीत बसवणारा राहुल सर्वांनी पाहिला. यात्रेत चालताना एका ‘भारत जोडो’ यात्रीला विचारले, की सर्वांत जास्त प्रतिसाद कुठे मिळाला, तर तो म्हणाला सर्वांत जास्त प्रतिसाद आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यात मिळाला. मात्र, तेलंगणात पोलिसांनी यात्रेकरूंना खूप त्रास दिला, असेही त्याने सांगितले. असाच पोलिसांनी धक्का दिल्याने रस्त्यावर पडून महाराष्ट्राचे माजी मंत्री नितीन राऊत जखमी झाल्याचे आठवले.

राहुल गांधी यांच्यासोबत कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत चालणारे काही काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि १२० यात्री असतात. या १२० लोकांची शारीरिक क्षमता चाचणी आणि मानसिक दृढतेची तपासणी करूनच निवड करण्यात आलेली आहे, असे समजले. यात महाराष्ट्रातील ९ यात्री आहेत आणि त्यातील ४ महिला आहेत. रोज सकाळी सहा वाजता राष्ट्रध्वजारोहण करून यात्रा सुरू होते. १२ किमी अंतर चालते. तात्पुरत्या स्वरूपात तयार केलेल्या कम्प १, कम्प २ आणि कम्प ३ मध्ये भारतयात्री थांबतात. यात्रेकरूंसाठी ट्रकवर ७२ कंटेनर बसवलेले आहेत. त्यात एक, दोन, चार, सहा इतके यात्रेकरू राहू शकतात. काही कंटेनरमध्ये बाथरूमची सोय आहे. कम्प २ मध्ये पासधारक अतिथी यात्री राहतात. यात त्या त्या राज्यात किंवा जिल्ह्यात सलग चालणाऱ्यांसाठी पासेस दिलेले असतात. साधारणतः यात्रेच्या पाडावाच्या जवळच्या शाळा, कॉलेज किंवा मंगल कार्यालय आदी ठिकाणी त्यांची व्यवस्था केलेली असते, तर कम्प ३ मध्ये केवळ एक दिवस सहभागी होऊन चालणाऱ्यासाठी



भोजनाची व्यवस्था केलेली असते.

चालताना राहुलच्या भोवती पोलिस, पॅरामिलिटरी आणि कमांडो सुरक्षेचे कडे असते. त्यातून तो वेगाने चालताना दिसतो. बऱ्याच वेळा मागे पडलेल्यांना त्याच्यासोबत येण्यासाठी अक्षरशः धावावे लागते. मात्र, राहुल काही थकत नाही. सकाळी चालायला सुरुवात करण्यापूर्वी तो काहीवेळ सायकलिंगसुद्धा करतो, हे ऐकून आश्चर्य वाटले. यात्रेच्या मागील आणि पुढील मार्ग रहदारीसाठी काही काळ बंद करण्यात आलेले असतात किंवा वळवण्यात आलेले असतात. सुरक्षा कड्याच्या मागे पूर्णवेळ यात्री, त्यांच्यामागे पासधारक यात्री आणि त्यांच्यामागे एक दिवस चालणारे अतिथी यात्री चालत असतात. यात्रेच्या पुढे काँग्रेसच्या आणि राहुल गांधींच्या यूट्यूब चॅनलवरून यात्रेचे लाइव्ह प्रक्षेपण करणारे कॅमेरा वाहन, त्याच्यापुढे





मीडियासाठीचे वाहन चालते. सर्वांत पुढे काँग्रेस सेवा दल राष्ट्रध्वज घेऊन चालत असते. त्यासोबत काँग्रेसचे वरिष्ठ नेते चालत असतात. सर्वच बाबतीत नियोजन अत्यंत काटेकोरपणे केले गेले आहे, हे लक्षात येते.

यात्रेचे एकूण वातावरण भारावून टाकणारेच असते. यात्रेच्या स्वागतासाठी गावोगावी लोक रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेले दिसतात, सर्वच घरांवर, गच्चीवर, बाल्कनीत, बस स्टॉपच्या टपावर, झाडावर, जिथे उंच जागा मिळेल तिथे उभे राहून ते राहुलकडे पाहून हात उंचावून शुभेच्छा देत असतात, राहुलसुद्धा त्यांच्याकडे पाहून हात उंचावून प्रतिसाद देत असतो. रांगोळ्या काढून ओवाळण्यासाठी महिला उभ्या असतात, ठिकठिकाणी खास पोशाख, फेटे परिधान करून ढोल-ताशे, लेझीम पथक, नृत्य पथक कला सादर करत असतात. आदिवासी, पंजाबी पथके आपली लोककला सादर करत असतात. चौकाचौकांत 'भारत जोडो'बद्दल भाषणे होत असतात. यात्रा जवळ येताच काही लोक भेटून निवेदन देतात. त्यांच्या हातात विविध नारे लिहिलेले फलक असतात. गावातील अनेक तरुण महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इंदिरा गांधी, राजीव गांधी, राहुल गांधी, यांच्या भावमुद्रा टिपणाऱ्या तसबिरी घेऊन उंचावत 'राहुलजी, राहुलजी' म्हणून आवाज देत त्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत असतात. बहुतेक तसबिरी त्यांनी स्वतः रेखाटलेल्या, रंगवलेल्या, लाकडावर कोरलेल्या, अशा विविध प्रकारच्या असतात.

नाशिकहून छात्रभारती विद्यार्थी संघटना केंद्रातील सरकारचे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि राज्य शासनाच्या सरकारी शाळा बंद करण्याच्या धोरणाच्या विरोधात फलक घेऊन काही जण यात्रेत राहुलसोबत चालले. राहुलने त्यांच्याशी चर्चा करून तो विषय संध्याकाळच्या कॉर्नर सभेत घेऊन सरकारवर टीका केली. २००५ नंतर राज्य सरकारच्या सेवेत असलेल्या विविध विभागांतील कर्मचाऱ्यांनी त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी म्हणून अकोला जिल्ह्यातील पातूरमध्ये मोठी गर्दी केली होती. राहुल त्यांच्याकडे गेला आणि विषय ऐकून सायंकाळी भेटण्याची वेळ दिली.

यात्रेत नानाविध प्रकारे केंद्र सरकारच्या धोरणाला विरोध दर्शविणारे कल्पक फलक आणि युक्त्या करून राहुलचे लक्ष वेधून घेत होते. त्यांच्याकडे लक्ष जाताच राहुल त्यांना जवळ बोलावून घेत होता आणि त्यांचे फोटो काढले जात होते. राहुलजवळ जाऊन वैयक्तिक फोटो काढण्यास परवानगी नाही. यात्रेत राहुलला भेटणाऱ्या प्रत्येकाचे फोटो काढण्याची व्यवस्था काँग्रेसतर्फे करण्यात आलेली आहे. ते सर्व फोटो आणि व्हिडीओ काँग्रेसच्या वेबसाइटवर आणि समाजमाध्यमांवर तात्काळ टाकले जातात.

यात्रेत सुरक्षा कड्यातील पोलिस गर्दी करणाऱ्या तरुणांना मागे सारत असताना अनेक लोक खाली पडतात. मात्र, लगेच उठून पुन्हा सोबत पळू लागतात. नांदेडजवळच्या अर्धापूरमध्ये एक तरुण दुभाजकावरून पळत पळत राहुलकडे पाहून राहुलजी मैं चार बार गीर चुका हुं, राहुलजी मैं चार बार गीर चुका हुं, मुझे बुलाईऐ म्हणत होता. ज्यांची भेट ठरलेली असते त्यांची सुरक्षा तपासणी करून त्यांना त्या कड्यात राहुलसोबत चालण्यासाठी प्रवेश मिळतो, विनापरवानगी सुरक्षा कडे तोडून राहुलकडे झेपावणाऱ्यांना मात्र विद्युतगतीने बाहेर फेकले जाते. तरीही, राहुल चालता चालता मधेच थांबून एखाद्या झोपडीत किंवा चहाटपरीवरच्या माणसाच्या बोलावण्यावरून त्यांच्याकडे थांबून चहा पितो. चालता चालता कड्याबाहेरील कोणाही व्यक्तीला आत बोलावून तिला बोलते करतो. तो स्वतः क्वचितच बोलतो आणि जास्तीत जास्त वेळ ऐकत असतो. तो कधी अनपेक्षितपणे एखाद्या मजुराला जवळ बोलावून विचारपूस करतो, तर कधी त्याच्या कोकराला तर कधी कोणाच्या लहान मुलीला खांद्यावर घेऊन चालतो. अनेक लहान मुले, तरुण, तरुणी, महिला त्याच्यासोबत मोकळेपणाने बोलताना, त्याला मिठी मारताना आणि वयस्क महिला त्याच्या डोक्यावरून हात फिरवून गालाचा पापा घेतानाही दिसतात. राहुल कन्याकुमारी ते काश्मीर प्रेमाची, आपुलकीची, जिव्हाळ्याची पेरणी करत आहे, असेच दिसते.

सकाळी दहा ते सायंकाळी चार ही जेवण आणि विश्रांतीची वेळ असते. पहाटे लवकर उठून १२ किमी चालून झाल्यावर बहुतेक यात्रींना जेवणानंतर क्षणार्धात गाढ झोप लागते, अनेक जण आपलेच पाय चेपत बसतात, काही जण यात्रेदरम्यान काढलेले फोटो आपल्या सोशल मीडियावर टाकत असतात, तर काही उत्साही तरुण-तरुणी, बुढे-जवान डफाच्या तालावर मोठमोठ्याने चळवळीची गाणी गात असतात, अनेक जण गटागटांत चर्चा करत एकमेकांची ओळख करून घेत असतात, फोन नंबरची देवाणघेवाण करतात आणि कायमचे मित्र म्हणून जोडले जातात. पुढच्या प्रवासात एकमेकांना सहकार्य करत चालत जातात.

मात्र, या दुपारच्या विश्रांतीच्या वेळेतसुद्धा राहुल नियोजित कार्यक्रमानुसार अनेक शिष्टमंडळांना भेटतो, आत्महत्याग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन त्यांचे दुःख समजून घेतो, त्यांच्या विधवांचे सांत्वन करतो, पहाटे लवकर उठून यात्रेपूर्वी मच्छीमारांचे प्रश्न समजून घेतो, कोविडमध्ये वारलेल्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करतो, संस्थात्मक हत्या झालेल्या रोहित वेमुलाच्या आईला भेटून तिला मीसुद्धा तुझाच मुलगा आहे म्हणून आश्वस्त करतो आणि पत्रकार परिषद घेऊन 'भारत जोडो' यात्रेची भूमिका आणि यात्रेचे फलित याबाबत त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देतो.



'भारत जोडो' यात्रेदरम्यान महाराष्ट्रात राहुलच्या केवळ दोन जाहीर सभा होत्या – एक नांदेडमध्ये आणि दुसरी शेगावमध्ये. दोन्ही ठिकाणी रेकॉर्डब्रेक सभा झाल्या. त्याला ऐकण्यासाठी नांदेडच्या सभेत अडीच लाख लोक, तर शेगावच्या सभेत साडेचार लाख लोक आलेले होते. नांदेडमधील सभेत काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे मराठीमधून केलेले भाषण तर अत्यंत तडाखेबाज आणि सत्ताधारी पक्षावर घणाघात करणारे अविस्मरणीय असे होते.

दुपारी पाच-सहा तास विश्रांतीनंतर यात्रा पुढील पाडावापर्यंत १३ किमी चालते. तिथे चौक सभा घेतली जाते. त्यात पाच ते दहा हजार लोक असतात, त्यांच्यापुढे आयोजक आणि राहुल गांधी, असे दोनच वक्ते बोलतात. राहुल गांधी यात्रेचा उद्देश आणि देशापुढील प्रश्नांना धरून उपस्थितांशी संवाद साधतात. आज भारतात इतिहासातील सर्वांत जास्त बेरोजगारी आहे, महागाई वाढली आहे, प्रचंड वाढलेले पेट्रोल, डीझेलचे दर, घरगुती वापराचे स्वयंपाकाचे गॅस सिलिंडरचे दर, शेतकरी विरोधी कायदे, त्यांच्यावर झालेला अत्याचार, बड्या उद्योगपतींची कर्जमाफी, नोटाबंदी आणि चुकीच्या जीएसटीमुळे छोटे उद्योग आणि छोटा व्यापारी बुडाले आहेत, त्यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे, कोविडच्या गैरव्यवस्थापनामुळे लाखो लोकांना शेकडो किलोमीटर आपापल्या गावी चालतच जावे लागले, कोविडने लाखो लोक मृत्युमुखी पडले, भ्रष्टाचार प्रचंड बोकाळला आहे, कमिशन घेऊन कंत्राटे दिली जात आहेत, पैसे घेऊन सरकारी नोकऱ्या विकल्या जात आहेत, सरकारी शाळा बंद करून शिक्षण भांडवलदारांच्या घशात घातले जात आहे आणि याबाबत संसदेत आवाज उठवला तर त्यांचा माइक बंद करून विरोधकांचा आवाज दाबला जात आहे, सीबीआय, आयटी, ईडीचा धाक दाखवून विरोधकांना धमकावले जात आहे आणि विरोधी पक्षांची राज्य सरकारे पाडली जात आहेत, संविधानाची तोडमोड करून लोकशाही संपुष्टात आणून राजेशाही, हुकूमशाही आणण्याचा घाट घातला जात आहे, त्याच्या या बोलण्याला तरुण भरभरून प्रतिसाद देतात. अनेक वेळा समोरील जनतेला उद्देशून राहुल मधेच एखादा प्रश्न विचारतो आणि अनेक तरुण हात उंचावून उत्तरे देतात.

'भारत जोडो' यात्रेत चालताना अनेक अनुभव येतात, अनेक लोक भेटतात, विविध क्षेत्रांतील लोक जोडले जात आहेत. रोज कोणी विचारवंत, लेखक, पत्रकार, कलावंत, अभिनेता, अभिनेत्री, महात्मा गांधींचा पणतू तुषार गांधी यासारखी दिग्गज मंडळी पाठिंबा देण्यासाठी राहुलसोबत चालत आहेत. कोणत्याही पक्षाशी संबंध नसणारे अनेक लोक यात्रेत सहभागी होण्यासाठी येत आहेत, असेही दिसले. मुंबईत आयटी क्षेत्रात काम करणारे मोडक दांम्पत्य स्वतःच्या वाहनाने येऊन 'भारत जोडो' यात्रेत नांदेड-अर्धापूर मार्गावर चालताना भेटले. अंगाने स्थूल असल्याने दहा किलोमीटर चालून त्यांनी थांबायचा निर्णय घेतला; पण भारताची आजची सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती बदलायला हवी, म्हणून ते चालत आहेत, असे त्यांनी सांगितले. यात्रा सर्वदूर पोहोचली आहे.

'भारत जोडो' यात्रेत सहभागी झालेल्या एका महिला यात्रीने सांगितले की, महिलांनी आजकालच्या बहुतेक राजकारणी लोकांच्या सावलीलाही थांबू नये, असे वातावरण असताना एखादी महिला, एखादी तरुणी राहुल गांधीला अगदी सहजपणे मिठी मारू शकते, तर तो तिच्यातील विश्वास असतो, तिचा एक माणूस म्हणून स्वीकार होण्याचा विश्वास, तिथे स्त्री आणि पुरुष हा भेद गळून पडलेला असतो. भाजपा समर्थक ट्रोल आर्मी यावरून त्याचा कितीही दुस्वास करत असली तरी राहुल प्रत्येकीला आपला वाटतो, म्हणून ती स्त्री-पुरुष हा भेद विसरून मिठी मारू शकते. ज्यादिवशी तिला प्रत्येक पुरुषाबद्दल तितकाच निर्मळ विश्वास वाटेल त्यादिवशी स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार आपोआप थांबतील, असे तिला वाटते.

अजून एका महिला यात्रीने सांगितले, की आंतरजातीय – आंतरधर्मीय, प्रेम अथवा विवाहसंबंधात लव्ह जिहाद किंवा ऑनर किलिंग करणारे, जात पंचायत – खाप पंचायत चालवणारे शेवटी बळी देतात ते महिलेचाच. दोन्हीकडून बळी जाते महिलाच. याच्या मुळाशी आहे जागतिकीकरण, नव-भांडवलवादी अर्थकारण आणि त्यातून ढासळती अर्थव्यवस्था. यामुळे यापुढे महिलांवरील अत्याचारांत अधिक वाढ होण्याची भीती आहे. म्हणून लिंगभेद, लैंगिक अत्याचार हा आर्थिक प्रश्न कसा आहे, हे समजून घेऊन त्याची तातडीने सोडवणूक करण्याची गरज आहे. राहुलने कृष्णूरच्या (नायगाव नांदेड) एका सायंकाळच्या चौक सभेत त्याचदिवशी सकाळी एका लहान मुलीशी झालेला संवाद कथन केला, ती मुलगी म्हणाली, की लहान भावाने तिला त्रास दिला तरी आई-बाबा त्याला रागवत नाहीत. कारण ते त्याच्यावर अधिक प्रेम करतात. राहुल त्यावेळी म्हणाला, की मुलगा-मुलगी यात भेद करू नका, स्त्री ही माता आहे आणि तिच्याविना सृष्टी अपूर्ण आहे, तिचा सन्मान केल्याशिवाय भारत एक बलशाली राष्ट्र होऊ शकणार नाही. लिंगसमभावाचे महत्त्व समजून सांगण्याचा किती सोपा मार्ग त्याने दाखवला. प्रत्येक सभेत अशा अनेक अर्थपूर्ण कथा तो रोज शेअर

करत लोकांशी संवाद साधत असतो.

'नफरत छोडो' – उजव्या विचारसरणीचे लोक प्रत्येकाच्या मनात भीती घालून एकमेकांबद्दल द्वेषाची पेरणी करत आहेत आणि त्या द्वेषातून हिंसा जन्म घेत आहे, त्यामुळे हिंसा थांबवायची असेल तर प्रथमतः आपल्या मनातील भीती आणि द्वेष संपवणे गरजेचे आहे, हे राहुल गांधींचे विश्लेषण प्रत्येकाच्या मनाचा ठाव घेत आहे. त्यामुळे ''डरो मत बिल्कुल मत डरो, किसीसे मत डरो, डर को अपने दिल से निकाल फेको और देश के लिये काम करो'' या संदेशाला तरुण भरभरून दाद देत आहेत. ऐतिहासिक पुरावे देत सावरकर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या देशातील तरुणांचे आदर्श होऊ शकत नाहीत, अशी मांडणी करून राहुलने भाजपाची मोठी अडचण केली आहे, असे वाटते.

आमचे संपादक मित्र श्री. चेतन शिंदे यांच्या समन्वयाने डॉ. रावसाहेब कसबे आणि उत्तम कांबळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाला राहुल गांधी यांना जलंब, बुलडाणा येथे १९ नोव्हेंबर रोजी भेटण्याचे निमंत्रण काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यातर्फे आले. त्या शिष्टमंडळात मला राहुल गांधी यांना भेटण्याची संधी मिळाली. राहुलने त्या दिवशीच्या तीन शिष्टमंडळांचे शांतपणे ऐकून घेतले. शेवटी स्वतःचे मतही मांडले. काही तरुणांनी काँग्रेस पक्षात काम करण्याची इच्छा आहे; पण दलित, आदिवासी, बहुजनवर्गाला काँग्रेस पक्षात समान संधी मिळत नसल्याचे सांगितले. यावर कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या तरुणांना आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी एकत्र येऊन काँग्रेस पक्षात काम करण्याचे आवाहन त्याने केले. त्याच्या बोलण्यातून एक वेगळाच राजकारणी दिसला. त्याने आपली मते कोणतेही राजकीय आढेवेढे न घेता अत्यंत स्पष्टपणे मांडली. राहुलला ऐकताना तो केवळ निवडणुकीच्या राजकारणाचा विचार करत नाही, तर निवडणुकीच्या पलीकडच्या भारतीय राजकारणाची दिशा काय असावी याबद्दल अधिक गंभीरपणे विचार करतो आहे, असे वाटले. त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील अपार दुःख पचवून कुठलेही अवडंबर न माजवता लोकांमध्ये मिसळण्यासाठी पदयात्रा काढून हजारो किलोमीटर सामान्य वारकरी होऊन महात्मा गांधींच्या विचारांच्या वाटेवरून तो चालत आहे. राहुल विपश्यना करणारा एक विपश्शीही आहे. यात्रेदरम्यान किंवा सभेदरम्यान ऊन, वारा, पाऊस आला तरी तो थांबत नाही. त्याच्या पदयात्रेतून त्याच्यात बुद्धाच्या संघाची तपश्चर्या दिसते आहे. आता तो महानतेच्या वाटेने निघालेला आहे, त्याच्या चालण्यातून आणि चिंतनातून आजकालच्या राजकारणाचा पोत बदलायचा त्याचा निश्चय आहे, असे ध्वनित होत आहे.

माणूस म्हणून तो अतिशय निष्पाप, निर्मळ, आध्यात्मिक पातळीवर पोहोचलेला पण तितकाच मनमिळाऊ आणि दिलखुलास, कोणत्याही विकृतीचा स्पर्श नसलेला राजकारणी आहे, असेच वाटून गेले. रूढ अर्थाने राजकीय लोकांत असलेला बेरकीपणा, दुटप्पीपणा असले अवगुण त्याच्यात अजिबातच दिसले नाहीत. मनात एक आणि बाहेर दुसरेच असे राजकीय डावपेच मांडणाऱ्यांपैकी तो असूच शकत नाही, याची खात्री वाटली. त्यामुळे तो संसदेत आणि संसदेच्या बाहेर जे काही बोलतो त्यात त्याचा प्रामाणिकपणाच असतो, हे जाणवले.

विरोधकांनी अनेक वर्षांपासून हजारो करोड रुपये खर्चून त्याला ज्या प्रतिमेच्या रंगात रंगवण्याचा प्रयत्न केला आहे, तो प्रयत्न राखेप्रमाणे केव्हाच उडून गेला आहे आणि राहुलची पवित्र मनाचा माणूस म्हणून खरीखुरी प्रतिमा रोजच्या रोज लोकांसमोर येत आहे. त्यामुळे करोडो लोक त्याच्याशी जोडले जात आहेत. 'भारत जोडो' यात्रेतून त्याला खूप प्रेम आणि खूप शिकायलाही मिळाले, देशातील विविध भागांतील, विविध क्षेत्रांतील लोकांचे मूलभूत प्रश्न काय आहेत ते समजले, असेही तो म्हणतो आहे. 'भारत जोडो' यात्रा देशातील लोकांच्या मनातील पोकळी भरून काढत आहे. लोकांना



**लेखक राहुल गांधी यांच्या समवेत. पहिल्या रांगेत डावीकडून पहिले.**

अशी काही कृती, असा काही प्रयत्न हवाच होता, म्हणून तेही उस्फूर्त प्रतिसाद देत आहेत. यात्रेमुळे काँग्रेस पक्षाचा, त्यांच्या तळागाळातील कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास नक्कीच दुणावला असेल. 'भारत जोडो'ने भारत सांधला जाईल, असा विश्वास वाटतो. लोकशाही बळकट होण्याच्या दिशेने लाखो पावले पडत आहेत, हे मात्र नक्की.

२० नोव्हेंबर रोजी जळगाव जामोद येथून 'भारत जोडो' यात्रा महाराष्ट्राचा निरोप घेऊन मध्य प्रदेशात दाखल झालेली आहे. महाराष्ट्रापेक्षा अधिक जोमाने तुम्ही सामील झालात, अशा शब्दांत राहुलने मध्य प्रदेशातील जनतेचे कौतुक केले आहे. यावरून उत्तर भारतात 'भारत जोडो' यात्रा आणखीन जोमाने मार्गक्रमण करेल, असे वाटते. भारत जोडण्याच्या दक्षिण-उत्तर यात्रेनंतर पुढची 'भारत जोडो' यात्रा पश्चिम-पूर्व भारत अशी निघेल, असे ऐकण्यात येत आहे, त्यासाठी राहुलला खूप खूप शुभेच्छा ! ●●●

**(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत.)**

# धर्मनिरपेक्ष समाज आणि साहित्य



डॉ. यशवंत मनोहर

**धर्मनिरपेक्षता ही सर्वव्यापी माणुसकीची हमीच आहे अशी माझी ठाम समजूत आहे. पंचाऐंशी टक्क्यांमध्ये देशातले सर्व धर्मनिरपेक्षतावादी आहेत. त्यात आदिवासी, भटके-विमुक्त, ख्रिश्चन, मुस्लिम, बौद्ध, ओबीसी आणि सर्व भगिनीही आहेत. यांना जोडणे म्हणजे धर्मनिरपेक्ष लोकांचा भारत जोडणे आहे. वर्णांनी, जातींनी आणि वर्गांनी भारत फाटत असेल तर स्त्रियांच्या पारतंत्र्याचे आणि जातींचे, वर्णांचे आणि वर्गांचे निर्मूलन करणे हाच भारत जोडण्याचा अर्थ होईल, असे झाले तरच धर्मनिरपेक्षतेचा मार्ग निष्कंटक होऊ शकतो.**

**ज्येष्ठ साहित्यीक डॉ. यशवंत मनोहर यांना समता परिषदेच्यावतीने जाहिर करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यातील संपादीत भाषण...**

संग्रामनायक जोतीराव फुले आणि आपल्या सर्वांच्याच शिक्षणाची आरंभमाता सावित्रीमाई फुले यांना आपण सर्वच प्रथम कृतज्ञतापूर्वक वंदन करू!

क्रांतिनायक फुले समता पुरस्कार प्रदान सोहळ्याचे अध्यक्ष मा. छगनजी भुजबळ, प्रज्ञामंचावरील इतर सर्वच मान्यवर आणि या समारंभात अगत्याने सहभागी झालेल्या सर्व भावंडांनो!

प्रथम मी संग्रामनायक जोतीराव फुले समता पुरस्कार देऊन माझा सन्मान केल्याबद्दल सन्माननीय छगनजी भुजबळ यांच्यासंबंधी कृतज्ञता व्यक्त करतो आणि प्रतिष्ठ पुरस्कारासाठी माझी निवड करणाऱ्या समितीच्या सर्व मान्यवर सदस्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. जोतीराव फुल्यांनी ''प्रत्येक स्त्रीपुरुष मानवाने दुसऱ्या व्यक्तीचे नुकसान न करिता, त्यास कोणत्याही तऱ्हेचे आचरण करण्यास अधिकार जर आहे तर तुम्ही कोणत्याही धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांची आवडनिवड न करिता त्या सर्वांबरोबर बहिण-भावंडांप्रमाणे सत्य वर्तन करण्याचा क्रम चालू करा.'' (स.वा.५०४) असे स्पष्टपणे सांगितले आणि त्यांनी सर्वधर्मीय एकत्र कुटुंबाची संकल्पनाही मांडली.

**'ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी**
**धरावे पोटाशी बंधूपरी,**
**मानव भावंडे सर्व एक सहा**
**त्यामध्ये आहा तुम्ही सर्व**
**बुद्धी सामर्थ्याने सुख द्यावे घ्यावे.**
**दीनास पाळावे जोती म्हणे.'(स.वा. ५३७)**

ही जोतीरावांची एकमय म्हणजे धर्मनिरपेक्ष समाजाचीच संकल्पना आहे. ही सर्वधर्मसमावेशकतेचीच वा धर्मनिरपेक्षतेचीच विधायक संकल्पना आहे. त्यापासून शूद्रादि अतिशूद्र लोकांचे थोडे का नुकसान होत आहे? यास्तव त्यांनी वेदकर्त्या ईश्वरासहीत चार वेदांवर भरोसा ठेवून आपल्यास हिंदू तरी कशाकरिता म्हणवून घ्यावे? (स.वा. :४९७) जोतीराव फुल्यांच्या या उक्तीत सार्वजनिक सत्य धर्माच्या निर्मितीचे कारण दडलेले आहे असे मला वाटते. जोतीराव फुले नवधर्मसंस्थापक आहेत. ही गोष्ट आपण लक्षात घ्यायची गरज आहे. म्हणून जोतीराव फुल्यांना मी एकोणिसाव्या शतकातील क्रांतीचे महानायक मानतो. विसावे शतक जसे बाबासाहेब आंबेडकरांचे शतक आहे. तसे एकोणिसावे शतक जोतीराव फुल्यांचे शतक आहे आणि यापुढची सर्वच शतके बुद्ध, शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर यांची आणि भारतीय संविधानाचीच शतके असतील हे मी निः शंकपणे सांगतो. जोतीरावांनी आपली बौद्धिक परंपरा कपिलांचे सांख्य तत्त्वज्ञान, लोकायत तत्त्वज्ञान आणि बुद्धाचे तत्त्वज्ञान अशी अधोरेखित केली. त्यातलेही मर्म समजावून घ्यायला हवे.

सिंधुश्रमणसंस्कृती ही इ.पू. किमान पाच हजार वर्षांपासूनची आहे. ती इहवादी समतेची गणतंत्रप्रधान संस्कृती होती. या संस्कृतीत कर्मविपाक वा चातुर्वर्ण्य नाही. गण म्हणजे छोटी लोकराज्ये. अनेक गणांच्या अधिनायिका स्त्रियाच होत्या. ही आदिम साम्यवादाचीच रचना होती. या संस्कृतीमधील भौतिक मूल्यांच्या पायावरच कपिलांचे सांख्यतत्त्वज्ञान आणि लोकायत तत्त्वज्ञान उभे आहे. बुद्धाच्या तत्त्वज्ञानालाही ही इहवादी समतेची पार्श्वभूमी आहे. पुढे सम्राट अशोक, शिवराय, फुले-शाहू-आंबेडकर आणि भारतीय संविधान या मार्गाने चालत आलेली धर्मनिरपेक्ष भारतीयत्वाची संकल्पनाच आजवर सुरू आहे. पाश्चात्त्य आधुनिकत्वाशीही आणि

जागतिक मानवाधिकारांच्या प्रकल्पांशीही या आपल्या प्रकाशपरंपरेचे घनिष्ठ नाते आहे. संविधानातील स्वतःला ‘आम्ही भारतीय लोक’ म्हणवणारांची हीच परंपरा आहे. ही सर्व पुनर्रचनादी परंपरा धर्मनिपेक्षतावादीच आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे सौहार्द! सलोखा! वैदिकांनी गणतंत्रांवर हल्ले करून, चातुर्वर्ण्य निर्माण करून आणि एकवर्णी राजेशाही स्थापन करून ही धर्मनिरपेक्षता प्रथम दुर्बळ करण्याचा अपेशी प्रयत्न केला. पुढे पुष्यमित्राने बृहद्रथाची धर्मनिरपेक्ष राजवट नष्ट केली आणि शिवरायांची धर्मनिरपेक्ष राजवट ओलांडून कट्टर मनुमय पेशवाई निर्माण केली गेली, हेच पुढेही आपल्याला दिसते. संविधानाची धर्मनिरपेक्षता मोडीत काढण्याचे आणि एक धर्म, एक नेता आणि एकपक्ष अशी सत्ता आणण्याचे प्रयत्न आज होत आहेत. हा इतिहास आपण लक्षात घेतला तर धर्मनिरपेक्षता आणि धर्मांधता असाच संघर्ष आजवर सुरू असल्याचे आपणास दिसते आणि हा संघर्ष केवळ संविधानाच्या विरोधात नाही तर तो बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, जोतीराव फुले, शिवराय, बसवण्णा, सम्राट अशोक, बुद्ध, लोकायत, कपिल या सर्वांच्याच विरोधात आहे, म्हणजे संपूर्ण एतद्देशीय सिंधुश्रमणसंस्कृतीच्या विरोधात आहे. म्हणजे हा संपूर्ण विरोध भारतीय धर्मनिरपेक्षतेलाच आहे.



भावंडांनो, आपली परंपरा आपण नीट समजावून घ्यायला हवी. आपल्या हातात कोणाचे हात हवेत, आपल्या पावलांपुढे कोणता रस्ता हवा आणि आपल्या डोळ्यांपुढे कोणती दिशा हवी या प्रश्नांचा आज आपण विशेषच गंभीरपणे विचार करायची गरज आहे. त्यावेळच्या ब्राह्मणी व्यवस्थेने जोतीरावांचा जीव घ्यायला कोणाला पाठवले? रोढे रामोशी आणि धोंडिराव कुंभाराला! ज्यांच्या मानवी हक्कांसाठी जोतीराव आंदोलन करीत होते त्यांच्यातीलच दोघांना पाठविले.त्यांनी फुल्यांचा जीव घेतला नाही. उलट तेच पुढे फुल्यांचे संरक्षककवच झाले. मानवमुक्तीची जोतीरावांची चळवळ बलशाली करणारे रोढे रामोशी आणि धोंडिराव कुंभार आपल्याला होता आले पाहिजे. आपल्यासाठी उजेड घेऊन आलेले, मुक्तीचा दिवस घेऊन आलेले हात आपण समजावून घ्यायला हवेत. आपण आपली परंपरा, आपले महानायक आणि आपल्या मुक्तीचे त्यांचे तत्त्वज्ञान समजावून घ्यायला हवे. आपल्या या परंपरेचा विचार विज्ञानासोबत, जागतिक प्रबोधनासोबत आणि जगाला मार्गदर्शन करीतही चाललेला आहे. आपण आपली ताकद ओळखायला हवी आणि ही ताकद आपण सहविचारी, सहध्येयी मित्रांची संख्या वाढवण्यासाठी उपयोगात आणायला हवी.

शोषणसत्ताक आणि त्याचे तत्त्वज्ञान या गोष्टी दोन नसतातच. म्हणून व्यवस्था नाकारायची आणि तिचे तत्त्वज्ञान कवटाळायचे ही प्रक्रिया व्यवस्था टिकवून ठेवणारीच असते. आपला पंचाऐंशी टक्के समाज आजही याच अंतर्विरोधात अडकलेला आहे. आपली भारतीय बौद्धिक परंपरा आपण समजावून घेतली आणि तिची तत्त्वे वर्तनातून प्रकाशित झाली तरच खऱ्या अर्थाने आपण स्वतंत्र होऊ शकतो. भावंडांनो! एक कळीचा मुद्दा इथेच आपण लक्षात घ्यायला हवा. पंचाऐंशी टक्के लोकांचा विराट समाज ज्या दिशेने जाईल तीच दिशा विजयी होईल. हा समाज धर्मनिरपेक्षेच्या बाजूने गेला तर धर्मनिरपेक्षता विजयी होईल आणि धर्मांधतेकडे गेला तर हा समाजच धर्मांधतेच्या विजयाचाही शिल्पकार ठरेल. भावंडांनो, मला धर्मनिरपेक्षतेचा विजय व्हावा असे वाटते. हा विजय सर्वांच्याच हिताचा आहे असे मला आपल्या बुद्धाने, आपल्या शिवरायांनी, आपल्या फुल्यांनी, आपल्या शाहू राजांनी, आपल्या बाबासाहेब आंबेडकरांनी आणि आपल्या संविधानानेही सांगितले आहे. म्हणून एकमय धर्मनिरपेक्षतेसाठी कोणीही उठाव सुरू केला तर आपण सर्वांनीच अशा प्रत्येक लढ्यासोबत असले पाहिजे असे मला मनापासून वाटते.

धर्मनिरपेक्षता ही सर्वव्यापी माणुसकीची हमीच आहे अशी माझी ठाम समजूत आहे. पंचाऐंशी टक्क्यांमध्ये देशातले सर्व धर्मनिरपेक्षतावादी आहेत. त्यात आदिवासी, भटके-विमुक्त, ख्रिश्चन, मुस्लिम, बौद्ध, ओबीसी आणि सर्व भगिनीही आहेत. यांना जोडणे म्हणजे धर्मनिरपेक्ष लोकांचा भारत जोडणे आहे. वर्णांनी, जातींनी आणि वर्गांनी भारत फाटत असेल तर स्त्रियांच्या पारतंत्र्याचे आणि जातींचे, वर्णांचे आणि वर्गांचे निर्मूलन करणे हाच भारत जोडण्याचा अर्थ होईल, असे झाले तरच धर्मनिरपेक्षतेचा मार्ग निष्कंटक होऊ शकतो.

विसाव्या शतकाच्या मध्यावर आपल्या शहाण्या नेत्यांनी आपल्या देशाचे भारत हे नाव ठेवले आणि भारताच्या हातात धर्मनिरपेक्षतेचा राष्ट्रध्वज दिला. संपूर्ण जगात आपली ओळख धर्मनिरपेक्ष भारतीय म्हणूनच व्हावी. कोणाही धर्माचे लोक म्हणून जगाने आपल्याला ओळखू नये तर जगाने आपल्याला धर्मनिरपेक्ष भारताचे धर्मनिरपेक्ष लोक म्हणून ओळखावे. तोच आपल्या सलोख्याचा पुरावा ठरेल. धर्मनिरपेक्षता ही आपली संविधानसंस्कृतीच आहे. ही संस्कृती उन्नयनशील सौंदर्याचीच संस्कृती आहे. धर्म, वंश, जात, लिंग वा जन्मस्थान अशा कोणत्याही कारणावरून भेदभाव केला जाऊ नये सर्वांना सममूल्यता लाभावी असे या संस्कृतीचे ध्येय आहे. धर्मनिरपेक्षतेचा अर्थ बंधुता आणि भगिनीता हाच आहे. सद्विचार करण्याचे आणि मांडण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकालाच आहे, पण सद्विचाराचेच आपण आज भय घेतलेले आहे. त्यामुळे आर्थिक, वैचारिक आणि नैतिक भ्रष्टाचाराच्या वणव्यात आपला समाज

सापडला आहे. वरील सर्वव्यापी भ्रष्टाचाराने आपले सांविधानिक चारित्र्यच उद्ध्वस्त केले आहे. एका भारतीयाने दुसऱ्या भारतीयाचा सन्मान करणे हीच सांविधानिक सभ्यता आहे. धर्मनिरपेक्ष लोकशाहीची सर्वव्यापी मानवता आणि नागरी संस्थांची संविधाननिष्ठ स्वायत्तता जपली गेली पाहिजे. कोणत्याही पक्षाने त्यांचा गैरवापर करू नये. असे झाले तर धर्मनिरपेक्षता या मूल्याची वाताहात होणे अटळच असते आणि सांविधानिक धर्मनिरपेक्षता संकटात सापडली आहे असाच त्याचा अर्थ होईल. एकाधिकारशाहीला लोकाधिकाराशाही कधीच मान्य होत नसली तरी लोकशाही म्हणजे धर्मशाही, पक्षशाही वा एकनेताशाही नव्हे.

ही पायाभूत गोष्ट नियोजन पद्धतीने नाकारली जाते तेव्हा लोकांची हितशाही म्हणजे लोकशाही नावापुरती उरते आणि एकधर्मी सत्तेसाठी देश वेठीला धरला जातो. ही धर्मासाठी आणि त्यातील थोड्या अभिजनांसाठी पंचाऐंशी टक्के लोकांच्या सर्वव्यापी हिताची पायामल्लीच असते. लोकशाहीच्या आणि संविधानाच्या सत्याचा उच्चार नाकारला जातो. दहशतीचे सांस्कृतिक पर्यावरण तयार केले जाते. लोकशाही ही चर्चाशाही आहे. सर्वानुमते सर्वांच्या समान हिताची प्रस्थापना करणारी ती सर्वहितशाही आहे. म्हणून व्यक्तीपातळीवरील, पक्षपातळीवरील, वैचारिक पातळीवरील विरोध लोकशाहीच्या यशासाठी पोषकद्रव्यासारखा मानला जातो. लोकांच्या हितासाठी राजकारण करणारी ती यंत्रणा असते. सत्ता हाती आलेल्या पक्षाने पक्षमनस्कता बाजूला ठेवून संविधानमनस्क व्हायचे असते. कारण पक्षातील लोकांना संविधानपद्धतीने लोकांच्या हिताचे समाजकारण आणि अर्थकारण करण्यासाठी लोकांनी निवडलेले असते. त्यामुळे शासन करणारे प्रतिनिधी पक्षाचे उरत नाहीत. ते देशाचे होतात. सर्वांचे होतात. कारण ते संविधानप्रवक्ते वा सर्वांच्या हिताचे प्रवक्ते होतात. ते धर्मनिरपेक्ष होतात.

हिंसेने प्रश्न सुटत नाहीत. प्रश्न निर्माण होतात. भारतीय संविधानात हिंसेचे निर्मूलन करणारी महान सलोखानीती आहे. समाज धर्मनिरपेक्ष होण्यासाठी आधी राजकारण धर्मनिरपेक्ष व्हावे लागते. राजकारण धर्मनिरपेक्ष झाले की ते धर्मनिरपेक्ष शिक्षणव्यवस्था आणि अर्थव्यवस्था निर्माण करते. या सर्व व्यवस्था धर्मनिरपेक्ष माणूस, धर्मनिरपेक्ष मन आणि माणसांचे धर्मनिरपेक्ष संबंध निर्माण करतात. धर्मनिरपेक्ष मन म्हणजे सर्वसमावेशक मन! 'जेथे जातो तेथे माझी भावंडे आहेत, सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसातहेत' असे मानणारे एकमय मन! हे मन निर्माण करण्यासाठीच देशातील सर्व यंत्रणांनी झटायचे असते. राजकारणाने धर्मनिरपेक्ष मन निर्माण करण्याचे अभियान राबवावे, समाजाने धर्मनिरपेक्ष राजकारण, संस्कृती, अर्थकारण आणि शिक्षण निर्माण करावे. समाज असा सर्वव्यापी धर्मनिरपेक्ष झाला तर धर्मनिरपेक्ष साहित्य निर्माण करणारे साहित्यिक निर्माण होतील. संपूर्ण साहित्यविश्वच मग धर्मनिरपेक्ष होईल.

धर्मनिरपेक्षता हे समाज सुंदर करणारे महामूल्यच आहे आणि साहित्याच्या सौंदर्याचेही तेच प्रमाणशास्त्र आहे. समाजाची सौंदर्यमूल्ये आणि साहित्याची सौंदर्यमूल्ये ही एकमयच असतात. या महामूल्यालाच आपण सौहार्द, सलोखा वा धर्मनिरपेक्षता म्हणतो. 'प्रत्येक स्त्रीपुरुष मानवाने दुसऱ्या व्यक्तीचे नुकसान न करिता... कोणत्याही धर्मासह त्यांच्या अनुयाची लोकांची आवडनिवड न करिता त्या सर्वांबरोबर बहिणभावंडांप्रमाणे सत्यवर्तन करण्याचा क्रम चालू करा.' असे जोतीराव फुल्यांचे वचन आरंभी मी उद्धृत केले आहे. या वचनात मानवी जीवनाचा आणि साहित्याचाही पूर्ण सौंदर्यसिद्धान्तच दडलेला आहे. सर्वमानवसमभाव हेच त्याचे मर्म आहे. हेच धर्मनिरपेक्षतेचे सौंदर्यतत्त्व आहे. पण आज व्यवस्था या सौंदर्यतत्त्वाच्या विरोधातच कार्य करते. आपले पोपट लेखक तयार करते. हे पोपट मूलतत्त्ववादांच्या पिंजऱ्यात व्यवस्था देईल त्यावर जगत असतात, हे मिंधे वा विकले गेलेले साहित्यिक व्यवस्था शिकवेल तेवढेच बोलत राहतात. हे व्यवस्थेचे भक्कमीकरणच असते. चातुर्वर्ण्यात श्रेष्ठस्थानी असलेल्या सुपरवर्णाची चाकरी ते करीत असतात. वैदिक परंपरेने शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांना वरील तीन वर्णांची सेवा करायला लावते. त्याप्रमाणे साहित्यिकांचा हा वर्गही धुरीणांची सेवाचाकरी इमानेइतबारे करीत असतो. यासाठी 'ब्रिटिशांनी आपली शिक्षणपद्धती नष्ट केली.' असे म्हणणारे एक उदाहरण देतो. कोणती शिक्षणपद्धती ब्रिटिशांनी नष्ट केली, ती कोणासाठी होती? ब्रिटिशांनी भौतिक शास्त्रांचा अभ्यास सुरू केला. सार्वत्रिक शिक्षणाची रुजवात इथे आहे. जोतीराव आणि सावित्रीमाई यांना नव्या शिक्षणाची सुरुवात का करावी लागली? स्त्रियांना, शूद्रांना आणि अतिशूद्रांना शिक्षण देणाऱ्या जोतीरावांना, सावित्रीमाईंना कोणत्या शिक्षणपद्धतीत तयार झालेले लोक कडवा विरोध करीत होते. या नव्या सार्वत्रिक शिक्षणामुळे कोणाची अधिसत्ता संपुष्टात येणार होती? उच्चवर्णाच्या शोषणसत्ताकाला धक्का लावणारे व्यवस्थेला काहीही नको होते आणि जोतीराव तर हेच करीत होते. ब्रिटिशांनी नष्ट केलेल्या शिक्षणपद्धतीतून निर्माण झालेले पोपट धर्मनिरपेक्ष साहित्य निर्माण करूच शकत नाहीत. ते मूठभर अभिजनांच्या वर्चस्वाची तरफदारी करीत असतात. धर्मनिरपेक्ष समाज आणि धर्मनिरपेक्ष साहित्य निर्माण होणार नाही यासाठी झटत असतात. हा समाजाचे मानसिक आरोग्य उद्ध्वस्त करण्याचाच डाव असतो. हे वर्चस्वाचेच वाङ्मयीन राजकारण असते. जोतीराव फुले धर्मनिरपेक्ष समाजासाठी व धर्मनिरपेक्ष साहित्यासाठी सर्वांच्या समान हिताचे सत्यशोधक राजकारण उभे करतात. ते ग्रंथकारसभेला १८८५ साली लिहिलेल्या पत्रात ठासून सांगतात... 'यापुढं आम्ही शूद्र लोक, आम्हास फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुळणार नाही. सारांश, यांच्यात मिसळल्याने आम्हा शूद्र अतिशूद्रांचा काही एक फायदा होणे नाही. याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे.'' हाच धर्मनिरपेक्ष भारतीयत्वाचा सुंदर इत्यर्थ आहेत. धर्मनिरपेक्ष समाजाच्या निर्मितीचे आणि धर्मनिरपेक्ष साहित्याच्या निर्मितीचे संपूर्ण प्रमाणशास्त्र जोतीराव फुल्यांच्या लेखनात आहे आणि आपल्या सिंधुश्रमणसंस्कृतीपासून भारतीय संविधानापर्यंत हे राजकारणच शोषणसत्ताकाशी निकराने संघर्ष करीत आहे. आपल्या सर्वहिताय भारतीय धर्मनिरपेक्षतेचाच हा मर्मार्थ आहे. असे तुमचा एक साहित्यिक म्हणून मला वाटते.

संग्रामनायक जोतीराव फुले समता पुरस्कार देऊन माझा गौरव केल्याबद्दल आपणा सर्वांसंबंधीच मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो आणि माझ्या बोलण्याला पूर्णविराम देतो. धन्यवाद! ●●●

# जेहि घट प्रेम न संचरै

**२००५ ते २००९ या चार वर्षांत वीस स्त्रियांची हत्या करणारे मोहन, कर्नाटक आणि तामिळनाडूतील तीस बलात्कार व पंधरा हत्या करणारे जयशंकर, बहराइचचे लाल महाराज यांना कायद्याने शिक्षा होईलही (काहींना होणारही नाही.) पण खरंच ते एकटेच गुन्हेगार आहेत का? ती माती, ते वातावरण, ती हवा यांचं काय जे अशांना पोसतं, त्यांना 'रक्तबीज' बनवतं.**

डॉ. शशिकला राय

कबीर म्हणतात, 'ज्या हृदयी प्रीतीचा, प्रेमाचा ओलावा नाही ते हृदय स्मशानवत् भासते.' 'प्रेम', 'इश्क', 'मुहब्बत' म्हणजे काय? मी दुःख, वेदना व उद्वीग्नतेशी झगडत असताना हे जाणून घेण्याची मला का आवश्यकता वाटते आहे? माझ्या अवती-भोवती श्रद्धा, बिल्किस व बहराइचची तरूणी व त्यासोबत अशाच शापित नावांची अखंड मालिका आहे. ही आरसा बनून त्यात आपला क्रुर चेहरा दखवत आहे. वाटतं- भारतेंदू हरिश्चंद्रांसारखं जगाला आवाहन करावं, 'आवहू सब मिलि रोवहू भाई हा हा भारत दुर्दशा देखी न जाइ।' खरंच दुःख, निराशा, लाज-शरम यांबाबत लिहिलं जाऊ शकतं- लिहिता येतं? नाही ना-मग मी 'काळा'वर लिहिते आहे, कारण लिहिलेला काळ सरून जात नाही, त्याचे तुकडे केले जाऊ शकत नाहीत. त्याची हत्याही केली जाऊ शकत नाही. लक्षपूर्वक ऐकू या, ऐकू येईल की, येणारा काळ आपला धिःक्कार करत आहे. आपल्या सर्वांना मिळून एका रूग्णाइत मनसिकतेशी लढायचं आहे. हाच धर्म आहे. हीच आताची नैतिक जबाबदारी आहे.

प्रेम म्हणजे काय? लोकशाही की हुकुमशाही आहे? ही शिक्षा आहे की संजीवनी? हे देणं जाणतं का फक्त घेणं? खुदा आहे की सैतान? हेशरीर आहे का आत्मा? हेशक्यतांमध्ये वास करतं का इतिहासात? नीत्शे सारखं का म्हणू नये, ईश्वरच नाही तर'प्रेम' ही मेलंय? मृत ईश्वर आणि मृत प्रेम इतकं हिंसक का बनलंय? तथागत कुठल्या 'मैत्री'ची गोष्ट करताहेत? का म्हणतात-सारं नेस्तनाबूत झालं तरी करूणा शाबूत राहिल? 'मैत्र' टिकून राहिल? कबीर कुणाबाबत म्हणत आहेत-'ढाई आखर प्रेम का पढे सो पंडित होय।' मित्रांनो-प्रश्न विचारत रहा! मी एक माणूस आहे (फक्त स्त्री मानली जाण्यासाठी शापित, केवळ 'योनी' मानली जाणारी, युगानुयुगांची यात्रा करणारी 'अहिल्या''मी') आणि अशा विचित्र मनस्थितीत आहे की, चित्त थत्तऱ्यावर नाही आणि मन स्वस्थ नाही. मी आणि माझ्यासारखी शेकडो माणसं या कारणास्तव जिवंत आहेत, का-की, त्यांना जीवापाड प्रेम करणारं कोणी भेटलं नाही म्हणून? मला कळतंय, वाचणाऱ्या तुम्हाला हे विचित्र व काहीसं असंतुलित वाटेल. जरा विचार करून पाहा, मी स्त्री देहाचे पस्तीस तुकडे, ओरबाडून काढलेलं गर्भाशय व जखमी योनी, अकरा मोकाट तुटलेल्या-मिशांना पीळ देणाऱ्या बलात्काऱ्यांच्यात, ॲसिडने जळणाऱ्या भूमिवर बसले आहे-आणि माझ्या आसपास आहेत-लक्ष्मी, मनोरमा, सोनी सूरी. तुम्ही माझ्याकडून संयमित-संतुलित राहण्याची अपेक्षा करता आहात? कोणता योगाभ्यास आहे? आमच्यासाठी, तसेही 'राम देवबाबांनी' योग सर्कशीतील कसरतीसारखा केलाय.

रोहित वेमूला म्हणतात, 'आपण मानवी इतिहासाच्या सर्वाधिक



विकट काळात जगत आहोत.' हो खरंच आपण प्रेमविहीन काळात जगत आहोत जिथं मुहब्बत-'प्रेम' आपला खरा अर्थच गमावून बसलंय. आपण सगळे 'गिधाडं' बनत चाललोय. आपण हत्या, आत्महत्या, दंगे, उद्दाम वासनेसोबत आपले भयावह पंख पसरून चहूबाजूला घिरट्या घालत आहोत. वंश, वर्ण, जात, धर्म यांची पोटपूजा करता यावी ज्यामुळे घृणा, विद्वेष मजबूत होतील असं 'महाभोज!'कुठे माठाचं पाणी, कुठे मिघवाल! कुठे स्त्रीदेह. घाला घाला की मग मारण्याच्या कलेत झालात निष्णात! जगभरात हिंसा दिवसेंदिवस वाढत चालली आहे व अधिकाधिक शक्तिशाली (बलशाली) पण! हिंसेच्या आगीत लेखक, पत्रकार, चिंतक, दार्शनिक, शिक्षक, वकील-बुद्धिजीवींचे चेहरे चमकताहेत. आपण हिंसेवर भाषणं देतो, वाहवा-टाळ्या मिळवतोय-मुक्तिबोधांच्या

शब्दात सांगायचं तर-'गुन्हेगारांचं मोठं एकच कुटुंब', दुःखाचा बाजार भरभराटीत आहे, भाव वाढतोय, शेअर वधारतोय. चला आपण सगळे मिळून 'स्वप्नातील भारता'वर बोलू या. (बापू क्षमा करा.) स्वप्नं नेहमी भविष्याच्या गोष्टी करतात. स्वप्नं वर्तमानाची प्रत्येक दोषातून सुटका करतात. आपल्याला 'आज' व'आता'ला बदलायचं आहे. मला वर्तमानासाठी लढायचं आहे. मला आजचा भारत बदलायचा आहे. 'बदलायचंय' हा शब्दसुद्धा केवळ 'निरर्थक' बडबड बनून गेलाय. या अपेक्षांचे खंदे पाठीराखे, पायिक- नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, गौरी लंकेश मात्र सुळावर चढवले गेले. आपण सगळे अनवाणी पायांनी हिंसक अंतहीन रस्त्यावर चालत आहोत. धोका सर्वव्यापी आहे. माणूसकीचे झरे आटत चाललेत, प्रेमाचं इंधन संपत आलंय. कबीर डोक्याला हात लाऊन बसलेत की, की हे काय म्हणून गेलो, 'शीश उतारै भुई धरै।' गालिब पश्चाताप करत आहेत असं म्हणून की 'मुहब्बत मं नहीं है फर्क जीने और मरने का।'

एखादी नजर कधी कोणावर उत्कटनेते, समुद्राच्या खोल तळातून उठावी अशा उमाळ्यातून भिडते आणि सांगते, 'म झ्यावर विश्वास ठेव, मी आहे ना?' एखाद वेळी या नजरेतलं प्रेम आटलं-अटूते हरकत नाही-पण हिंसा व क्रौर्य प्रकट व्हावं-पाहणारा तिथंच गोठून जातो.

मला मार्च २०१८ मध्ये जाळून मारण्यात आलेल्या ऐश्वर्या बिलरवान आठवते-मोठ्या-मोठ्या डोळ्यांची, सावळ्या-रेखीव चेहऱ्याची! प्रेमात पडली होती! प्रेम विचारून थोडंच झालं होतं. आतून आलं आणि सर्वच घेऊन गेलं. आपलं प्रोजेक्ट मैत्रिणीकडे देऊन पहाटे पाच वाजता बाहेर पडली प्रियकराला भेटायला-घरी पोहोचताच प्रिरूकरानं शरीरावर रॉकेल वा पेट्रोल टाकून काडी पेटवून दिलीन. एक जिवंत शरीर धगधगत्या आगीत भस्मसात होत होतं. तसंच दरवाजाबाहेर ढकलून दिलं गेलं. शेजाऱ्यापाजाऱ्यांची दारं बंद! खिडक्या शरमून थोड्याफार किलकिल्या! जळत्या ऐश्वर्याच्या तोंडातून किंचाळी फुटली नाही. 'अहिल्या सिंड्रोम'ग्रस्त. तिथून जाणाऱ्या पोलीसांच्या जीपने जळती आकृती पाहून जीप थांबवली. मागून घेतलेल्या कांबळ्यात गुंडाळून तिला पुण्यात आणलं गेलं. तिथं दोन-तीन दिवसांत शेवटचा श्वास घेऊन जात, धर्म, समाज, प्रांत सगळ्यांना निर्दोष मुक्त केलंन. ही घटना तिथं घडली जिथं आसपास 'डिस्कव्हरी इंडिया' लिहिलं जाण्याचा गंध व्यापलेला आहे. विद्यापीठ गप्प! एखाद दुसरी श्रद्धांजली टाकली गेली फेसबुकवर-बस! निर्भया कांडच्या वेळी कॅन्डल मार्च काढणारं विद्यापीठ??? एक शोकसभा पण नाही. अजब सहिष्णू जगद्गुरू आहे हा देश. इथं गुन्हा करणं अनैतिक वा अश्लील नाही, त्यावर बोलणं अश्लील आहे. खरं बोलल्यामुळे देश, धर्म, जात, संस्कृती सगळे दुखावले जातात. पूजा, सत्य+नारायणाची केली जाते. म्हणजे सत्य हेच नारायण मानून आणि पोथी वाचली जाते कलावतीच्या खोटेपणाची.

२००५ ते २००९ या चार वर्षांत वीस स्त्रियांची हत्या करणारे मोहन, कर्नाटक आणि तामिळनाडूतील तीस बलात्कार व पंधरा हत्या करणारे जयशंकर, बहराइचचे लाल महाराज यांना कायद्याने शिक्षा होईल ही (काहींना होणारही नाही.) पण खरंच ते एकटेच गुन्हेगार आहेत का? ती माती, ते वातावरण, ती हवा यांचं काय जे अशांना पोसतं, त्यांना 'रक्तबीज' बनवतं. हिंसा व वासनेला जन्म देणारं हे भोवताल पाहून वाटतं, सांगावं तरूण मित्रांना -'बाबांनो, प्रेमात पडू नका.' पण रूमी अडवतात हे सांगत-''मैं इश्क से परहेज करूँ तो राबता किससे रखू।'' ('मी प्रेमापासून दूर राहू तर कुठं गुंतून घेऊ?') प्रेमाचा धडा जीवनातून गायब का झालाय? छाती कफानं भरलीय आणि इनहेलरने उपचार करतोय, का फसव्या हकीमाच्या जाळ्यात सापडलोय? आपण आपल्या प्रिय व्यक्तिच्या सहवासात असताना 'प्रेमात असताना माणूसकीचा विचार करत नसू, कल्याणाचा विचार करत नसू तर किंवा प्रेमाची पर्वाच नसेल तर आपलं जगणं आणि जिणं लांछनास्पद आहे. प्रत्येक युद्धाच्यामागे रूग्णमानसिकता असते. मला एकदा अफताबची हिंसक मानसिकता समजावून घ्यावी वाटते. जी श्रद्धाच्या शरीराचे तुकडे-तुकडे करते व आपल्या जगण्यावर प्रेम




करते. बचावाचे मार्ग शोधते. बहराइचच्या लाल महाराजांच्या म नोरचनेचा वेध घ्यायचाय-तांत्रिक लाल महाराज बहराइचच्या गावात आपला चांगला जम बसवून होते. गावातील लेकी-सुनांबरोबर आपली उद्दाम वासना तृप्त करत होते. तंत्र मंत्रांचा हवाला देत, धाक-दपटशा करत! गावातील एक तरूण मुलीवर त्यांचा डोळा होता. ती हाती लागत नव्हती. एकदा ती मुलगी आजारी असताना भूतबाधेचं भय व बरं करण्याचं अमिष दाखवून त्यांनी संपूर्ण कुटुंबावर कब्जा केला. एकदा सगळ्यांना दारू पाजून त्या मुलीवर बलात्कार केला. हळूहळू जेव्हा घरची माणसं व मुलगी शुद्धीवर येऊन आरडा-ओरडा व विरोध करू लागले तेव्हा त्या महाराजाने मुलीच्या अंगावर झडप घेऊन तिच्या योनितून ओरबाडत गर्भाशय ओढून काढत बाहेर फेकून दिलं. माझा या सगळ्यावर विश्वास बसला नसता जर माझ्या मैत्रिणीच्या डॉक्टर मुलीकडे ही केस आली नसती. अचानक याचा फोटो समोर आल्यावर मी थरारले-वाटलं-स्त्री असण्याची एवढी क्रूर शिक्षा! सैरभैर मनःस्थितीत वाटलं डोकं आपटून घ्यावं दगडावर!

हे कधी आणि कसं व्हायला लागलं की आपण अशा घटनांच्या बाबतीत भावनाशून्य बधीर होऊ लागलो? कधी हत्या करणाऱ्या

तरूण पिढीला (केवळ तरूणच काय?) गुन्हे करूनही अपराधभावना वाटेनाशी झाली? थोडं थोडं विष कधीचंच दिलं जाऊ लागलं होतं. कशी व कधी भारतीय समाजाला याची सवयच होऊन गेली, हे सगळं सहज अंगवळणी पडत गेलं. दुसऱ्याला दुःख देणं हे कधी मूल्य (?) बनलं. जर हत्याकांडांचं कारण 'प्रेम' असेल तर तो भारतीय समाज बुद्धाचा भारत असू शकत नाही. स्त्रियांच्या मृतदेहात सांप्रदायिक विमर्शांची बीजे पेरली जात आहेत, रोपली जात आहेत. जगभरातील हेल्पलाइन्स, कौनसेलर्स, मानसोपचारतज्ज्ञ असा विश्वास व दिलासा देण्यात अपयशी ठरत आहेत की, 'आम्ही आहोत तुमच्याबरोबर!'

साधन-संपत्तीमध्ये वाढ करत-करत भौतिकतेच्या अधिकाधिक आहारी जात असलेला भारतीय समाज दिवसेंदिवस मनोरूग्ण होत चाललाय. सुटून आलेल्या गुन्हेगारांचं, बलात्कारींचं ज्या जल्लोषात व जयजयकारात स्वागत केलं जात आहे. त्यावरून सिद्ध होतंय की आपण गुन्ह्यांचं व गुन्हेगारांचं समर्थन करत आहोत. आपण पूर्वनिर्धारित पूर्वग्रहांमुळे आपल्या मुलांमध्ये लिंग, वंश, जात, धर्म यावर आधारित घृणेची-विद्वेषाची बीजं पेरत आहोत. 'शरयूचं पाणीसुद्धा आपण सोडलं नाही.' दुसरीकडे श्रद्धेची हत्या व श्वेता यादवची आत्महत्या यांबाबत सोशल मीडियावर माहिती-बातम्यांचा पूर लोटलाय. श्वेतासाठी उपदेश की असं करायला नको होतं... असं-तसं आणि हे...हे...आणि श्रद्धाबाबत-पहा तुमची मुलगी कुठं चालली आहे? काय तुमची मुलगी अमक्या अमक्या (एखाद्या धर्माच्या) मुलावर प्रेम करते म्हणे! एवढी सूट देऊ नका. त्यांच्या घरी फ्रिज आहे का हे बघून घ्या. आणि मग हसरा इमोजी! आपण भारतीय माणसं एखाद्याच्या दुःखानं हळहळण्याची संवेदना हरवत चाललोय. रूमी म्हणतात-

**'ऐ दिल तू ऐसे किसी के पास बैठ**
**जिसे दिलों की खबर हो।'**

दिशा पिंकी शेख मनुष्य आहे. (समाजाच्या नजरेत लिंगभेदानुसार तृतीयपंथी) मला इथं तिच्या कवितेच्या काही ओळी उद्धृत केल्याशिवाय राहवत नाही.-

**'चल कपडे काढ, नको साहेब**
**टाकू आतमध्ये तुला? उद्यापासून एकपण**
**दिसणार नाही तुमच्यातलं स्टेशनला**
**असं नका करू हो साहेब...**
**एच. आय. व्ही. आहे मला असं म्हणून**
**रडायला लागली ती.**
**ठीक आहे, खाली बस मग**
**माझ्या तोंडालापण इन्फेक्शन हाये साहेब**
**उगा थोड्यासाठी तुमचा आणि तुमच्या**
**तिचा पण जीव का धोक्यात घालता?**
**असं म्हणत डोळे पुसले तिने...**

ठीक आहे, ठीक आहे, चल हातानं तरी करू दे' (दिशा पिंकी शेख, 'कुरूप')

माझे वडील, भाऊ, मित्र, सहकारी सगळेच्या सगळे 'क्षणभंगुर केवळ वीर्य' बनून गेलेत का? त्यांना काय जिंकायचं आहे? कशावर विजय मिळवायचा आहे? हे कुठलं व कसलं विश्व आहे? आपण तर ऐकून आहोत की 'प्रेम' मरणालाही जीवदान देते. बाबूषा कोहलींना वाटतं, 'या जगात गीत-संगीत, बहरत राहावं, निसर्ग सानिध्य, वाढावं, गोष्टी सांगणारे तरूण आजी-आजोबा वाढावे. पण वाढत गेलं काय तर दुःख, सेल्फलव, झोपेच्या गोळ्या, हत्या आणि आत्म हत्या' (भाप के घर में शीशे की लडकी) नाही वाढत गेलं प्रेम, नाही वाढत गेली माणूसकी. आपण सगळे आपल्या मनाचे 'मालक' झालोय. याचा अर्थ असा होतो की आपण सगळे आपल्या मनाचे गुलाम आहोत. भयावह तुटलेपणा व गडद अंधारलेल्या काळात आपली नैतिक जबाबदारी वाढली आहे, केल्याशिवाय सुटका नाही. विन्सेंट गॉग माणसाची तुलना दिव्याशी करतात. ते म्हणतात- 'प्रेमाविना माणूस विझलेल्या दिव्यासारखा असतो आणि प्रेमामुळे होतो तेवणाऱ्या दिव्यासारखा. दिवा तर तो होताच पण आता तो प्रकाशदाता होतो.'उलट सगळ्यांची मनं तर क्रूर निर्दय बनत चालली आहेत. चहुबाजूला आग आहे. धुमसती अशा वेळी आपणही बाबूषांसारखं पाण्याच्या बाजूला असायला हवं.

डिसेंबर झुकत्या मानेने समोर उभा आहे. मी विद्यार्थ्यांकडे पाहते, त्यांचं निष्कपट हास्य सांगतंय 'आमचं स्वागत करा.' मी म्हणते- गा काहीतरी आणि मन गुंतवून टाकणारे स्वर निनादू लागतात. मी पाहते त्यांचे डोळे-हे हिंसक क्रूर होऊ शकतील? नाहीऽऽऽ आणि झाले तर... मग आपण सगळे काय करत आहोत?सगळे आगीच्या बाजूने का आहेत? 'ऐ जिंदगी गले लगा ले' गीताचे भावबोध त्यांच्या मनात का रूजवू शकत नाही? मग मीच शिक्षक म्हणून कमी पडत असेन. महिनोनमहिने गलेलठ्ठ पगाराची रक्कम खात राहिलेय. मी नाही करू शकले या भावनेची रूजवण की प्रियकर भले दुरावला तरी 'प्रेमभावना' जपा. एका बुद्धानं दुसऱ्यातील सुप्तावस्थेतील बुद्धाला जागं करावं-बस एवढीच मनोमन अपेक्षा! माझ्यातील बुद्ध दुसऱ्यातील बुद्धाची वाट पाहतोय. माझी भावचेतना बुद्धाच्या करूणेनं ओथंबून येते. मी हार मानणार नाही. उमेद व आशेची हत्या नाही केली जाऊ शकत, तिचे तुकडे-तुकडे नाही केले जाऊ शकत, तिची योनी नाही फाडली जाऊ शकत- उमेदव शुभाकांक्षा नित्य व जिवंत 'शब्द' आहे. ही उमेद माझ्या असण्याचा, अस्तित्त्वाचा धर्म आहे. हेच माझ्या असतेपणाचे मर्म आहे, गमक आहे. ●●●

**मुळ लेख हिंदी डॉ. शशिकला राय.**
**लेखिका ज्येष्ठ विचारवंत असून सा. फु. वि. पु. येथे हिंदी विषयाच्या प्राध्यापक आहेत.**

**मराठी अनुवाद : - डॉ. जया परांजपे**

**संदर्भग्रंथः**



- बाबूषा कोहली, 'भाप के घर में शीशे की लडकी', रुख पब्लिकेशन, नई दिल्ली, २०२१
- निःशब्द नूपुर, 'रूमी की सौ गजलें', सं. बलराम शुक्ल, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, २०१८
- 'आज के प्रसिद्ध शायर', सं. कन्हैयालाल, राजपाल एन्ड सन्स, नई दिल्ली, २००१
- 'मुझ पर भरोसा रखना', विंसेंट गॉग के पत्र भाई थियो के नाम, रोशनाई प्रकाशन, पश्चिम बंगाल.

# ‘देशोधडी’च्या अंतरंगात शिरताना



लहू गायकवाड

नारायण भोसलेलिखित ‘देशोधडी’ हा आत्मचरित्रपर ग्रंथ मनोविकास प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. या ग्रंथाचे लेखक प्राध्यापक पदापर्यंत कसे पोहोचले. तसे हे आत्मचरित्र नारायण भोसले यांचे असले तरी नंदीबैल या जमातीत जन्माला आलेल्या आणि आयुष्यात उभे राहू पाहणाऱ्या समाजातील तरुणांना ते दीपस्तंभ ठरत आहे. पुस्तकाच्या पहिल्या पानावरील रेखाचित्र खूप काही सांगून जाणारे आहे. आपल्या जातीची, नातेवाइकांची आणि आई-वडिलांची भांडणे सोडविणारा नारायण आणि त्याचे भाऊ-बहीण कितीतरी समजदार वाटतात. हे केवळ नारायण भोसले यांचे आत्मचरित्र नाही, तर एकंदरीतच इतिहासाच्या नूतन प्रवाहांपैकी जन्मास आलेल्या मौखिक इतिहास प्रवाहांपैकी एक आहे.




‘भारत माझा देश आहे’ असे म्हणणाऱ्या या लेखकास गाव नाही. लेखकाच्या वडिलांनी ज्याठिकाणी मुक्काम टाकला तेथील पोलिस व लोकांनी विचारले गाव कोणते, तर आणि कोठे चालला, तर पूर्वे कडून आलो आणि पश्चिमेकडे चाललो. पश्चिमेकडून आलो आणि पूर्वे कडे चाललो, असे म्हणण्याची सवय लागली होती. तरीही त्यांच्या वडिलांमधला आध्यात्मिक गुण मला फार आवडला. नाथपंथीयांचे साहित्य, कबीरांचे दोहे आणि एकंदरीतच त्यांना मुखोद्गत असलेले सर्व आध्यात्मिक साहित्य ते पटपट बोलत. किती मोठी ही त्यांची बुद्धिमत्ता. कोणत्याही शाळेत न गेलेला हा लेखकाचा बाप अनेक भाषा अवगत करतो. कित्येक साधूंना वादविवादाच्या स्पर्धेत पराभूत करतो. परिस्थिती अंगावर येईल असे वाटले आणि स्वतःची चूक नसली तरी लेकरांसाठी प्रसंगी माघार घेणारा हा माणूस मला मनापासून भावला. या पुस्तकाच्या लेखकाला आठ भावंडे. आता बघा भारतात कोणकोणत्या ठिकाणी त्यांचा जन्म झाला. आंध्र प्रदेश, दिल्ली, उत्तर भारत, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यांमध्ये त्यांची आठ भावंडे जन्मास आली. मग खऱ्या अर्थाने ‘आम्ही सारे भारतीय आहोत’ याचा पाया नारायण यांच्या स्वतःच्या घरातच घातला गेला, असे वाटते. नाही म्हणायला सोलापूर जिल्ह्यातील बामणी नावाचे गाव त्यांना जवळचे वाटते.

संपूर्ण पुस्तकामध्ये लेखकाची आई आणि आजी आपला प्रभाव टाकतात. कोणत्याही शाळेत न गेलेली आजी मला हुशार वाटली. आतापर्यंत आपल्या जमातीत असलेली सर्व बंधने तोडून आपल्या नातवांनी शिक्षण घ्यावे यासाठी ती कष्ट करत राहिली, झिजत राहिली. लेखकाचे आई-वडील आणि इतर सर्व भारतभर भीक मागण्यासाठी फिरत असताना आजी मात्र नातवांना शाळेसाठी घेऊन सोलापूर जिल्ह्यातील बामणी येथे पालात राहत असे. ते पाल कसे उभारत, कसे गुंडाळत, हे नारायणच्या आईकडून शिकावे. आयुष्यात सुख-समृद्धी असूनही वडिलांनी ज्याच्याशी विवाह करून दिला अशा भीक मागणाऱ्या आणि भारतभर फिरणाऱ्या माणसाबरोबर स्वतःचा संसार करणारी नारायणची आई मला माझीच वाटते. वास्तविक नारायणच्या मामाची परिस्थिती खूप चांगली. आईने कधी भीक मागितली नव्हती. नवऱ्यासाठी, लेकरांसाठी मात्र तिला दारोदार फिरावे लागले. आईचा सुजलेला पाय, आई आणि वडिलांची होणारी भांडणे त्यातून लेकरांची होणारी हलाखीची परिस्थिती. एकदा तर आईच्या पायावर उपचार करण्यासाठी डॉक्टरकडे गेल्यावर माझ्याकडे पैसे नाहीत, असे नम्रपणाने लेखकाच्या वडिलांनी सांगितले. शिक्षणाच्या अभावाने या जमातीत आलेली अंधश्रद्धा भोसले यांनी पदोपदी अधोरेखित केली आहे. त्याचबरोबर ती घालविण्यासाठी आपण वैज्ञानिक दृष्टिकोन जपला पाहिजे, हे सांगायला ते विसरले नाहीत. शिक्षण घेत असताना हळूच सिनेमा पाहायला आणि फोटो काढायला जाणारा लेखक पुस्तकात रमणारा आहे. आपणही नवऱ्याबरोबर फोटो काढावा म्हणून नवऱ्याला आग्रह धरणारी नारायणची आई अखेर नवऱ्यासमवेत फोटो काढण्यात यशस्वी होते. शाळा सुटल्यावर दुपारी जेवायला काही नाही म्हणून रोगाने मेलेल्या कोंबड्यांची पार्टी करणारा नारायण आणि पतार नावाच्या एका धार्मिक विधीमध्ये चांगले जेवण मिळते म्हणून लेखक त्याची वाट पाहत असे. कारण त्यादिवशी किमान पोटभर जेवण मिळत असे. लेखकाची आई आणि लेखकाच्या वडिलांची बहीण यांच्यातील नणंद व भावजय हा सुप्त संघर्ष आजही समाजात दिसून येतो. लेखकांच्या वडिलांची यामधून होणारी घुसमट ही फार काही सांगून जाणारी आहे. लेखकाच्या आईने बारा रुपयांना नवी साडी विकत घेतली. आयुष्यात प्रथमच विकत घेतलेली नवीन साडी आई वापरणार होती. आनंद मिळणार होता. पोलिसांची धाड पडली

तर भीक मागणारे तुम्ही नवीन साडी कशी घेता, अशी वेगळीच भीती आता कुटुंबाला पडली.

लेखकाचे शिक्षण आणि पाटीपुराण तर फार वाचण्यासारखे आहे. नारायण भोसले यांची शाळा सुरू झाली. खरे तर शाळा शिकणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. भोसले यांची पाटी व पाटीपुराण शाळेत जाणाऱ्या आणि गेलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने वाचले पाहिजे. शाळेला फी, प्रवास खर्च, पाटी, दप्तर, पेन्सिल या गोष्टी तशा त्यांना दुर्मीळ होत्या. कारण खर्च करून घेणे परवडत नव्हते. ते घेण्यासाठी त्यांच्या परिवाराकडे पैसे नव्हते. आजीने खापराची पाटी घेऊन दिली. नारायण म्हणतात, मी पाटी जिवापाड जपायचो. कारण ती फुटायची माझ्या नशिबासारखी. कधी थुंकून पाटी पुसणारा नारायण आता पाटी पुसण्यासाठी पाणी नेऊ लागला. याचे श्रेय नारायणला नव्हे, तर त्याच्या आजीला. आपला नातू अभ्यास करतो की नाही, हे आजीला कळावे म्हणून ती नातवाला मोठ्याने वाचायला सांगत असे. स्वस्त धान्य दुकानाचे भोसले यांनी केलेले वर्णन म्हणजे भ्रष्टाचार किती खोलवर दडला आहे आणि पुरेपूर पसरला आहे, याची जाणीव करून देणारे आहे. वयाच्या पंधराव्या-सोळाव्या वर्षापर्यंत नारायणच्या घरात कधी गरम चपाती व भात शिजला, हे त्याला आठवत नाही. या एका वाक्यावरून आर्थिक परिस्थितीची कल्पना आपणास येऊ शकेल. रस्त्यावरच्या कडुलिंबाच्या निंबोळ्या विकून नारायणने पाटी घेतली. सर्वांसाठी कडू असणारा निंब नारायणसाठी मात्र गोड होता. गावदेवी आणि मारुती हा परिच्छेद वाचताना समाजाच्या घटकांमध्ये अंधश्रद्धा किती खोलवर रुजली आहे, याचा प्रत्यय येतो. मात्र, या यात्रेमधून खोबरे आणि साखर मिळत असे म्हणून नारायणला यात्राही आनंदाची वाटत असे. पोटाची खळगी भरताना सुकडीचा खाऊ हा काहीतरी वेगळेच वाटे. सुकडीमध्ये असणाऱ्या अळ्या नारायण अलगद बाजूला काढे आणि बाकी सुकडी खाऊन घेत असे. यातही त्यास समाधान वाटे, की आपल्याबरोबर एक जीव जगतो आहे. सुकडीच्या पोत्यात उंदीर आणि घुशीच्या लेंड्या सापडत. गरिबी काय असते आणि त्यातून अपमान कसा केला जातो हे सांगणारे हे उत्तम उदाहरण. भूक आणि तहान या गोष्टीवर अजून दिलेले उत्तर फार गंभीर आहे. टोपल्यात भाकरी आहे. मात्र, ती ताजी नाही. कारण भाकरी ही मागून आणलेली असे. सख्ख्या भावंडांमध्ये ती भांडण लावत असे. भुईमुगाच्या शेंगा शेतात काढण्यासाठी जाणे म्हणजे शेंगा उपटणे कमी आणि खाणे जास्त, हा नारायणचा उद्योग. भुईमुगाच्या शेंगा म्हणजे गरिबाचे बदाम, असे आजी म्हणत असे.

नारायणला दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेला जाण्यासाठी दुसऱ्या गावी तीन दिवस जावे लागणार होते. आता सोबत किमान दोन कपडे हवेत. नारायणकडे दुसरी चड्डीही नव्हती. आजच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी नारायणची शाळा हा परिच्छेद फार बारकाईने वाचला पाहिजे, असा माझा आग्रह आहे. अशा विपरीत परिस्थितीमध्येही नारायणची शाळा सुटली नाही. नारायणची आई कमालीची स्वच्छता पाळणारी. कपडे फाटके का असेना; पण शिवून व स्वच्छ असत. इयत्ता पाचवीच्या वर्गात प्रवेश घेतल्यावर नारायण दररोज सात किलोमीटर पायी जा-ये करत असे. अखेर नारायणला बोर्डिंग मिळाले. किमान दोन वेळच्या पोटभर जेवणाची सोय झाली.

नारायणचे कुटुंब म्हणजे आई-वडील भिक्षा मागण्यासाठी दिल्लीकडे निघाले. वास्तविक कोठे जायचे हे काही पूर्वी ठरलेले नसायचे. ज्या बाजूला अन्न मिळेल म्हणजे पोटाची सोय होईल, त्याचा अंदाज बांधून तिकडे जावे लागत असे. भारताची राजधानी दिल्ली येथे जाण्याचे एक कारण होते ते म्हणजे दिल्लीत भंगार गोळा करण्याची संधी होती. कचरा आणि भंगार गोळा करून पोटाची भूक भागविण्याचा भोसले परिवाराचा इरादा आता पूर्ण होईल, असे वाटू लागले. दिल्लीत राहण्याचे ठिकाण म्हणजे मोठी गटार जिथे वाहते त्या सांडपाण्याजवळ आपले पाल उभारणे. सांडपाण्याचा येणारा वास नेहमीचा असल्याने तो फार त्रास देत नसे. ते जे काही भंगार गोळा करत होते, तसेच त्यांचे विचार भंगार होऊ लागले, असे नारायण म्हणतो. कारण त्यातील बरेच जण व्यसनांच्या आहारी गेले. ती माणसे वाईट जीवनाचा भाग बनू लागली.

नारायणचे वडील आसाम बंगाल आणि ओरिसा राज्यांत पोट भरण्यासाठी निघून गेले. एकीकडे नारायण शाळा शिकत होता आणि नारायणचा भाऊ आप्पा मात्र सातवीतून शाळा सोडून वेगळेच काहीतरी करू लागला. प्रचंड ताकतीचा असलेला आप्पा कुस्तीत करिअर करू शकत होता. जिथे खायलाच काही नाही तिथे दिशा कोण देणार, अशी या जमातीची दशा वाईट होती.

नारायणची आई अंगावर दागिने घालत नसे म्हणून इतर बायका काहीशा तिलाही कमी लेखत. त्यावर आई म्हणे. दाग अन् दागिना हा नुसता जिवाला घोर. पोटीचं लाल माझ्या माझं हे सरकार. काय दाविती दागिने काना-नाकातले. माझी बाळं अक्षरे फोडीती कागदातलं. नारायण आईचं हे गाणं तू खरं करून दाखवलं. शाळेत न गेलेली नारायणची आई म्हणत असे; होईल साहेब शाळेत जाता मूल माझं. किती हा विश्वास.

वसतिगृहातील दिवस नारायणला स्वर्गासारखे वाटू लागले. पोटभर खाण्यास मिळे. हे त्याचे मुख्य कारण; पण प्रत्येकाच्या ताटात किड्यांशिवाय भाजी आणि भाकरी येतच नसे. तो म्हणतो आज भाजी कशाची वांगे आणि अळ्याची. आजारी पडले तर मात्र डॉक्टर सर्वांना एकाच प्रकारच्या गोळ्या देत असे. मग आजार कोणता हे डॉक्टरला कळे की न कळे याविषयी डॉक्टरच जाणे. आपणास वसतिगृहातून घरी जाण्यासाठी किती आनंद वाटतो. नारायणला मात्र दुःख होई. कारण वसतिगृहात पूर्ण जेवण मिळे. असे पूर्ण जेवण घरी मिळेल की नाही, याची शाश्वती नाही, म्हणून वाईट वाटे; पण सुखावह बाब म्हणजे मायाळू, दयाळू नारायणची आजी म्हणत असे, दत्तू नारायण बाळ नेत्र माझं श्रीहरी. दत्तू नारायण बाळ माझी वाचती पुस्तक. गुरुजी आणि मास्तराचं होई चकित मस्तक. आजीचे हे गाणे नारायणला प्रसंगी पोटाची भूक विसरायला भाग पाडत असे.

या संपूर्ण ग्रंथामध्ये मला जशी नारायणची आजी खूप पुरोगामी वाटली, तसेच नारायणचे वडील कधीही कोणत्याच शाळेत गेले नाहीत तरी कबीर परंपरेचे ते पाईक आहेत, असे मला वाटते. कधीही शाळेत न गेलेला हा माणूस कबीरांचे हजारो दोहे मुखोद्गत करतो आणि उत्तर भारतात अनेक साधूंना स्वतःच्या हुशारीने आणि मौखिक परंपरेने पराभूत करतो. हा बाप सर्वांत महत्त्वपूर्ण आहे. आपणा सर्वांना नम्रतेची विनंती, नारायणचे 'देशोधडी' हे पुस्तक किमान एकदा पाहा, वाचा आणि संग्रहित ठेवा. अर्थात प्रेमाचा आग्रह बस एवढेच. ●●●

**लेखक इतिहास विभागात प्राध्यापक आहेत.**

# भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन : एका समग्र परिवर्तनाचा प्रारंभ

पुन:पुन्हा ही गोष्ट सांगायला नको की, बुद्धाचा मार्ग, त्याचा धम्म हा नवा माणूस, नवा समाज घडवणारा आहे. मानवी मनावर शेकडो वर्षे स्वार्थी आणि अंध धर्मांनी आणि तशाच कर्मकांडांनी बनवलेली जळमटे घासून-पुसून काढणारा आहे. शरीराचा आणि मनाचा भाग बनलेली जळमटे खरडून काढल्याशिवाय निखळ माणूस दिसणार नाही आणि त्याच्यावर ज्ञानाचा प्रकाश पडणार नाही आणि पडलाच तर तो केवळ पृष्ठभागावर खेळेल. बुद्धाच्या दृष्टीने केवळ जगणे महत्त्वाचे नव्हते. तसे तर सर्व प्राणिमात्र जगतच असतात. जन्माला येतात, जगतात, मरतात. एका चक्रात त्यांचा प्रवास सुरू होतो आणि संपतोही. बुद्धाला अर्थपूर्ण आणि सुंदर कारण असलेले जगणे हवे होते. म्हणजे आपण का जगतो, याचे कारण शोधण्याची प्रेरणा त्याला मानवी समूहाला द्यायची होती. जगणे सुंदर, पीडामुक्त, अर्थपूर्ण करायचे असेल तर त्यासाठी एक सुंदर कारणही बनवावे लागते. शोधावे लागते. जगण्याचा मार्ग कसा असावा, यावर पहिल्या प्रवचनात बुद्धाने सुंदर मार्ग सांगितला आहे. त्याला 'विशुद्ध मार्ग' म्हणतात. कसलाही डाग नसलेला, कलंक नसलेला, व्रण नसलेला, कसल्याही तृष्णेत न अडकलेला, स्वत:साठी स्वेच्छेने काही बंधने घालून घेणारा, या तत्त्वांचे पालन करणारा हा मार्ग म्हणजे विशुद्ध मार्ग होय. ज्यांना चांगला माणूस व्हायचे आहे त्यांनी विशुद्ध मार्गावर चालायचे आहे. जेथे त्याला पुढील पाच तत्त्वे हमखास भेटतात. या तत्त्वांना आलिंगन देऊन, त्यांच्या हातात हात घालून विशुद्ध मार्गावर चालायचे आहे- जो की भगवान बुद्धाने दाखवला आहे. या मार्गावर पाच प्रमुख तत्त्वे उगवलेली, फुललेली आणि सुगंधित झालेली आहेत. ती अशी : १) कोणत्याही प्राणिमात्राची हिंसा न करणे, २) चोरी न करणे, ३) व्यभिचार न करणे, ४) खोटे न बोलणे आणि ५) मादक द्रव्ये, मादक पेये यांचे सेवन न करणे. यातील प्राणिमात्राची हत्या न करणे हे अतिशय महत्त्वाचे तत्त्व आहे. ते तोडले की, आपण इतरांचा जगण्याचा हक्क हिरावून घेतो. त्यांना ठार करून, हत्या करून, इजा पोहोचवून तो हिरावून घेतो. निसर्गात 'जगा आणि जगू द्या' हे तत्त्व आहे. धम्मातही ते ठळक आले आहे. बुद्धपूर्व काल आणि महावीरपूर्व काल हा यज्ञात द्यावयाच्या बळींनी भरून गेला होता. रोज यज्ञात हजारो पशू-पक्ष्यांना आणि प्रसंगी माणसांना बळी द्यायचे. जगण्याचा हक्क काढून घेण्याच्या या क्रूर वृत्तीला देवाधर्माचे अधिष्ठान देण्यात आले होते. हत्या करून पुण्य कसे मिळवणार, हत्या करून देवाची कृपा कशी संपादन करणार आणि दुसऱ्या जिवांची हत्या करण्याचा हक्क आपल्याला दिला कुणी,



उत्तम कांबळे यांचे दुबईतील भाषण - भाग २

याचा विचार धर्माचे ठेकेदार करत नव्हते. माणसासाठीच्या जगण्यात अडसर ठरणारी ही गोष्ट बुद्धाने काढून टाकली आणि हे जग हिंसेऐवजी अहिंसेवर, खूनखराब्याऐवजी प्रेमावर नेऊन ठेवण्याचा प्रयत्न केला. सत्य बोलणे, चोरी न करणे यांसारख्या तत्त्वातून माणसाचे शील संवर्धित होत असते आणि शीलामुळे माणूस शक्तिमान होत असतो. शस्त्रे धारण करून शीलवान होता येत नाही, तर शील धारण करून होता येते. युद्धातून युद्धे जन्माला येतात, हिंसेतून हिंसा जन्माला येते आणि ती टाळण्यासाठी सारे जगच प्रेम नावाच्या एका महान तत्त्वात बसवण्याचा प्रयत्न बुद्धाने केला आहे.

शील मार्गाचे अतिशय खोलवर विवेचन करून बुद्ध अष्टांगिक मार्गांकडे वळतो. या आठ मार्गांची आयुष्यात उपयुक्तता का व कशी आहे, हेही बुद्ध सविस्तर सांगतो. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्म, सम्यक जीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती, सम्यक समाधी हे ते आठ मार्ग आहेत. जे करायचे ते सम्यक दृष्टी बाळगून. टोक कधीच गाठायचे नाही. तराजूला दोन पारडी असतात आणि दांड्याला काटा असतो. न्याय व्हायचा असेल तर कोणतेही पारडे खालवर होऊन चालत नाही. काटा मध्यभागी जातो आणि पारडी सरळ रेषेत येतात. कोणतीही गोष्ट अति करू नये किंवा सोडूनच देऊ नये. चांगले जगायचे, बोलायचे, शरीर चांगले ठेवायचे, स्मृती ठेवायच्या तर या आठ मार्गांचा अवलंब केला पाहिजे. या मध्यममार्गात माणसाचे मन-मेंदू-मनगट या तिन्हींचा विचार आहे. समाधीच्या निमित्ताने ध्यानाचा विचार आहे.

माणूस शीलवान बनला तरच त्याचा समाज शीलवान होतो. अनेक प्रश्न सुटतात आणि प्रेमाचे, आनंदाचे झरे वाहू लागतात. एकूण जगच आनंदी आणि सुखी होते. १) शील, २) दान, ३) उपेक्षा, ४) निष्क्राम्य, ५) वीर्य, ६) शांती, ७) सत्य, ८) अधिष्ठान,

९) करुणा आणि मैत्री आदी दहा गुणांचे पालन करून शील मार्गावर चालता येते एवढेच बुद्धाने सांगितलेले नाही, तर या दहाही गोष्टींचे विश्लेषण केले आहे. अतिशय सुंदर आणि सर्वसामान्यांना कळेल असे हे विश्लेषण आहे.

बुद्धाचा धम्म फक्त दुःखाचा विचार करतो, जग दुःखाने भरले आहे असे सांगतो, तो फक्त दुःख आणि दुःखाचेच दिग्दर्शन करतो याचा अर्थ तो निराशावादी आहे का, अशी शंका तेव्हाही घेतली जात होती आणि आजही काही जण घेतात. बुद्धाला याची कल्पना तेव्हाच आली असावी म्हणून की काय, या शंकेचे निरसनही त्याने पहिल्या प्रवचनात शेवटच्या भागात केले आहे. माझा धम्म निराशावादी आहे असे तुम्ही (पहिले पाच परिव्राजक) म्हणण्याचा संभव आहे; पण तो तुमचा चुकीचा दृष्टिकोन असेल. मी दुःखाचे अस्तित्व मान्य करतो मन ते दूर करण्याचे मार्गही सांगतो. माझ्या धम्मात जगण्याचा उद्देश आणि आशाही आहे. माझा धम्म अविद्या नष्ट करतो. कारण अविद्या हेच दुःखाच्या अस्तित्वाविषयीचे अज्ञान असते. माणसाच्या जीवनातील दुःखाचा शेवट करण्याचा मार्ग माझा धम्म दाखवतो... हे सांगतच त्याने परिव्राजकांना प्रश्न केला, 'हे म्हणणे तुम्हाला मान्य आहे की नाही?' परिव्राजक म्हणाले, 'होय, आम्हाला मान्य आहे.'

खरे म्हणजे धम्म संस्थापकांचा आणि परिव्राजकांचा म्हणजे शिष्यांचा असा आरोग्यवर्धक संवाद यापूर्वी कधी झाला नसावा. यापूर्वीचे महागुरू, धर्म, चमत्कारी बाबाबुवांनी एकतर्फीच स्वतःला सर्वांवर लादले होते. बुद्धाचे वैशिष्ट्य येथेच आहे की, तो स्वतः ला लादत नाही. समोरच्याशी अखंड संवाद करतो, त्याला पटेपर्यंत बोलत राहतो. त्याच्या प्रश्नांची उत्तरे देत राहतो. विशेष म्हणजे, याच प्रक्रियेतून ज्ञान जन्माला येते आणि ते झळाळते. पहिल्या प्रवचनाचे अतिशय संक्षिप्त स्वरूपात विश्लेषण येथे केले आहे. डॉ. बाबासाहेबांच्या 'बुद्ध व त्यांचा धम्म' या ग्रंथातील मूळ प्रवचन येथे वाचकांसाठी देत आहे.

**बुद्धाचे पहिले प्रवचन**

१. परस्परांना अभिवादन करून कुशलक्षेम विचारल्यावर त्या पाच परिव्राजकांनी भगवान बुद्धाला विचारले, 'तपश्चर्येवर तुमचा अजूनही विश्वास आहे काय?' बुद्धाने नकारात्मक उत्तर दिले. २. बुद्ध म्हणाला, 'जीवनाची आत्यंतिक अशी दोन टोके आहेत. एक सुखोपभोगाचे व दुसरे आत्मक्लेशाचे.' ३. 'एक म्हणतो, खा, प्या, मजा करा. कारण उद्या आपण मरणारच आहोत. दुसरा म्हणतो, सर्व वासना मारून टाका. कारण त्या पुनर्जन्माचे मूळ आहेत.' हे दोन्ही मार्ग माणसाला न शोभण्यासारखे म्हणून त्याने ते नाकारले. ४. भगवान बुद्ध मध्यममार्ग मानणारे होते– मज्जिम पतिपद– मधला मार्ग, जो उपभोगाचाही मार्ग नाही आणि आत्मक्लेशाचाही नाही. ५. बुद्ध परिव्राजकांना म्हणाला, 'माझ्या या प्रश्नाचे उत्तर द्या. जोपर्यंत तुमचे स्वत्व कार्यप्रवृत्त असते आणि त्याला ऐहिक व पारलौकिक भोगाची अभिलाषा असते, तोपर्यंत सर्व आत्मक्लेश व्यर्थच नाहीत काय?' ते (परिव्राजक) उत्तरले, 'आपण म्हणता ते बरोबर आहे.' ६. 'जर तुम्ही आत्मक्लेशाच्या मार्गाने आपला कामाग्नी शांत करू शकत नाही, तर आत्मक्लेशाचे दरिद्री जीवन जगून आपण स्वतःला कसे काय जिंकू शकाल?' त्यांनी उत्तर दिले, 'आपण म्हणता ते बरोबर आहे.' ७. 'जेव्हा तुम्ही स्वतःवर विजय मिळवू शकाल, तेव्हाच फक्त तुम्ही कामतृष्णेपासून मुक्त होऊ शकाल. मग तुम्हाला ऐहिक सुखोपभोगाची इच्छा होणार नाही आणि नैसर्गिक गरजांच्या तृप्तीमुळे तुमच्यात मलिन विकार निर्माण होणार नाहीत. तुमच्या शारीरिक गरजेनुसार तुम्ही खा, प्या.' ८. 'सर्व प्रकारची विषयासक्ती शक्तिपात करणारी असते. विषयासक्त मनुष्य कामवासनांचा गुलाम बनतो. सर्व प्रकारची सुखासक्ती अधःपतन करणारी व नीच कर्म असते. तथापि, माझे तुम्हाला सांगणे असे की, जीवनाच्या स्वाभाविक गरजांची पूर्ती करणे ही वाईट गोष्ट नाही. शरीराचे आरोग्य राखणे हे आपले कर्तव्य आहे. नाहीतर तुम्ही तुमचे मन सुदृढ आणि स्वच्छ ठेवू शकणार नाही आणि प्रज्ञारूपी प्रदीपही प्रज्वलित राखू शकणार नाही.' ९. 'हे परिव्राजक, ही गोष्ट समजून घ्यावी की, ही दोन आत्यंतिक टोके अशी आहेत की, माणसाने त्यांचा कधीही अवलंब करू नये. एक टोक म्हणजे ज्या गोष्टीचे आकर्षण कामवासनेच्या तृष्णेमुळे होते, त्या गोष्टीत आणि विशेषतः विषयासक्तीत सतत डुंबत राहणे. तृप्ती मिळविण्याचा हा मार्ग अगदी हलक्या दर्जाचा, रानटीपणाचा, अयोग्य आणि हानिकारक आहे. दुसरे टोक म्हणजे तपश्चर्या किंवा आत्मक्लेश. हा मार्गही दुःखदायक, अयोग्य आणि हानिकारक आहे.' १०. 'ही दोन्ही आत्यंतिक टोके ज्यामुळे टाळता येतात असा एक मध्यम मार्ग आहे. ध्यानात ठेवा, मी त्याच मध्यममार्गाची शिकवण देतो आहे.' ११. त्या पाच परिव्राजकांनी त्याचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकले. भगवान बुद्धाच्या मध्यम मार्गासंबंधी उत्तरादाखल काय बोलावे हे न समजल्यामुळे त्यांनी त्याला विचारले की, 'आपणाला आम्ही सोडून आल्यावर आपण काय काय केले?' तेव्हा आपण गयेला कसे गेलो, पिंपळाच्या झाडाखाली आपण चिंतन करीत कसे बसलो आणि चार आठवडे सतत चिंतन केल्यानंतर आपणास ज्ञानप्राप्ती झाल्यामुळे आपण नवा जीवनमार्ग कसा शोधून काढला, हे सर्व भगवान बुद्धांनी त्यांना सांगितले. १२. हे ऐकल्यावर तो मार्ग कोणता, हे जाणून घेण्यास ते परिव्राजक अधीर झाले आणि तो मार्ग स्पष्ट करून सांगण्याविषयी त्यांनी भगवान बुद्धाला प्रार्थना केली. १३. भगवान बुद्धाने त्यांची विनंती मान्य केली. १४. सुरुवातीलाच भगवान बुद्धाने त्यांना सांगितले की, आपला जो मार्ग जो धम्म आहे, त्याला ईश्वर आणि आत्मा यांच्याशी काहीही कर्तव्य नाही. त्याचा मरणोत्तर जीवनाशी कसलाही संबंध नाही तसेच त्या धम्माचा कर्मकांडाशी काही संबंध नाही. १५. माणूस आणि माणसाचे माणसाशी या जगातील नाते हा बुद्धाच्या धम्माचा केंद्रबिंदू आहे. १६. बुद्धाने सांगितले की, आपल्या धम्माचे हे पहिले अधिष्ठान आहे. १७. मनुष्यप्राणी दुःखात, दैन्यात आणि दारिद्र्यात राहत आहे, हे त्याचे दुसरे तत्त्व होय. हे सर्व जग दुःखाने भरलेले आहे आणि जगातून हे दुःख नाहीसे करणे हा एकच धम्माचा उद्देश आहे. यापेक्षा धम्म म्हणजे दुसरे-तिसरे काहीही नाही. १८. दुःखाचे अस्तित्व मान्य करणे आणि ते नष्ट करण्याचा मार्ग दाखवणे हाच भगवान बुद्धाच्या धम्माचा पाया होय. १९. हाच एक केवळ धम्माचा पाया होऊ शकतो आणि यावरच त्याचे समर्थन अवलंबून आहे. जो धर्म या प्राथमिक गोष्टीचा स्वीकार करीत नाही, तो धर्मच नव्हे. २०. 'खरोखर, हे परिव्राजक हो! जगातील दुःख आणि त्या दुःखापासून मुक्तता करण्याचा उपाय हाच धम्माचा मुख्य प्रश्न आहे.

हे ज्या श्रमणांना आणि ब्राह्मणांना (धर्मोपदेशकांना) समजत नाही, ते माझ्या मते श्रमण आणि ब्राह्मण नव्हेतच. याच जीवनात धम्माचा खराखुरा अर्थ काय आहे, हे स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्यांना समजतच नाही.' २१. नंतर परिव्राजकांनी बुद्धाला विचारले, 'दुःखाचे अस्तित्व मान्य करणे आणि दुःख नाहीसे करणे हाच जर आपल्या धम्माचा पाया असेल तर आपला धम्म दुःख कसे नाहीसे करतो सांगा. २२. भगवान बुद्धाने सांगितले की, या धम्मानुसार जर प्रत्येकाने (१) पावित्र्याचा मार्ग अनुसरला, (२) सदाचरणाचा मार्ग स्वीकारला आणि (३) शीलमार्गाचा अवलंब केला, तर त्यामुळे या दुःखाचा निरोध होईल. २३. आणि त्यांनी सांगितले की, अशा धम्माचा आविष्कार आपण केला आहे.

**भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन (पूर्ण)**

१. बुद्धाने आपला धम्म आणि त्यातील विषय समजावून सांगितल्यानंतर परिव्राजकांना विचारले : २. 'व्यक्तिगत शुद्धी हा जगातील चांगल्या गोष्टींचा पाया नाही काय?' त्यांनी उत्तर दिले, 'आपण म्हणता ते बरोबर आहे!' ३. नंतर बुद्धाने विचारले, 'लोभ, क्रोध, अज्ञान, प्राणहत्या, चौर्य, व्यभिचार आणि खोटे बोलणे यामुळे व्यक्तिगत शुद्धीचा पाया ढासळत नाही काय? या वाईट गोष्टींवर ताबा ठेवता यावा म्हणून व्यक्तिगत शुद्धीकरिता चारित्र्याचे सामर्थ्य वाढविणे आवश्यक नाही काय? माणसांमध्ये जर व्यक्तिगत शुद्धी नसेल तर तो चांगल्या गोष्टी करण्यास साधनभूत कसा होऊ शकेल?' आणि परिव्राजकांनी उत्तर दिले, 'आपण म्हणता तसेच आहे.' ४. 'आणखी असे की, दुसऱ्यांना गुलाम करण्यात किंवा त्यांच्यावर सत्ता गाजविण्यात लोकांना हरकत का वाटत नाही? दुसऱ्याचे जीवन दुःखी करण्यात त्यांना काही का वाटत नाही? माणसे एकमेकांशी सदाचाराने वागत नाहीत, हेच त्याचे कारण नव्हे काय?' आणि परिव्राजक उत्तरले, 'बरोबर आहे.' ५. 'जर प्रत्येकाने अष्टांगमार्गांचा– सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् आजीविका, सम्यक् कर्मान्त, सम्यक् प्रयत्न, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी यांचा– थोडक्यात सदाचार मार्गांचा अवलंब केला तर एक माणूस दुसऱ्या माणसावर करीत असलेला अन्याय आणि अमानुषपणा दूर होणार नाही काय?' त्यावर ते म्हणाले, 'होय.' ६. शील किंवा सद्गुणांच्या मार्गांचा उल्लेख करून बुद्धाने विचारले, 'गरजू आणि गरीब लोकांचे दुःख नाहीसे करण्यासाठी आणि सर्व लोकांचे कल्याण करण्यासाठी दान आवश्यक नाही काय? जेथे दारिद्र्य आणि दुःख आहे तेथे तेथे लक्ष पुरवून ते दूर करण्यासाठी करुणा आवश्यक नाही काय? निःस्वार्थपणे करावयाच्या कार्यासाठी निष्काम भावाची आवश्यकता नाही काय? वैयक्तिक लाभ होत नसला तरीही सतत प्रयत्नशील राहण्यासाठी उपेक्षा आवश्यक नाही काय?' ७. 'माणसावर प्रेम करणे आवश्यक नाही काय?' आणि ते म्हणाले, 'होय.' ८. 'याच्याही पुढे जाऊन मी म्हणतो, केवळ प्रेम करणे पुरेसे नाही. खरी आवश्यकता आहे ती मैत्रीची. ती प्रेमापेक्षा जास्त व्यापक आहे. केवळ मानवाविषयीच नव्हे, तर सर्व प्राणिमात्रांविषयी बंधुभाव वाटणे हा मैत्रीचा अर्थ आहे. ती मानवापुरती मर्यादित नाही. अशा प्रकारची मैत्री आवश्यक नाही काय? आपले मन निःपक्षपाती, मोकळे, प्रत्येकावर प्रेम करणारे आणि कुणाचाही द्वेष न करणारे असे असावे म्हणून आपणा स्वतःला जो आनंद हवा असतो, तोच आनंद सर्व प्राणिमात्रांना मैत्रीखेरीज यापेक्षा दुसऱ्या कशाने मिळू शकेल?' ९. ते सर्व म्हणाले, 'होय.' १०. 'परंतु या सर्व सद्गुणांच्या आचरणास प्रज्ञेची–बुद्धीची जोड दिली पाहिजे.' ११. बुद्धाने विचारले, 'प्रज्ञा आवश्यक नाही काय?' परिव्राजकांनी काहीच उत्तर दिले नाही. आपल्या प्रश्नाचे उत्तर देणे त्यांना भाग पाडण्यासाठी भगवान बुद्ध पुढे म्हणाले, 'दुष्कर्म न करणे, वाईटाचा विचार न करणे, उपजीविकेसाठी कुमार्गाचा अवलंब न करणे आणि जे वाईट आहे किंवा दुसऱ्याला दुःख देणारे आहे असे काहीही न बोलणे हे चांगल्या माणसाच्या अंगचे गुण होत.' परिव्राजक म्हणाले, 'होय, ते बरोबर आहे.' १२. 'परंतु आंधळेपणाने सत्कृत्य करणे हे उचित आहे काय?' भगवान बुद्धाने विचारले, 'मी म्हणतो 'नाही' हे पुरेसे नाही.' भगवान बुद्ध परिव्राजकांस पुढे म्हणाले, 'हेच जर पुरेसे होते, तर तान्हे मूल नेहमीच चांगली कृत्ये करते असे म्हणावे लागेल. कारण तान्ह्या मुलाला शरीर म्हणजे काय हे कळत नसते. पाय झाडण्याखेरीज ते आपल्या शरीराने दुसरे कोणतेही वाईट कृत्य करू शकणार नाही. बोलणे म्हणजे काय, हे त्याला कळत नाही. त्या अर्थी रडण्यापलीकडे अधिक वाईट असे ते काही बोलूच शकणार नाही. आनंदाने किंकाळ्या मारण्यापलीकडे विचार म्हणजे काय, हे त्याला कळत नाही. उपजीविका म्हणजे काय, हे त्याला कळत नाही; त्या अर्थी आईचे स्तन चोखण्यापलीकडे जगण्याचा दुसरा कोणताही वाईट मार्ग ते अवलंबू शकणार नाही.' १३. सद्गुणमार्ग प्रज्ञेच्या कसोटीला उतरला पाहिजे. म्हणून समज आणि बुद्धी हेच प्रज्ञेचे दुसरे नाव आहे.' १४. 'प्रज्ञा पारमिता ही इतकी महत्त्वाची व आवश्यक का आहे, याचे दुसरेही एक कारण आहे. दान आवश्यक आहे; परंतु प्रज्ञेशिवाय दानाचा दुष्परिणाम होऊ शकतो. करुणेची आवश्यकता आहे; परंतु प्रज्ञेशिवाय करुणेचा परिणाम वाईट गोष्टींना आधार देण्यात होण्याचा संभव आहे. पारमितेची प्रत्येक कृती ही प्रज्ञा पारमिताच्या कसोटीला उतरली पाहिजे. शहाणपण हे प्रज्ञा पारमिताचे दुसरे नाव आहे.' १५. 'माझे म्हणणे असे की, अकुशल कर्म कोणते आणि ते कसे घडून येते, याचे ज्ञान आणि जाणीव असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कुशल कर्म कोणते, याचे ज्ञान व जाणीव असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अकुशल कर्म कोणते आणि कुशल कर्म कोणते, याचेदेखील ज्ञान आणि जाणीव असली पाहिजे. अशा ज्ञानाशिवाय कृती चांगली असूनही खरा चांगुलपणा असू शकणार नाही. म्हणूनच मी म्हणतो की, प्रज्ञा हा एक आवश्यक असा सद्गुण आहे.' १६. नंतर परिव्राजकांना पुढीलप्रमाणे आदेश देऊन भगवान बुद्धाने आपले प्रवचन संपविले : १७. 'माझा धम्म निराशावादी आहे, असे तुम्ही म्हणण्याचा संभव आहे. कारण तो दुःखाच्या अस्तित्वाकडे मानवजातीचे लक्ष वेधतो. मी असे सांगतो की, माझ्या धम्माविषयीचा हा दृष्टिकोन चुकीचा ठरेल.' १८. 'माझा धम्म दुःखाचे अस्तित्व मान्य करतो यात शंका नाही; परंतु दुःखाचे निरसन करण्यावरही तो तितकाच जोर देतो, हे विसरू नका.' १९. 'माझ्या धम्मामध्ये मानवी जीवनाचा उद्देश आणि आशा या दोहोंचाही अंतर्भाव आहे.' २०. 'माझ्या धम्माचा हेतू अविद्या नष्ट करणे हा आहे. अविद्या म्हणजे दुःखाच्या अस्तित्वाविषयीचे अज्ञान होय.' २१. 'त्यात आशा आहे. कारण मानवी दुःखाचा अंत करण्याचा मार्ग तो दाखवितो.'

**समाप्त...**




# रोहित पवार यांची परंपरा कंची, यत्ता कंची...

आजोबा अप्पासाहेब आणि चूलत आजोबा शरद पवार यांच्या उदंड पुण्याईच्या जोरावर वयाच्या अवघ्या पस्तीसाव्या वर्षी महाराष्ट्राच्या विधानसभेत प्रवेशकर्ते झालेल्या आणि भगव्या रंगाशी, आरत्या-अभंगांशी जवळीक करत राजकारणात पायरोव करू पाहणाऱ्या उमद्या, तरण्या रोहितसाठी बच्चनच्या सिनेमातील एक डायलॉग प्रथम सांगतो, जे अकारण धावतात त्यांनाच ठेच लागण्याची शक्यता असते आणि सारे जग जणू काही आपली प्रतिक्रिया ऐकण्यास आतूर आहे, असे समजून जे सातत्याने क्रियाऐवजी प्रतिक्रियावादी (म्हणजे जे स्वतःचे काहीच निर्माण करू शकत नाहीत ते प्रतिक्रियावादी आणि जे काही निर्माण करतात ते सृजनशील, उत्पादनाची काही नवे घडवण्याची क्षमता असणारे) बनतात त्यांचेच शब्द चुकण्याची किंवा जिभ दातात अडकण्याची शक्यता असते.

कोणत्याही विषयावर प्रतिक्रिया देण्याऐवजी सर्वप्रथम रोहितने आपल्याला लाभलेली परंपरा काय आणि आपली यत्ता काय, याची माहिती घ्यावी. कुणाला सांगायला वेळ नसेल, तर आपल्या हातातील महागड्या मोबाईलमध्ये असलेल्या गुगल साहेबांना विचारावी. कुणी काय म्हटले हे मी ऐकलेले नाही, असे निरागसपणे सांगत बोलणाऱ्यावर टीका करू नये. प्रतिक्रिया व्यक्त करूनच कोणी नेता घडत नसतो, हे आपल्या पणजोबा, आजोबांच्या परंपरेतून शिकून घ्यावे. तर ज्येष्ठ फुलेवादी नेते (जे रोहितपेक्षा वयाने आणि अनुभवाने पन्नास-साठ वर्षांनी मोठे आहेत) छगन भुजबळ यांनी पुण्यात म. फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त क्रांतिज्योती सावित्रीबाई आणि देवी सरस्वती यांच्यातील फरक सांगितला. ज्ञानदेवता म्हणून पूजा करायचीच असेल, तर म. फुले, सावित्रीबाई, कर्मवीर भाऊराव, कर्वे यांची पूजा करावी. या सर्वांनी बहुजनांना ज्ञानाचे डोळे दिले. 'विद्येविना मती जाते' हे स्पष्ट सांगितले. सरस्वतीने किती शाळा काढल्या आणि किती उपेक्षितांना शाळेत ओढून नेले? असा प्रश्न केला. हा प्रश्न चुकीचा आहे, असे सरस्वतीनेही म्हटले नसते कारण मनुस्मृतीने ज्ञान घेण्याचा आणि देण्याचा अधिकार वरच्या वर्गालाच आहे, असे सांगितले आहे.

रोहितची जी परंपरा आहे, ती सत्यशोधक विचारांतून पुढे येते. निदान ती शरद पवार आणि अप्पासाहेबांपर्यंत तर आहे, असे आपण छातीठोकपणे म्हणू शकतो आणि गम्मत म्हणजे रोहितने आजोबा काय, पणजोबा काय आणि खापर पणजोबा काय, या सर्वांना सरस्वतीने नव्हे, तर सावित्रीबाईने शाळेत अगदी बोट धरून नेले होते. शरद पवार यांच्या मातोश्रीलाही सावित्रीबाईंचीच प्रेरणा होती. सरस्वतीने शाळा काढल्या नाहीत, हे पचवायला रोहितला जड का जात असावे आणि तसे हिम्मत करून बोलणाऱ्या भुजबळ यांना प्रश्न विचारण्यासाठी बळ कोठून येत असावे. बारामतीत शिक्षण संकूल उभरले ते हयात असलेल्या आणि नसलेल्या रोहितच्या परंपरेने, हा इतिहास गिळताना रोहितला जड का जाते आहे. ठसका का लागतो आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांची परंपरा सांगतच महाराष्ट्रातील चार-पाच पिढ्या लढत्या झाल्या. त्यांच्याच सावलीत आणि पुण्याईत रोहित जन्माला आले. ही परंपरा त्यांनी निवडणुकीत सांगितली, म्हणूनच ते विजयी झाले. नेमके आता काय घडते आहे. जे तीन पिढ्यांच्या खांद्यावर बसून झळाळत आहेत त्यांना सावित्रीबाईंच्या कर्तृत्वाचे वावडे का आणि भुजबळ यांच्याविषयी द्वेष का? देव-देवता आध्यात्मिक गुरू होते त्यांच्याविरुद्ध बोलू नये, काळजी घ्यावी, असा उपदेश रोहितने गुहेत जाऊन बसणाऱ्या एखाद्या दाढीवाल्याप्रमाणे केला. धर्म म्हणजे काय, देव म्हणजे काय, आध्यात्म म्हणजे काय, यातला थोडा फरक तरी त्यांनी सांगायला हवा होता; पण केवळ वाचाळ असणारे आणि अभ्यास नसतानाही देव-धर्म, आध्यात्म, श्रद्धा, भक्ती, अंधश्रद्धा सारे एकाच फोल्डरमध्ये घालून ते फिरत असतात. रोहित तर त्यास अपवाद कसा असेल? नुसत्या अक्कलदाढा येऊन चालत नाहीत, तर त्या गच्च-पक्व व्हायला लागतात. तसे झाले, तर देव आणि आध्यात्म यातला फरक कळतो. अंबा खाल्ल्यानंतर मुलगा होतो, महिला कपड्याशिवाय चांगल्या दिसतात, असे काही महाभाग बोलतात. तेव्हा रोहित कोणत्या वाणाचे मूग गिळून बसलेला असतो. परंपरा समजत नसेल, पेलवत नसेल, तर शहाणा माणूस शांत बसतो, चिंतन करतो आणि घाईत व संभ्रमात असलेला माणूस कशावर काहीही बोलून जातो. रोहितचं तसंच झालं. गडावर झेंडेही लावायचे आणि सरस्वतीविषयी प्रश्न उपस्थित झाला, की आपली पात्रता नसताना कुणा तरी ज्येष्ठांना उपदेश करायचा हा धंदा खूप काळ चालत नाही. समाज माध्यमांत अंगठे वर जसे जातात तसे ते खालीही जातात, हे कोणत्या तरी गडाच्या शेवटच्या पायरीवरून समजून घ्यावे. 'छोटा बच्चा जान के मुझको ना समजाना रे' हे जसं खरंय, तसं छोट्यांनी परंपरा आणि यत्ता विसरून काहीही बोलत राहणे हेही बरोबर नाहीय. खरं तर, त्यानं आपल्या कुटुंबाला आणि महाराष्ट्राला लाभलेल्या परंपरेची माफी मागायला हवी...

## राज्यपालांच्या विकृत विधानांना बळ येतंय कुठून...?

राज्यपालपद हे अतिशय महत्त्वाचं, जबाबदारीचं संविधानात्मक पद असते. ते निष्पक्ष राहावं,




राजकारणाचे शिंतोडे त्याच्यावर उडू नयेत किंवा या पदातूनही ते उडू नयेत, अशी व्यवस्था असते. राज्यात खालपासून वरपर्यंत जे काही चालते ते राज्यपालांच्या नावानेच. या पदाची विश्वासार्हता, प्रतिष्ठा खूप मोठी असते. राज्यपालांच्या मार्गदर्शनानुसार सरकार चालतं किंवा सरकारनं विश्वासार्हता गमावली, की राज्यपालांच्या आदेशानुसार ते कोसळतंही. स्वाभाविकच राज्याची प्रतिष्ठा राखणं, राज्याचा सांस्कृतिक विकास करताना जनतेला आणि सरकारला मार्गदर्शनही करावं लागतं. राजकारणातून जाणीवपूर्वक दूर काढण्यात आलेल्या आणि तशी घटनात्मक तरतूद असलेल्या या पदाचा वापर मात्र अधूनमधून राजकारणासाठी केला जातो. राजकारणात कोणाची तरी सोय म्हणून या पदावर कोणाला तरी नेमणं, आपल्या विरोधातील सरकारे कुठे असतील, तर त्यांचा छळ करण्यासाठी, ती अस्थिर करण्यासाठी हे पद वापरणे आदी गोष्टींनाही इतिहास आहे. भाजपच्या कारकिर्दीत हे थोडे अति होते आहे. अनेक घटनात्मक संस्थांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष राजकारणाच्या आखाड्यात वापर होत असताना आपण पाहत आहोत. केरळ, तामिळनाडू, राजस्थान, बंगाल आदी काही ठिकाणी बिगर भाजप सरकारे आहेत. तेथे राज्यपाल आणि राज्य सरकारे यांच्यात रोज वाद सुरू आहेत. आपल्याकडे असलेले अधिकार वापरून राज्यपाल सरकारची कोंडी करतात, राजकीय विधाने करतात, सरकारचे निर्णय रोखून धरतात वगैरे अनेक गोष्टी घडत असतात, घडत आहेत. महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. महाराष्ट्रात अडीच वर्षे महाआघाडीचे सरकार होते. कोश्यारी नावाच्या राज्यपालांनी राज्य सरकारची कोंडी कशी चालवली होती, याला सर्व जनता साक्षी आहे. आमदारांच्या नेमणुकांपासून ते अनेक निर्णय स्थगित करण्यापर्यंत, पहाटे शपथविधी उरकण्यापासून ते हिंदुत्ववादी घटकांना आधार देण्यापर्यंत बरेच पाणी वाहून गेले आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात आणि संस्कृतीपर्यंत वादग्रस्त विधाने करण्यापर्यंत हा प्रवास सुरू राहतो. हे सारे करण्यासाठी राज्यपालांना बळ मिळते ते राज्यघटनेत आणि लोकशाहीचा बुरखा पांघरून लोकशाहीचा संकोच करणाऱ्या केंद्र सरकारचे. बहुतेक राज्यपाल केंद्राचा अजेंडा चालवण्यासाठीच जणू काही अवतारले असतात.

महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान, प्रेरणास्थान आणि दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांना कोश्यारींनी इतिहासजमा केले आणि भाजपचे गडकरी यांना नवे मॉडेल म्हणून पुढे आणले. खरे तर राज्यपालांनी अशी चमचेगिरी करण्याचे कारण नाही. कारण गडकऱ्यांनाही ते पेलणारे नाही. आपण छत्रपतींच्या जागी जाऊन आधुनिक मॉडेल कसे होतो, हे गडकऱ्यांना रेशीम बागेत उभे आडवे चिंतन करूनही कळणार नाही. जे देशाच्या मालकीचे रस्ते खासगी कंत्राटदारांना विकत आहेत आणि टाटा, बिर्लाच्या रांगेत जाऊन बसत आहेत, ते कसे काय आदर्शाच्या यादीत येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांनी तर छत्रपतींना मनापासून स्फूर्तिस्थान मानले होते. फुल्यांनी छत्रपतींवर अजरामर पोवाडा लिहिला. त्यांनी रयतेचा राजा, बहुजनांचा राजा, असे वर्णन केले. डॉ. आंबेडकरांनी महाड सत्याग्रहावेळी रायगडला भेट दिली. छत्रपतींविषयी अनेकदा ते बोलले. लिहिते झाले. छत्रपती शाहू महाराज तर शिवाजी महाराजांच्या प्रेरणेला आत्म्यासारखे जपायचे. इतिहास तेच सांगतो. या इतिहासातून छत्रपती शिवाजी महाराज यांना बाजूला करून बहुजनांच्या नेत्यांशीच त्यांची झुंज लावण्याचा डावपेच कोश्यारींनी आखला आहे. याचा परिणाम काय होणार, हे त्यांना नक्कीच ठाऊक असणार, यात शंकाच नाही; पण तरीही त्यांनी हे मुद्दाम केले. एकीकडे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कारकिर्दीवर हिंदुत्वाचा शिक्का मारणारे, कोणा स्वामीचे शिष्यत्व त्यांना देणारे काही लोक आहेत. कल्याणकारी, शूर, वीर, बहुजनांचा राजा ही त्यांना छत्रपतींची प्रतिमा कधीच मान्य झालेली नाही. त्याऐवजी केवळ गायींचे रक्षण करणारा महाराज अशी प्रतिमा ते रंगवत आले. कोश्यारींचे कूळही याच कळपातले आहे. संघाचे लोक बेमालूम खोटे बोलतात, मोठ्याने खोटे बोलतात आणि अंगलट आले, की छोट्या आवाजात माफी मागतात. देवेंद्र फडणवीससारखी संघातील पराक्रमी मुले, फडणवीस यांच्या पत्नी आदी अनेक जण कोश्यारींची पाठराखण कशी करतात आणि शिवसेनेला कमी हिंदुत्ववादी ठरवून सत्तेपोटी बंड करणारे कसे मूग गिळून गप्प असतात, हेही महाराष्ट्र पाहतो आहे. स्वतःला छत्रपतींचे वारस आणि भक्त समजणारे अनेक जण या कळपात सत्तेसाठी गेले आहेत. काही अपवाद वगळता तेही ध्यानस्थ झाले आहेत. जे आज सारवासारव करत आहेत, तेच कोश्यारींचे प्रेरणास्थान आहेत. एखाद्या महापुरुषाला प्रथम पूजेच्या रांगेत बसवायचे आणि मग बरी-वाईट चिकित्सा करायची, असा हिंदुत्ववाद्यांचा डावपेच असतो. लोकांनी तो समजून घ्यायला हवा आणि कोशारींसारखे चमचेगिरी करणारे लोक यांची बलस्थाने समजून घ्यायला हवीत. ती आपल्याच बाजूला कुठे तरी तयार होत असतात. स्वातंत्र्यानंतर आपला इतिहास पराभवाचा लिहिला गेला, असे आक्रोश करून सांगणारे मोदी विजयाचा इतिहास कुठे होता, हे सांगत नाहीत आणि कोश्यारींना तोंड बंद करण्यासाठी एखादी चिकटपट्टीही पाठवत नाहीत. त्यांचे हिंदुत्व हे असे असते. छत्रपती शिवाजी महाराजांनी पाच वेळा माफी मागितली होती, असे विधान भाजपचे एक नेते त्रिवेदी यांनी केले आहे. जेव्हा सावरकारांनी माफी मागितली होती, अशी चर्चा पुढे येते तेव्हा हे हिंदुत्ववादी माफी प्रकरण महात्मा गांधी आणि इतिहासपुरुष छत्रपतींपर्यंत पोहोचवतात. हिंदुत्ववाद्यांनी कशी माफी मागितली होती, परकीयांशी त्यांचे सोटेलोटे कसे होते यावर भाष्य करत नाहीत. एकूणच समाज एका मोठ्या पेचप्रसंगातून जातो आहे. नव्यानव्या समस्यांशी तो झुंजतो आहे, असुरक्षित मानसिकतेतून जातो आहे, अशा परिस्थितीत

शिवरायांचे ते रूप आठवावे जे लढण्याची हिम्मत देते. राजकारणात त्यांना ओढणे हे महापाप आहे. कोश्यारी ते करत आहेत. कदाचित मोदींनी सजवलेल्या गंगेत जाऊन ते शुद्धही होतील. प्रश्न म्हातारी मेल्याचा नाही, तर काळ सोकावतो याचा आहे.

# हिंदुत्वाच्या वाटेवर पुणे विद्यापीठाची उडी...

पुणे विद्यापीठ तसे मुळात क्रांतिकारी, पुरोगामी वगैरे नव्हते. काही वेळा काहींनी या विद्यापीठाला तसा चेहरा देण्याचा प्रयत्न केला हे खरे आहे; पण त्याच वेळेला कुलगुरुपदावर राहून, डॉ. आंबेडकर यांचे नाव घेऊन गणपती उत्सवात आरत्यांना हजर राहण्याचा विक्रम करणारे कुलगुरूही या विद्यापीठात घुसले आणि नंतर रामनाम जपत उच्चपदावर पोहोचले. जगविख्यात शास्त्रज्ञही विद्यापीठाला लाभले. गेल्या दहा वर्षांपासून मात्र जो उजव्या बाजूने जातो, उजव्या कुशीवर झोपतो, उजव्या बाजूने विचार करतो, अशांची कुलगुरुपदी वर्णी लागू लागली. देशभर असेच चित्र आहे. पुणेही त्याला अपवाद नाही. हे करण्याचे कारण म्हणजे सांस्कृतिक संघर्ष आणि बंड सुलभरीत्या करण्याचे साधन म्हणजे शिक्षण असते. त्यात अभ्यासक्रम असतो. तसा अनेक वर्षे आपला अभ्यास देवा-धर्मात, उजव्या विचारांतच अडकलेला होता. अभ्यासक्रम तयार करणारे तेच लोक होते. सबब आपल्या अभ्यासक्रमात देवा-धर्माची जेवढी गर्दी असते, तेवढी अन्यत्र कोठे नसावी. संस्कृती, धर्म, संस्कार, परंपरा याच्या नावाखाली गेल्या काही वर्षांपासून अनेक गोष्टी शिक्षणात घुसडण्यात आल्या. यज्ञसंस्कृतीपासून ते मनुस्मृतीपर्यंत. मुक्त विद्यापीठाने तर आठ-दहा वर्षे मनुस्मृतीच चालवली. विज्ञान विद्यापीठ आसाराम, श्री श्री महाराज, प्रजापिता यांच्या वाटेवरून चालवण्याचा प्रयत्न करत होते. उत्तरेकडे अनेक विद्यापीठांचे भगवेकरण झाले आहे. अनेक ठिकाणी टिळा लावून विद्यार्थी वर्गात जातात. काही ठिकाणी बुरख्यावरून, काही ठिकाणी आरतीवरून, काही ठिकाणी देवांच्या जयंत्या-मयंत्यांवरून वाद होतो. या सर्व गोष्टी आता शिक्षणाचा भाग बनत आहेत किंवा बनवल्या जात आहेत.

पुणे विद्यापीठाने गणेश अथर्वशीर्ष अभ्यासक्रमात आणले आहे आणि विशिष्ट दिवस ऑनलाइन अभ्यास करून विद्यार्थ्यांना झटपट प्रमाणपत्र मिळवता येणार आहे. विद्यापीठात बंद पडण्याच्या अवस्थेत असणाऱ्या संस्कृत आणि प्राकृत विभागाला या अभ्यासक्रमामुळे जीवदान तर मिळालेच, शिवाय गलेलठ्ठ पगार घेऊन पांढरे हत्ती बनलेल्या मास्तरांच्या नोकऱ्याही टिकणार आहेत. पुण्यातील प्रसिद्ध गणपती दगडूशेठ हलवाई आणि टिळक विद्यापीठाचा या उपक्रमात सहभाग असणार आहे. अर्थात, अथर्वशीर्ष म्हणणारे लोक तयार झाले, की स्वाभाविकच गणेशभक्तही वाढतात. गणेशोत्सव सुरू करण्याचे श्रेय घेणाऱ्या टिळकांचे नावही अजरामर होते. संस्कृत भाषेविषयी जिव्हाळा आणि भारतीय संस्कृतीची माहिती व्हावी म्हणून हा अभ्यासक्रम सुरू केला, असा खुलासा पुणे विद्यापीठाने केला असला, तरी तो खोटा आहे. अथर्वशीर्ष धर्माशी जोडले.




ती एक प्रार्थना, एक भक्तिगीत वाटावे असे आहे. अशा गीताला कोणी संस्कृतीचा आत्मा करणार नाही. भारतीय संस्कृती महान आहे याविषयी कोणत्या प्रमाणपत्राची गरज नाही; पण त्यात धर्माच्या, संस्कृतीच्या आणि संस्कृतच्या नावाने अथर्वशीर्ष घुसडण्याचे कारण नाही. संस्कृती ही देवाची भाषा होती. माणसाची आणि बहुजनांची नव्हे, असे हेच लोक सांगतात. अथर्वशीर्ष आणि धार्मिक दृष्टिकोनाचा संबंध नाही, असेही सांगतात आणि प्रत्यक्षात अथर्वशीर्ष व्यक्तिविकासाचा भाग आहे, असे ठोकत त्याचा अभ्यासक्रमही बनवतात. अर्थात, हे पुण्यात आणि पुणे विद्यापीठात घडावे यातही फार वेगळे . ते तेथेच घडत आले आहे.

अथर्वशीर्ष, गणपती श्रद्धेचा भाग असू शकतो. त्यात ढवळाढवळ करण्याचे काही कारण नाही. श्रद्धा ही व्यक्तिगत बाब असते. ती सार्वत्रिक करत अभ्यासक्रमात नेण्याचे कारण काय? विमानाचा शोध विज्ञानाने लावला, टेस्टट्यूब बेबीचा शोधही त्यानेच लावला. असे असताना हे सारे श्रेय धर्माला देण्याचे कारण काय? देव-धर्म या आपल्या व्यक्तिगत बाबी आहेत. त्या आपल्या घरापुरत्या मर्यादित असणेच समाजहिताचे असते. संविधानात तेच सांगितले आहे. हे सारे विसरून विद्यापीठेच जर हिंदुत्वाच्या दिंडीत स्पर्धा करू लागली, तर मागास, मागे जाणाऱ्या विद्यार्थ्यांचाच एक समाज तयार होईल. महासत्ता बनण्यास निघालेल्या भारताला तो परवडणार नाही. विद्यापीठे स्वायत्त असतात. परिणामी आपल्या मालकांच्या दबावाखाली ते काहीही करायला तयार होतात. पुणे विद्यापीठाला क्रांतिज्योती सावित्रीबाई यांचे नाव देताना कोण आणि कसले डावपेच लढवत होते. महात्मा फुल्यांच्या पुतळ्याला कोण विरोध करत होते आणि विरोध करणारे बक्षीसपात्र कसे ठरले, याविषयी नव्याने काही बोलावे-लिहावे असे नाही. विद्यापीठे अशीच मस्तीत वागणार असतील, कोणत्यातरी रंगात रंगण्याचा प्रयत्न करणार असतील, समाज मागे नेण्यासाठी सुपारी उचलत असतील, तर विद्यापीठांचा घटक असलेल्या विद्यार्थी आणि पालकांनीही जागे व्हायला हवे. आपल्याला शिक्षणात काय हवे आणि काय नको, हे त्यांनीच ठामपणे सांगितले पाहिजे. व्यवस्थेचे लाभार्थी आणि गुलाम बनलेले पांढरे हत्ती आणि त्यांचा मालक यापैकी कोणीही उजेडवाटा तयार करू शकणार नाही. उद्या अथर्वशीर्षाबरोबरच संडे प्रेअर, बांग आणि त्रिशरणही अभ्यासात आणा, अशी मागणी झाल्यास मतिमंद विद्यापीठे काय करणार? ●●●

**- पंक्चरवाला**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

पाक्षिक
स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

# वार्षिक वर्गणीदारांना

## २०% सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

-----

हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदारचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ९६० | ८०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ४८० | ४०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | २४० | २०० | |

(वार्षिक विशेषांक - ४) / (६ महिने - २)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ---------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------ जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : -------------------------------------------------- पत्ता : ------------------------------

------------------------------------------------ शहर : ------------------------------------------------

राज्य : ---------------------- पिन कोड : ----------------- फोन नं. (घर) : ------------------------

मो. नं. : ------------------------ इ-मेल : ------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा peoplespost.in

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.